# माणूस

शनिवार । २९ मे १९७६ । एक रुपया



## नायगाव ( कामशेत ) येथे नव्याने सुरू होणारे कृषी-सेवा-केंद्र कसे असावे ?

दोन प्रतिक्रिया

साप्ताहिक माणूस
वर्ष पंधरावे – अंक : एक्कावन्न-बावन्न
[ ४ ऑक्टोबर ७५ व ११ ऑक्टोबर ७५ या दोन्ही अंकांवर चुकीने एकच क्रमांक (अठरावा) दोनदा पडलेला आहे. हा अंक वर्षअखेरचा असल्याने पुढचा जोड क्रमांक टाकून मागील चूक दुरुस्त करून घेतली आहे.
२९ मे १९७६
मूल्य : एक रुपया



संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
□
वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये
□


प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.


□
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
□
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
□
दूरध्वनी : ४३४५९
□


# कृषी सेवा केंद्र

## आबा करमरकर
## सुभान वैद्य

ग्रामायन + इंद्रायणी कॉलेज, तळेगाव यांचे संयुक्त विद्यार्थी शिबिर ठरल्याप्रमाणे दि. १८ ते २३ मे या कालावधीत नायगाव येथ भरले होते. दोन दिवस आसपासच्या भागात पाहणीयात्रा व दोन दिवस एकत्रित चर्चा असा सर्वसाधारण शिबिराचा कार्यक्रम होता. शिबिरानंतर आता नायगावला इंद्रायणी कॉलेजतर्फे एक कायमचे कृषिसेवाकेंद्र सुरू होत आहे व या केंद्राला प्रसिद्ध निर्माणकार्यकर्ते आबा करमरकर यांचे मार्गदर्शनही लाभणार आहे. या कृषिसेवा-केंद्राविषयीची आपली कल्पना स्पष्ट करताना आबांनी कॉलेजच्या चालकांना कळविले आहे –

अलीकडे जे शिक्षण मिळते ते जीवनाभिमुख व उत्पादनाभिमुख बनविले पाहिजे. त्यादृष्टीने तेथे होणारा शेती कार्यक्रम असेल. शेती हा एक धंदा आहे. त्यातून नफा मिळतो हे दाखवावयाचे आहे. शिकलेला तरुण पुन्हा परत आपल्या खेड्यात जाऊन शेती हा व्यवसाय, धंदा म्हणून करू शकतो हे आपल्याला दाखवावयाचे आहे. शेतीमधून, यंत्रदुरुस्तीमधून तेथे जे आपल्याला अनुभव मिळतील, त्या दृष्टीने शिक्षणक्रमात जरूर तो बदल करावा लागेल.

आजूबाजूच्या परिसरातील लहान शेतकरी व शेतमजूर यांचे प्रश्न त्यांचे त्यांना मांडायला लावून, त्यांचे दुःख त्यांनाच व इतरांना समजायला उद्युक्त करून त्यांच्यातील जाणीवा वाढविण्याचे कार्य करायचे आहे. त्यातूनच त्यांना हे समजावून द्यावे लागेल की, सध्याची जी सामाजिक व्यवस्था आहे, तिच्यात बदल घडविल्याशिवाय त्यांच्या हितासाठी परिवर्तन होणार नाही. हे परिवर्तन राजकीय, सामाजिक व आर्थिक अशा तीनही आघाड्यांवर एकदमच करावे लागेल. ह्या कामी शिक्षण घेणारा तरुण हा समाजात निर्माण झालेली जडता, त्याची कारणे शोधून; खेड्यांत काम करीत असताना नवीन मूल्य-व्यवस्थापनेत सहभागी होईल व ही जडता नाहीशी करण्यात सहभागी होईल. खेड्यातील माणसांत व शिक्षण घेणाऱ्या तरुणांत आत्मविश्वास व मूल्यश्रद्धा निर्माण करायच्या आहेत. मला वाटते आपण सर्वच जण या विचारांशी सहमत आहात.

आपले कॉलेज हे एक संस्कृति-केन्द्र बनले पाहिजे असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा आजूबाजूचा परिसर आणि कॉलेज यांच्यामध्ये एकात्मता निर्माण झालेली असायला हवी. आज शिक्षणाचा कारखाना यापलीकडे गावातील माणूस कॉलेजकडे पाहत नाही. ह्या उलट त्याचे गरिबीचे प्रश्न, त्याचे शेतीतील प्रश्न, रोजगाराचे प्रश्न, पाण्याचे प्रश्न, ग्रामपंचायतीचे प्रश्न, सोसायटीचे प्रश्न, सामाजिक प्रश्न ह्या सर्वांबाबत नुसते मार्गदर्शन करणारी नव्हे, तर त्यांच्या जीवनाला एक वेगळे वळण देणारी संस्था म्हणून, त्याचे जाणीवी-

करण वाढविणारी, त्याला त्याचे भवितव्य घडवायला प्रोत्साहित करणारी संस्था म्हणून कॉलेजने भूमिका पार पाडायची आहे. कॉलेजच्या कामाला एक वेगळीच परिमिती द्यावयाची आहे. ह्या पार्श्वभूमीवर काम करून ग्रामीण विभागातील सर्व कॉलेजना आज ही एक प्रकारची कोंडी झाल्यासारखे वाटते आहे, ती फोडण्याचा मार्ग दाखविणारी संस्था हे स्वरूप यावे असे मी मानतो. शिक्षण-संस्था व ग्रामीण-समाज ह्यांची एक नवीन रिलेशनशिप निर्माण करायची आहे. ह्या सर्व विचारसरणीशी तुमच्या संस्थेचा काही मतभेद असेल असे वाटत नाही. ह्या सर्व तात्त्विक विचारसरणीचा प्रत्यय प्रत्यक्ष कामातून जास्त स्पष्ट होत राहील. त्याप्रमाणे येणाऱ्या अनुभवातून बदल करावयाचे आहेत. शिक्षणामध्ये या अनुभवाचे प्रतिबिंब दिसायला हवे असे मला वाटते. एखाद्या विभागाचा विकास व त्या विभागातील शिक्षणसंस्था व इतर काम करणाऱ्या संस्था, यांचे परस्पर संबंध, एकमेकांना प्रगतीवर नेणारे, मुद्दाम प्रस्थापित करायला हवे आहेत. आजच्या शिक्षण-चौकटीत हे जरी शक्य वाटत नसले, तरी त्यावद्दलचे भान ठेवून जरी आपण आपले कार्यक्रम आखले व अंमलबजावणी केली तर निदान सुरुवात केल्यासारखे तरी होईल. वेळोवेळी एकत्र जमून आपण सतत विचारविनिमय करून आपला विचार, उच्चार व त्यातून निर्माण होणारा आचार हे तपासून पाहिले पाहिजेत. त्यात तफावत असल्यास ती कमी करीत राहायला हवे. ह्या सतत सजग अशा प्रयत्नातून आपल्याला अभिप्रेत असलेले बदल प्रतिबिंबित करणारी व्यवस्था आपण उत्क्रांत करू शकू. मला वाटते मी तेथे योजीत असलेल्या कामासंबंधीची भूमिका, त्यामागचा दृष्टिकोन वर मांडण्याचा प्रयत्न केला आहे. कळावे.
□

याच परिसरात गेली अनेक वर्षे कोरडवाहू शेतीवर प्रयोग करून गरीब शेतकऱ्यांचे नेमके दुःख समजावून घेण्याचा प्रयत्न करणारे श्री. सुभान वैद्य यांनी अशा कृषि-सेवा केंद्राची सगळीकडेच फार आवश्यकता आहे असे शिबिरापूर्वीच्या एका बैठकीत सांगितले व याविषयी आपली तीन वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेली पुस्तिकाच विचारार्थ सादर केली. या पुस्तिकेत श्री. वैद्य लिहितात–

## यंत्रसज्ज सेवा केंद्र

लहान शेतकऱ्याच्या गरिबीचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे शेतीच्या कामासाठी लागणारा बैल, नांगर, पाभार, बैलगाडी ह्यासाठी त्याला बैल ठेवावे लागतात. बैल न ठेवता शेतकऱ्याला शेतीला आवश्यक ती अवजारे भाड्याने मिळण्याची सोय झाली तर, त्याची गरिबी हटायला खूपच मदत होईल आणि हरित क्रांतीचा फायदाही त्याला मिळू शकेल.

शेतीसाठी बैल, बैलासाठी गाय अशा एका न संपणाऱ्या दुष्ट चक्रात शेतकरी सापडला आहे. बैल हा त्याच्या कुटुंबाचा एक अविभाज्य भाग झाला आहे. याउलट आपल्या शेतीला यांत्रिकीकरण मानवेल की नाही; अमेरिकन, रशियन पद्धत योग्य की अयोग्य असल्या वादात फुकट वेळ जात आहे. स्वतः गरीब शेतकऱ्याशिवाय त्याच्या फायद्याची सोय कोणाला कशी कळणार.

शेतकरी बैल ठेवण्यासाठी जितके कष्ट, खर्च आणि वेळ घालवतात, त्यामानाने तितकी शेती–सेवा बैलाकडून घेऊच शकत नाहीत- कारण एक पीकवाला जिरायती शेतकरी जेमतेम एक महिन्यापुरतीच सेवा बैलाकडून घेऊ शकतो. एका पिकानंतर त्याचा वर्ल गाडीचा धंदा असेल, तरच बैल ठेवणे त्याला परवडणार. पावसाळी व हिवाळी पिके घेणारा २ महिने काम घेऊ शकतो. त्यालाही मोठ्या नांगरासाठी ४–६ बैल लागतातच, तेही तात्पुरते. एरवी १२ महिने बैल ठेवणे महाग पडते. कैक शेतकरी घरच्या गाईचा बैल फुकटातला समजून पोसतात, दुसरा कामाच्या वेळी उसना अगर विकत आणतात. कैक सिझनपुरती जोडी विकत घेऊन काम झाल्यावर विकतात. ज्याच्याकडे बैलच नाही अशासाठी "इरजिक," गावकऱ्यांनी मदत म्हणून एकत्रित फुकट काम करण्याची पद्धत काही भागात अद्याप आहे.

बैलासाठी प्रत्येक शेतकरी शेताचा काही भाग वैरणीसाठी पण ठेवतात. बांध मोठे ठेवणे त्याच उद्देशाने असते, म्हणजे "कुंपणाप्रमाणे बैलही शेत अडवतो अथवा खातो." त्या अडविलेल्या शेताचे उत्पन्न आणि बैलाची सेवा पाहता, बैल बहुधा महागच पडतो.

बैल विकणे, विकत घेणे ह्या आणखी नुकसानीचा एक प्रकार. ठराविक भागातील शेतीच्या कामाच्या वेळापत्रकाप्रमाणे त्या भागातील बैलबाजारात बैलांचा पुरवठा, मागणी यांचा चढउतार चालू असतो, त्याप्रमाणे त्यांच्या किंमतीही कमी जास्त होतात. गरजेच्या वेळी किंमती वाढतात आणि गरज संपल्यावर उतरतात, म्हणजे शेतकरी बैल घेताना महाग आणि विकताना स्वस्त विकतो. आजकाल हलका बैलही ४–५ शेच्या कमी नसतो. त्यामुळे शेतकऱ्याला बैल म्हणजे मोठी प्रॉपर्टी वाटते. मग एका बैलामागे जर एका सीझनला देण्या–घेण्यात रु. ५०–१०० जरी तूट आली तर ती भरणार कोठून ? वापरल्या काळातील त्या बैलाची मजुरी पण तितकी होत नसेल, कारण त्याला पोसण्याचा–खुराकाचा खर्च असतोच. मालकाची मजुरी वेगळीच. म्हणजे शेणखत धरूनही सौदा महाग पडतो.

तसेच बैल घेता–विकताना २–४ बाजार तरी फिरावे लागते. श्रीमंत शेतकरी नोटांचे बंडल फेकून दुसऱ्याच्या दावणीचा बैल सोडून आणतो. गरीब कसे करणार ? म्हणून शेतकऱ्याला प्रत्येक बाजारामागे रु. १०–१५ फोडणी असतेच, कारण मोठी खरेदी म्हणून एखाद-दुसरा पाहुणा सल्लागार लागतोच. दिवस मोडतात त्याला किंमत नसतेच.

बाजारात बैल नेल्यावर अगर घेताना शेतकरी माकडच बनतो. कारण दलाल सौदा टॉवेल, धोतराखाली बोटे मोजून करतात. बाजारात बैल सतत नेणे–आणणे महाग पडते म्हणून आलेल्या किंमतीत सौदा कबूल करावा लागतो. कारण दलालही रिंग करून असतात.

इतकं करून बैल बश्या निघाला तर ? ते विचारूच नये ! २० वर्षे बैलजोडीचे राजकारण गाजले पण त्यामागचे अर्थशास्त्र कोणी पाहिलं ?

कृषि–सेवा–केंद्र म्हणजे यंत्रसज्ज सेवा केंद्र गरीब शेतकऱ्याला हरित क्रांतीपेक्षाही जास्त महत्त्वाची आहेत. कारण त्यामुळे शेतकरी बैलाच्या दुष्टचक्रांतून कायमचा सुटेल. शिवाय–

१. त्याला केंद्राकडून पाहिजे ती नांगरट, कुळवणी, पेरणीची सेवा मिळत गेली तर त्याच्या दावणीचा बैल दूर होईल.

२. शेतीची कामे वेळच्या वेळी व झटपट उरकता येतील.

३. त्याच्या पिकाचा एकरी जमाखर्च त्याला सहज करता येईल; त्यामुळे त्याच्या पिकाची उत्पादक किंमत ठरू शकेल.

४. बैलाच्या वैरणीसाठी अडलेली शेती तो लागवडीला आणील,

५. अगर त्या वैरणीवर तो फक्त दुभती जनावरे पाळून आपले उत्पन्न वाढवील.

६. वेळीच मशागती होऊ लागल्यामुळे त्याला एका पिकानंतर जमिनीची ओल सुकण्यापूर्वीच दुसऱ्या पिकाची पेरणी करता येईल.

७. बैलापायी फुकट जाणारा वेळ व मेहनत तो दुभती जनावरे,शेळी, मेंढी अगर तत्सम जोडधंद्यामागे घालवून आपले उत्पन्न वाढवील.

८. बैलापासून मिळणारे शेणखत त्याला इतर जनावरांपासून फायदेशीरपणे घेता येईल.

९. बैलाच्या युगातून शेतकरी सुटून यंत्राच्या संपर्काने आधुनिक कार्यक्रम व वक्तशीर बनू लागेल.

१०. यांत्रिकीकरणामुळे नांगर, पाळच्या, खत, पेरणी, पाणी देणे ही कामे रात्रीसुद्धा केली जाऊ शकतात.

११. कृषि-सेवा-केंद्रामुळे खेडोपाडी मेकॅनिकल वर्कशॉप निघून नवीन नोकरीची केंद्रे निघू शकतील.

१२. बैलांची गरज कमी झाल्याने राष्ट्रीय पातळीवर अनुत्पादक ( uneconomic ) जनावरांच्या लोकसंख्येचा प्रश्न सहज सुटेल. शेतकऱ्याची गरिबीही तेवढ्या प्रमाणात हटेल. अनुत्पादक जनावरांमधे बैल व गोऱ्हे (लहान बैल) यांचेच प्रमाण जास्त असते.

१३. पावसाच्या पुढेमागे होण्याने वैरणीचा त्रास व महागाई यांमुळे गरीब शेतकरी वैरण साठवू शकतोच असे नाही. त्यामुळे गवताचे व्यापारीही नफेखोरी करतात.

१४. तोकडच्या शेतीमुळे, अपुऱ्या वैरणीमुळे गावात याच गुरांच्या चारणीवरून नेहमी भांडणे होतात.

१५. शेतकऱ्याने कुटुंबनियोजन मान्य केलेच आहे. मग गुरांचे नियोजन सहज मान्य करील, फक्त सरकारला त्याचे महत्त्व कळले पाहिजे.

बहुसंख्य शेतकरी सात एकर जिरायती क्षेत्राखालील आहेत. सात एकर हलकी जमीन लहान नांगराने नागरण्यास चांगल्या बैलजोडीला, जोखड, कासरे, फाळ हळस, रूमण सगळे साहित्य चालू अवस्थेत असेल तर जास्तीत जास्त १० दिवस लागावेत. पाळचासाठी थांबावे लागते ते अलग. म्हणजे जेमतेम महिनाभरही शेतकाम बैलाकडून होत नाही. मोठ्या नांगराला कमीत कमी ४ बैलांना तितकेच दिवस लागतील. भारी जमीन असल्यास ८ बैलांपर्यंतही लागतात. ¤

पुस्तिकेच्या शेवटी श्री. वैद्य यांनी आपले काही अनुभव नमूद केले आहेत, तेही विचारात घेण्यासारखे आहेत. श्री. वैद्य लिहितात:

सतत वीस वर्षे मावळसारख्या मागासलेल्या गरीब शेतकऱ्यांच्या विभागात मी वावरलो, राहिलो. प्रथम कम्युनिस्ट कार्यकर्ता म्हणून सरकारविरोधी दृष्टीने पाहिले. गेली सहा वर्षे प्रत्यक्ष शेतीव्यवसाय करू लागल्यानंतर कोणाचे, कोठे, कसे चुकते, परिस्थिती सुधारण्यासाठी काय व्हायला हवे, कसे व्हायला हवे हे विचार व्यवहार्य अंमलबजावणीच्या दृष्टीने सुचल्यावरून लिहिण्याचे साहस केले आहे. अनुभव संपूर्णत: लिहिणे जागेअभावी अशक्य आहे. तरीही महत्त्वाचे जे जे वाटले ते ते येथे सादर केले आहेत.

तीन वर्षे सतत प्रयत्न केल्यानंतर माझ्या तिसऱ्या दर्जाच्या जमिनीत (वरच्या दर्जाची जमीनच माझ्याकडे नाही.)गावस्पर्धेत मी संकरित ज्वारी एकरी १८ क्विंटलची सरासरी उत्पादन पिकवून पहिले बक्षीस मिळवले, तेही निव्वळ पावसाच्या पाण्यावर. शिवाय (मुवासिक) बासमती भातही पिकवले. ४० इंचांच्या भागातील जिरायती शेतकऱ्यांना ही पिके म्हणजे वरदान ठरू शकतील. दुर्दैवाने ह्या कार्यात सरकारी अगर पंचायत समितीच्या नोकरवर्गाशिवाय कोणाचेच लक्ष नसते. 'गरिबी हटवणे' हा राजकीय कार्यक्रमच नाही, त्याचे परिणाम बिचारे शेतकरी भोगतात. मात्र ह्या भागातील, बहुसंख्य शेतकरी, श्रीमंत शेतकरीसुद्धा कार्यक्षमतेने शेती करीत नाहीत.

१. सरकारी कुक्कुट शिक्षण केंद्रावर नाव नोंदवल्याबरोर एकदम एक दिवसाची ३५० पिल्ले मागवली. तीन महिन्यांच्या शिक्षणक्रमानंतर आणखी तीन महिन्यांत उत्पन्नच सुरू व्हावे हा उद्देश आणि नेमके अपेक्षेप्रमाणे उत्पन्न सुरू झाले. त्यावेळी मादी ओळखण्याचे तंत्र भारतात आले नव्हते आणि कुक्कुटपालनाचे व्यापारीकरणही झाले नव्हते. कोंबडचांचे खाद्य त्यावेळी रु. ३३–३४(७० किलोला) पडत. त्यामुळे रोज ५० टक्के अंडी मिळूनही ग्रेडप्रमाणे १८ ते २५ पैशाला विकून फायदा होत असे. हल्ली वाहतूक, बाजारपेठ आणि चांगला भाव यांमुळे शहराजवळील केंद्रेच किफायतशीर चालतात, बाकी सगळी बंद आहेत.

२. सरकारी पड जमिनीचा ताबा जानेवारीत मिळाला. ट्रॅक्टर आणून नांगरटी केल्या. जूनच्या पहिल्या पावसानंतर पाळचा घालून लगेच निरनिराळी पिके पेरली. शक्यतो अन्नधान्याबाबत स्वावलंबी व्हावे हा उद्देश होता. भेंडी, वाटाणा, घेवडा तर थोडा विकताही आला. शिवाय दिवाळीत म्हणजे पाच महिन्यांत भुईमूग ३५ पोती (त्यातला बहुतेक विकला.), भात, मूग, उडीद, मिरची, मका तीन वर्षे पुरेल इतका पिकला, तरी शेतीचा पूर्वानुभव काहीच नव्हता.

## बँकेच्या व्यवहारासंबंधी

प्रथमच शेतीसाठी कर्जाचे अर्ज भूविकास बँकेकडे द्यायचे होते. सरकारच्या नव्यानेच मिळालेल्या जमिनीवर पूर्वीची कर्जे कोठून असणार ? तरीही मुलकीखाते, बीडीओ, विकास सोसायटी वगैरेंकडून 'देणे नसल्याचे दाखले' हवे होते. विकास सोसायटीच्या चेअरमनने हरकत घेतली. 'तुम्ही आमचे सभासदही नाही, मग तुम्हाला कर्ज देण्याचा, ते बाकी राहण्याचा प्रश्नच कोठे येतो ?' त्यांचे म्हणणे मला शंभर टक्के पटले. पण...माझ्यावर मेहेरबानी म्हणून त्यांनी सही केली. ते त्यांना अगर मलाही पटले नाहीच. पण बँकेचा तो आग्रहपूर्वक रिवाज आहे. त्यात माझे १२–१५ दिवस फुकट गेलेच. अखेर सर्व सोपस्कार उरकून कर्ज मिळाले, पण वर्ष फुकट गेल्यात जमा होते, कारण विहिरीचे पैसे पावसाळ्यात मिळाले.

पीक तयार झाल्यावर मला बँकेचे हप्ते भरावयाचे होते, पण भाव घसरले होते त्यामुळे लगेच विकून नुकसान होणार होते. पण कर्ज देणारी बँक शेतीमालावर अॅडव्हान्स देत नाही म्हणून तो शेतीमाल मी विकास सोसायटीत जमा केला आणि अॅडव्हान्सची सोय झाली. म्हणजे कर्ज घ्यायचे एका संस्थेकडून, दुसऱ्या २–३ संस्थांचे दाखले घ्यायचे, माल चौथ्याच संस्थेत जमा करायचा, इतका उपद्व्याप कशासाठी ?

२. जमिनीचे वाटप बदलल्यामुळे झऱ्याची शक्यता कमी झाल्याने मी विहिरीचा विचार सोडला. माझ्या शेतात ओढ्यामुळे २–३ एकर जमीन खोल खडक आहे. त्यामध्ये बांध घालून पाणी अडवल्यास

३०० फूट लांब, ३० फूट रुंद, सरासरी ६–७ फूट खोल तलाव होऊ शकतो. २–३ एकर संकरीत पिकाला भरपूर पाणी मिळू शकेल. बँकेला विनंती केली की, विहिरीचे पैसे बांधाला वापरले तर विहिरीचा उद्देश काही प्रमाणात तरी निश्चित सफल होईल. बँकेकडून नकार आला. प्रथम पैसे परत करा. खाते बंद करा, नवीन अर्ज द्या, मग पुन्हा कर्ज देऊ. त्यावर मी सुचवले की, कर्ज द्यायचेच आहे, तर मग हा उपद्व्याप कशाला?' उत्तर आले की, तशी आमची पद्धत आहे.

थोडक्यात म्हणजे बँकेच्या रीतीरिवाजासाठी शेतकऱ्याने रावायचे; बँकेने शेतकऱ्याच्या सोयीप्रमाणे व्यवहार्य राहायचे नाही. या लालफितीतून प्रथम बँकेने बाहेर पडल्याशिवाय शेतकऱ्याचे हाल आणि गरिबी हटणार नाही.

३. थोडी पैशाची सोय झाल्यावर मी स्वखर्चानेच बांध बांधून तलाव करण्याची योजना आखली. इंजिनीअर्स, (P. W. D. handbook) वरून अभ्यास करून, जास्तीत जास्त भक्कम बांध बनवण्याची योजना आखली.जाड लोखंडी पत्र्याच्या चौकटीसह १५फूट लांब व २ फूट रुंदीच्या फळ्या आणल्या. दगडी खांबावर उभ्या करून बांधकामात घेऊन, शिवाय आतून काँक्रीट स्लॅब व बाहेरून मातीचा भराव इतक्या बंदोबस्तासाठी साहित्यही आणले.

नगरपालिकेचा नळ ओढ्यातून उघडाच आहे. इतरत्र मातीत आहे. नगरपालिकेने नकार दिला, आमचा पाईप उघडाच राहू द्या. शिवाय बांधाची परवानगी सरकारी खात्याकडून मिळवा. सरकारी इंजिनिअर्सना भेटलो. त्यांच्या मागणीप्रमाणे ब्ल्यू प्रिंटही दिला. एक दिवस एक इंजिनीअर अधिकारी पाहणीसाठी आले. त्यांना ब्ल्यू प्रिंटसह सर्व तपशील व्यवस्थित जमिनीवर दाखवून समजावून सांगितला. त्यांना बांधाच्या मजबुतीबद्दल खात्री पटल्याचेही बोलले, पण तरीही एक मार्मिक प्रश्न त्यांनी विचारला, 'महापूर आला तर काय सोय केली आहे?' मी सर्दच झालो. माझी जमीन डोंगर-उतारावरची! शिवाय ३००'–३०'–६' च्या तलावाची 'महापुरा'त काय सोय करणार? महापुरात तर गावही वाहून जाईल...म्हणजे आलाच तर! चांगली योजना आखताना खबरदारी म्हणून वाईटाचा विचार करणे हे मान्य, पण योजनाच करू नये इतका वाईट विचार कशाला? अखेर त्यांनी तीन प्रश्नांची लेखी उत्तरे मागवली. एक खर्चाचा, दुसरा किती क्षेत्र भिजेल आणि तिसरा तांत्रिक म्हणजे बांधाच्या भक्कमतेचा तपशील (stability calculations), खर्च, क्षेत्राबद्दल तपशील कळवून पत्रव्यवहारात वेळ जाऊ नये म्हणून मी त्यांना विनंती केली की, तुम्हीच मला मदत करा. उत्तर आले की, तुमची उत्तरे समाधानकारक नसल्याने अर्जाचा विचार करू शकत नाही. तोपर्यंत माझे चार पावसाळे गेले, जमीनही पड पडली आहे. नशीब अधिकृत आर्किटेक्टकडून ब्ल्यू-प्रिंट मी काढून दिला होता.

४. सरकारच्या 'पशु-सुधार' केंद्रावरील डॉक्टरना भेटलो. त्यावेळी एका शेतकऱ्याचा म्हातारा, निकामी बैल आजारी म्हणून आला होता. मांडीजवळ जखम चिघळली होती. डॉक्टर सहकाऱ्यासह इलाज करीत होते. बऱ्याच वेळाने मोकळे झाल्यावर मी चौकशी केली. 'अशा अनुत्पादक जनावरांमागे तुमच्यासारख्यांनी वेळ, औषध घालवून शेतकरी, बैल अगर देश कोणाचाच फायदा नाही.' त्यांचे ठराविक उत्तर 'ती आमची ड्यूटी आहे.' 'अशा अनुत्पादक जनावरांना औषधाने थंड केले तर?' 'आम्हाला गाव सोडून पळून जायला पाहिजे.' 'स्थानिक पुढारी कार्यकर्त्यांचे सहकार्य घेतले तर?' उत्तर, 'अहो तुम्ही एवढी चौकशी तरी करता आहात, कोणाला इतका विचार आहे? योजना समजावण्यासाठी कार्यक्रमाला बोलावले तरी कोणी येत नाही! मात्र मंत्री वगैरे येणार असले तर, आम्हाला सळो की पळो होऊन जाईल इतकी गर्दी होईल!' शंभर टक्के बरोबर होते त्यांचे.

शेतकऱ्याने संकरीत पीक लावण्याचे ठरवल्यास कितीही क्षेत्रासाठी एक एकरी उत्तम बी, रासायनिक खते व औषधे प्रत्येक एकरी रु. १००। इतके साहित्य लगेच मिळते. पीक झाल्यावर ते परत करायचे. अनुभव असा की, शेकडा ६०–७० टक्के पुढाऱ्यांसह लोकांना योजनेचा पत्ताच नाही. शेतकीसाहाय्यक आपले काम दाखवण्यासाठी गावोगावी काही शेतकऱ्यांना मुष्किलीने पटवून पिके पिकवायला लावतात. मग ती कशी नीट येणार? १५०० खातेदारांच्या गावात ३०–३५ जणांनी जेमतेम पिकवणे, याला प्रगत संकरीत शेती कसे म्हणावे?

५. अशिक्षितपणा, गरिबी, नैराश्याबरोबरच काही प्रमाणात जुनाट सामंतशाही, गलथानपणाही शेतकऱ्यांच्या दोन पिढ्यांचा स्वभाव दिसतो. तो उगवत्या पिढीत येऊ न देणे हेही आपल्या शेती सुधारणेचे अंग समजले पाहिजे. तसे वातावरण निर्माण केले पाहिजे.

६. ४ वर्षांपूर्वी कृषी उद्योग खात्याने हायर–परचेस पद्धतीने १४ हॉर्सपॉवरचे रशिअन ट्रॅक्टर, रु. ८०००। किंमतीचे, प्रत्येक हप्ता रु. २०००। चा, प्रमाणे योजना जाहीर केली. अर्ज केल्यानंतर थोड्याच दिवसांत ती योजना रद्द झाली. ठोक किंमतीला विकत घ्या आणि त्वरित न्या असे पत्र आले. ट्रॅक्टरचा विचार सोडला आणि बैलजोडीसाठी माहितगाराबरोबर चार बाजार फिरलो. अखेर रु. ७५० ची जोडी घेतली. कासरे, गोठा, वैरण, खुराक, घमेली शिवाय नांगर, कुळवासाठी साहित्यही घेतले. औताला जुंपले तर नेमका एक बैल बस्या! नांगर एक तासही धड चालला नाही. मारणे, शेपटया मोडणे, तंबाखू खाऊन डोळ्यांत थुंकणे, सगळे सोपस्कार केले. अखेर पुन्हा तीन बाजारांत तो विकण्यासाठी फिरलो. एका बाजारी शंभर रुपये कमी येतही होते. पण दुसऱ्याला फसवणे सदसद्विवेकबुद्धीला न पटून तो खाटकाला अर्ध्या किंमतीत विकला. दुसरा मारका होता. आता शेतीचे काम करावे की दुसरा बैल धुंडत फिरावे? अखेर तोही विकला. कारण रोजचा खर्च वाढतच होता. अशा तऱ्हेने दोन महिन्यांत शेकडो रुपयांचा खेळ आणि नसता उपद्व्याप भोगला. असले अनुभव शेतकऱ्यांनाही नेहमीचेच आहेत. अशा बैलांवर दलालांचा जास्त 'धंदा' होतो, कारण सौदे भराभर होतात. घेणारा तोच बैल लगेच दुसऱ्या बाजारी पुन्हा विकायला आणतो. स्वस्तात विकतो, दलालांना असले बैल परिचित असतात.

एकूण बैलविक्रयाचाही धंदा करावाच लागला. माझं मलाच हसू येई. स्वतंत्र सैनिक, पदवीधर, शेतकरी आणि बैलविक्या सगळे उद्योग करावे लागले. पैसे वसूल व्हावेत म्हणून आशेने चार बाजार फिरलो, पण तोपर्यंत शेतकऱ्यांची कामे संपून भाव उतरले होते. □

# श्रीशाहू छत्रपतींचे अर्थकारण

## एक ग्रंथचिकित्सा । द. रा. जोशी

१८९४ ते १९२२ हा काळ दक्षिण महाराष्ट्राच्या दृष्टीने समाज-परिवर्तनाचा काळ म्हणून इतिहासात नोंदला गेला आहे. राजर्षी शाहू छत्रपतींच्या रूपाने कोल्हापूर संस्थानाला राजकीयदृष्टया स्थैर्य लाभले. एवढेच नव्हे तर, परंपरागत आचार–विचार व सामाजिक दृष्टिकोनाच्या परिवर्तनाची प्रक्रियाही जोराने सुरू झाली. दीर्घकाळपर्यंत कोल्हापूर संस्थानाला प्रभावी नेतृत्व न मिळाल्याने राज्यकारभाराची सूत्रे उच्चवर्णीय हितसंबंधीयांच्याकडे राहिली. त्यांनी आपल्या अधिकाराच्या जोरावर राजकीय मक्तेदारी तर निर्माण केलीच; परंतु त्याचबरोबर सामाजिक व आर्थिक दरी रुंदावण्याचे कार्यही केले. सामाजिकदृष्टया पिढ्यान् पिढ्या चालत आलेल्या चातुर्वर्ण्य पद्धतीची कसोशीने जोपासना केली. त्यामुळे सामान्य जनता राजकीय व सामाजिक अधिकारापासून वंचित राहिली, तसेच आर्थिक दुरवस्थेच्या जोखडाखाली वाकून राहिली.

सामाजिक सुधारणेच्या कार्याला १९ व्या शतकाच्या उत्तरार्धातच महात्मा फुल्यांनी हात घातला होता. विरोधाची तमा न बाळगता बहुजनसमाजाला ज्ञानविज्ञानाची कवाडे उघडून देण्याचे दिव्य त्यांनी केले. सामाजिक जागृती निर्माण करण्याचा पश्चिम महाराष्ट्रातील हा एक प्रयत्न एकाकी असला, तरी प्रभावी होता. त्यांच्या सत्यशोधक चळवळीने अनेकांना आकृष्ट केले. महात्मा फुले एक सामान्यातील असामान्य व्यक्ती होती. त्यांच्या मागे राजकीय शक्तीचे सामर्थ्य नव्हते. होते ते नैतिक व वैचारिक अधिष्ठान.

महात्मा फुल्यांच्या विचाराचा वारसा चालविणारी व्यक्ती म्हणून राजर्षी शाहू छत्रपतींचे नाव इतिहासात नोंदले गेले आहे. चातुर्वर्ण्य-पद्धतीचा बीमोड करण्याचा जणू विडाच त्यांनी उचलला होता. त्यासाठी आपली २८ वर्षांची कारकीर्द त्यांनी खर्च केली. सामान्यांच्या-कडूनही कटू आणि अपमानास्पद बोलणी त्यांनी शांतपणाने सोसली; आणि राजकारण्यांचे डावपेच व टीका यांना ते खंबीरपणाने सामोरे गेले. सामान्यजनांना समाजात मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत असतानाच, त्यांच्या आर्थिक उन्नती-साठीही पुरोगामी व प्रगत धोरणे शाहू महाराजांनी अनुसरली. उद्योग, व्यापार, शेती, रोजगार, कामगार संघटना वगैरे बाबतींत नवीन विचार व उपक्रमांना चालना देऊन प्रजेच्या आर्थिक प्रगतीचा मार्ग त्यांनी मोकळा केला. राजर्षी शाहूंनी सबंध महाराष्ट्राचेच नव्हे, तर महाराष्ट्राबाहेरीलही विचारवंत व राज्यकर्ते यांचे लक्ष वेधून घेतले होते. सामान्य जनांचा कल्याणकारी राजा, रयतेचा राजा, क्रांतिकारक राजा या रीतीने राजर्षींचा उल्लेख होत आहे.

२६ जुलै १९७४ रोजी शाहू छत्रपतींच्या जन्माला शंभर वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्ताने त्यांचा जन्मशताब्दी महोत्सव वर्षभर साजरा करण्याचे महाराष्ट्र शासनाने ठरविले. इतर अनेक उपक्रमांबरोबरच शाहू छत्रपतींच्या जीवनाचे, कारकीर्दीचे व विचारांचे मूल्यमापनही सुरू झाले. याचाच एक भाग म्हणून कोल्हापूरच्या सौ. मीना कुलकर्णी व श्री. ब. शि. कुलकर्णी या प्राध्यापक पति-पत्नींनी संयुक्तपणे 'श्रीशाहू छत्रपतींचे अर्थकारण' हा ग्रंथ लिहून प्रसिद्ध केला आहे. दोघेही अर्थशास्त्राचे प्राध्यापक असल्याने श्रीशाहूंच्या आर्थिक विचारांचा व धोरणांचा परामर्श घेण्यापुरताच या ग्रंथाचा पसारा त्यांनी मर्यादित ठेवला आहे. आपल्या निवेदनात लेखकांनी ग्रंथाचे उद्दिष्ट पुढील शब्दांत स्पष्ट केले आहे. 'कोल्हापूर संस्थानाचा आर्थिक विकास करण्यामध्येही महाराजांचे विचार किती धाडसी, पुरोगामी, कृतीची जोड मिळालेले व आधुनिक आर्थिक कसोटयांशी किती मिळतेजुळते आहेत यावर फारसा प्रकाश टाकला गेला नाही. महाराजांच्या आर्थिक कृतीची बाह्य मानचिन्हे आजच्या कोल्हापुरास भूषणावह झालेली आहेत. उद्योग, व्यापार व शेती, पाटबंधारे, श्रम, सहकार, नैसर्गिक संकटाशी झुंज, मानवी गुंतवणूक, सार्वजनिक आय–व्यय या आर्थिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाच्या क्षेत्रांत त्यांची कामगिरी विशेष उल्लेखनीय आहे. त्यामागचे त्यांचे विचार, तत्त्वप्रणाली, त्यांनी टाकलेली पाऊले ही निश्चितच अभ्यसनीय ठरतात. त्यांच्या ह्या कामगिरीचाही परिचय महाराष्ट्राला तरी घडून यावा यासाठी हा संशोधनपर ग्रंथ लिहिण्याचा उपक्रम आम्ही हाती घेतला.' या शब्दांतून ग्रंथाचे प्रयोजन स्पष्ट झालेले आहे.

आर्थिक विचार व धोरणांचे परिशीलन करण्यासाठी लेखकांनी आधुनिक अर्थशास्त्रातील निकष लावण्याचा प्रयत्नही केलेला आहे. प्रत्येक प्रकरणाच्या सुरुवातीस संबंधित अर्थशास्त्रीय तत्त्वांचे थोड-क्यात विवरण आले आहे. या संदर्भात लेखक म्हणतात, 'त्यांचे आर्थिक विचार व कृती आधुनिक अर्थशास्त्राच्या निकषांशी पडताळून बघितली तर जितके महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी सामाजिक बाबतीत केले आहे, तेवढेच किंबहुना अधिक महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी आर्थिक बाब-तीत केले आहे असे म्हणावे लागेल.' (पान १) आर्थिक विकासाची प्रक्रिया, हरितक्रांती, केन्सचे अर्थशास्त्र, सार्वजनिक आय-व्ययाची तत्त्वप्रणाली, आर्थिक नियोजन वगैरे विषयींच्या तात्त्विक विश्लेष-णाचा आधार घेऊन शाहू महाराजांच्या धोरणात ही तत्त्वे कशी आढळतात हे दाखविण्याचा प्रयत्न लेखकांनी केलेला आहे. विषय-मांडणीसाठी अनुसरलेली ही पद्धत. परंतु त्याचबरोबर लेखकांनी याच संदर्भात केलेले एक विधान मात्र खटकणारे आहे. 'महाराजांच्या आर्थिक कामगिरीचे मूल्यमापन करताना आपल्याला महाराजांचे

कार्य एका बाजूला व दुसऱ्या बाजूला आधुनिक अर्थशास्त्राच्या कसोटचा असे करून चालणार नाही. महाराजांनी काळाच्या ज्या चौकटीत काम केले ती चौकट महत्त्वाची आहे. ज्या पार्श्वभूमीवर महाराजांनी कार्य केले ती विसरून चालणार नाही.' (पान ३) असे विधान करून पहिल्याच प्रकरणात शाहू महाराजांच्या वेळची आर्थिक व सामाजिक परिस्थिती कशी होती याचे विवेचन केले आहे. या विधानावरून असे मानावयाचे काय, की शाहू महाराजांचे आर्थिक क्षेत्रातील कार्य तपासून पाहताना अर्थशास्त्रीय कसोट्यांना गौणत्व देऊन तत्कालीन परिस्थितीला प्रधान स्थान दिले पाहिजे ? लेखकांचे विधान अगोदरच्या विधानाला काटशह देणारे आहे. आर्थिक क्षेत्रातील कार्य व अर्थशास्त्रीय कसोटचा यांचा संबंध लावून चालणार नाही असे सांगूनही प्रत्यक्षात लेखकांनी सर्व प्रकरणात तो संबंध जोडण्याचा प्रयत्न केलेला आहे ! असो.

ग्रंथाची मांडणी एकूण ९ प्रकरणे आणि २ परिशिष्टे यांमध्ये केलेली आहे. शेवटी संदर्भग्रंथांची यादी व सूची आहे.

कोल्हापूर संस्थानातील जनतेच्या आर्थिक उन्नतीचा पाया शेतीव्यवसाय आहे हे जाणून शाहू छत्रपतींनी शेतीच्या उर्जितावस्थेसाठी विविधांगी उपाययोजना केली. शेतकऱ्यांना चांगली बियाणे, खतें व कर्ज मिळण्याची व्यवस्था केली. चहा, कॉफीसारख्या पिकांच्या लागवडीचे प्रयोग केले. शेतीविषयक प्रदर्शने भरविली. आदर्श शेतीचा प्रयोग केला. पाणीपुरवठ्याच्या योजना कार्यान्वित केल्या. शेतजमिनीचे तुकडे तोटचाचे राहू नयेत म्हणून मोठ्या आकाराच्या तुकडचांचा पाठपुरावा केला. शेतीला पूरक व्यवसायांचीही वाढ करण्याकडे लक्ष दिले. विविध प्रकारच्या सहकारी संस्था स्थापन करण्यास उत्तेजन दिले.

शाहू छत्रपतींचे हे प्रयत्न स्तुत्य होते याबद्दल दुमत होण्याचे कारण नाही. तथापि, लेखकांनी शाहू महाराजांना 'हरित क्रान्तीचे जनक' असे संबोधले आहे (पान ५१) यामध्ये अतिशयोक्ती जाणवते. लेखक म्हणतात, 'महाराजांनी या योजनेचा पाया घातला म्हणून कोल्हापूरवासीयांना दोन वर्षापूर्वीच्या दुष्काळात पिण्याच्या पाण्याच्या टंचाईचा तडाखा बसला नाही. उसाची लागवड विस्तृत प्रमाणावर करता येते, शेतीला पाण्याचा पुरवठा होऊ शकतो. हे सर्व फायदे आपल्याला मिळत आहेत, ते श्रीशाहू महाराजांनी राधानगरी श्रीलक्ष्मी तलावाची योजना व्यवहारात आणल्याने. आणि ह्यामुळे त्यांना 'हरित क्रान्तीचे जनक' ही पदवी योग्य ठरते.' (पान ५४). केवळ वीजपाण्याची सोय केली एवढचावरच हरित क्रान्तीचे जनकत्व बहाल करता येईल काय ?

अर्थात असे म्हटल्याने छत्रपतींच्या प्रयत्नांना कमी लेखण्याचाही मानस नाही. त्यांच्या शेतीसंबंधीच्या कार्यात प्रागतिक दृष्टिकोन होता हे खचित. शेती उत्पादनवाढीला पोषक परिस्थिती निर्माण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न होता तो. स्वातंत्र्योत्तर काळात घडून आलेल्या बदलांची बीजे त्यात सापडतात.

शेतीसाठी पाणीपुरवठा व्हावा आणि लोकांनाही पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष जाणवू नये या उद्देशाने शाहू महाराजांनी पाणीपुरवठ्याच्या लहान मोठ्या योजना कार्यान्वित केल्या. जुन्या विहिरींची दुरुस्ती केली, नव्या विहिरी खोदल्या, ठिकठिकाणी लहान मोठे तलाव बनविले आणि या सर्वांवर कळस म्हणून राधानगरी गावाजवळ भोगावती नदीवर मोठे धरण बांधले. या सर्व कार्याचा तपशील 'पाटबंधारे' या प्रकरणात आला आहे. विवेचनाच्या ओघात शाहू महाराजांचा द्रष्टेपणा सिद्ध करीत असताना लेखकद्वय सर्वच प्रकरणात शाहू महाराजांचे आर्थिक धोरण आजही कसे उपकारक ठरू शकेल हे सांगण्याचाही प्रयत्न करतात. यातूनच काही वेळा न पटणारी विधाने येऊन जातात. लेखक म्हणतात, 'आपल्याकडे शेतीला भरपूर प्रमाणात पाणी हवे असते. पाऊस भरपूर पडतो; पण नद्यांना पूर येऊन ते पाणी शेवटी सागराला मिळते व उन्हाळ्यात आपल्याला एकूणच पाण्याचे दुर्भिक्ष जाणवते. अजूनही महाराजांच्या नंतर पन्नास वर्षांनीसुद्धा आपल्या ह्या दृष्टिकोनात फारसा फरक झाला आहे असे वाटत नाही." (पान ५५). गेल्या २५ वर्षांतील भारताच्या पंचवार्षिक योजनांचा आढावा घेतला, तर अगदी पहिल्या पंचवार्षिक योजनेपासूनच पाटबंधाऱ्यांच्या अनेक लहान मोठ्या योजना कार्यान्वित झालेल्या असून त्यांच्यापासून लाखो हेक्टर जमिनींना पाणीपुरवठा होत आहे. ही वस्तुस्थिती असतानाही 'ह्या दृष्टिकोनात फारसा फरक झाला आहे असे वाटत नाही' असे विधान अर्थशास्त्राच्या प्राध्यापकांनी करावे याचे नवल वाटते.

शाहू महाराजांनी आपल्या इंग्लंड व इतर देशांच्या भेटीत तेथील उद्योगधंद्यांच्या वाढीबद्दल विशेष औत्सुक्य दाखविले होते. नवनवीन उद्योग आपल्याही संस्थानात सुरू करण्याची प्रेरणा त्यातून त्यांना मिळाली. विविध प्रकारच्या व्यवसायांना त्यांनी हस्ते परहस्ते नाना प्रकारे मदत केली. उद्योगधंद्यांना स्वतःच्या पायावर भक्कमपणे उभे राहता यावे यासाठी शक्य तेवढी पोषक परिस्थिती निर्माण केली. कोल्हापूर स्टेट रेल्वे लाईन, श्रीशाहू मिल, काताचा कारखाना, पुण्यातील कापूस, रेशीम व कागदाच्या गिरण्या, जिनिंग व वीव्हिंग फॅक्टरीज, कापड रंगविण्याचा कारखाना, राळ तयार करण्याचा उपक्रम, राधानगरीचा लाकूड शुद्धीकरण कारखाना, घोड्याची जीन बनविण्याचा व्यवसाय, वगैरे उपक्रमांतून शाहू महाराजांनी संस्थानाच्या औद्योगिक विकासासाठी केलेल्या प्रयत्नांचे स्वरूप समजून येते. त्यामुळे कोल्हापूर संस्थानातील कोल्हापूर, शिरोळ, इचलकरंजी, गडहिंग्लज, रायबाग, गारगोटी, राधानगरी वगैरे ठिकाणी व त्या परिसरात औद्योगिक उत्पादनाला चालना मिळाली. महाराजांनी खाजगी कारखानदारीबरोबरच सहकारी प्रयत्नांचाही पाठपुरावा केला.

उद्योग व व्यापार ही परस्परपूरक असतात. शेती व कारखानदारीतून तयार होणाऱ्या मालाला बाजारपेठा उपलब्ध होणे जरूरीचे असते. या दृष्टीने शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात बाजारपेठा स्थापण्याकडे लक्ष दिले. कोल्हापूर ते मिरज रेल्वेचे बांधकाम या हेतूनेच पूर्ण केले. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे कोल्हापुरातच रेल्वे स्टेशनाच्या परिसरात 'शाहुपुरी' या नावाने वसविलेली बाजारपेठ. या ठिकाणी आपली दुकाने उघडण्यासाठी कोल्हापुरातील व्यापाऱ्यांना त्यांनी सक्रिय प्रोत्साहन दिले, तसेच निपाणी पेठेतील व इतर ठिकाणच्या व्यापाऱ्यांना निमंत्रणे देऊन बोलावले व अनेक सवलती देऊन वखारी उघडण्यास मदत केली. गूळ, साखर, भुईमूग वगैरेंची मोठ्या प्रमाणात उलाढाल या बाजारपेठेत होऊ लागली. शाहुपुरी पेठेतून निर्यात होणाऱ्या मालाची १८९४–९५ सालातील किंमत ६ लक्ष रुपये होती, ती १९२१ मध्ये ३० लक्षापर्यंत वाढली.

शाहू छत्रपतींनी व्यापारवाढीसाठी केलेल्या प्रयत्नांचा आढावा घेत असताना लेखकांनी याच प्रकरणात नव्हे, तर सबंध पुस्तकात एका महत्त्वाच्या गोष्टीचा उल्लेखही करू नये याचे आश्चर्य वाटते. ती म्हणजे जयसिंगपूरची बाजारपेठ. आपल्या संस्थानच्या अगदी सरहद्दीवर असलेल्या ओसाड माळरानावर बाजारपेठ वसविण्यात

शाहू महाराजांची दूरदृष्टी स्पष्टपणे जाणवते. शिरोळ, इचलकरंजी ही आपल्या संस्थानातील औद्योगिक केंद्रे वाढीला लागण्याच्या दृष्टीने या उपक्रमाला महत्त्व होते. निवडुंगाची फडे आणि इतर झाडा-झुडुपांनी गजबजलेल्या माळरानावर एक गाव वसवून त्यातून बाजार-पेठ निर्माण करण्याचे कार्य खचितच उल्लेखनीय होय. इ. स. १९१६ मध्ये या कामाला सुरुवात झाली. याचा उल्लेख जयसिंगपूर नगर-पालिकेने श्रीमंत जयसिंगराव घाटगे यांच्या बसविलेल्या पुतळ्याच्या चबुतऱ्यावरील कोनशीलेतही सापडतो. त्यावरील संबंधित मजकूर असा : "करवीर संस्थानचे लोकप्रिय राजे कै. राजर्षी श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांनी आपले जनक वडील कै. जयसिंगराव आबासाहेब घाटगे (कागल) यांचे स्मरणार्थ त्यांचे नावाने या जयसिंगपूर नगरीची वसाहत इ. स. १९१६ मध्ये वसविली."

ब्रिटिशांच्या आधिपत्याखालील एक संस्थानिक राजा असूनही शाहू छत्रपतींनी मजुरांच्या हितसंवर्धनासाठी संघटना बनविण्याला प्रोत्साहन द्यावे ही गोष्ट त्यांच्या पुरोगामी विचाराची साक्ष पटवून देणारी मानावी लागेल. युरोपात घडणाऱ्या घटनांची माहिती मजूर परिषदांमधून सांगून मजुरांना एकीचे बळ पटवून देण्याचा त्यांनी अनेक वेळा प्रयत्न केला. मुंबईला स्थापन झालेल्या पीपल्स युनियनचे शाहू महाराज आश्रयदाते होते.

श्रमिकांच्या बाबतीतही त्यांना रोजगाराची संधी शक्य तो त्यांच्या राहण्याच्या ठिकाणी मिळण्याची व्यवस्था झाल्यास खेड्यातून शहरा-कडे येणारा मजुरांचा लोंढा रोखता येईल ही शाहू महाराजांची भूमिका होती. त्यासाठी शेतीला पूरक व्यवसाय, हस्तोद्योग व कुटिरो-द्योग वगैरे वाढविण्यावर भर देण्यात आला. ग्रामीण कारागिरांच्या प्रशिक्षणाचे महत्त्व ध्यानात घेतले गेले.

मजूरवर्ग सामान्यत: कनिष्ठ वर्णीयांपैकीच असल्याने त्याच्या शोषणाला मर्यादा नव्हती. या जोखडातून त्याला मुक्त करण्यासाठी छत्रपतींनी हजेरी, वेठबिगार व वतने रद्द केली. अस्पृश्य वर्गावरील मोठे ओझे त्यामुळे कमी झाले. मजुरांच्या मुलाबाळांना शिक्षण मिळण्याचीही त्यांनी व्यवस्था केली. अशा प्रकारच्या उपाययोजना सध्या अखिल भारतीय स्तरावरून होत आहेत हे लक्षात घेतल्यास शाहू महाराजांनी किती मजल मारली होती हे समजून येईल.

श्रमाविषयीचा ऊहापोह करताना लेखकांनी शाहूंच्या उपक्रमांचे सार सांगताना शाहू राजांचा उल्लेख "कामगारांच्या राज्याचे स्वप्न पाहणारा हा संस्थानिक!' असा केला आहे. (पान ९२) युरोपात मजुरांच्या नेतृत्वाखाली प्रजासत्ताके स्थापन होत आहेत, मजुरांचा प्रभाव व पक्ष वाढत आहे, तेव्हा यावरून तुम्हीही बोध घ्या असे मजुरांना शाहूराजे सांगत. परंतु याचा अर्थ कोल्हापूर संस्थानात असो अगर अखिल हिंदुस्थानात असो, त्याचप्रमाणे मजुरांची सरकारे यावीत असे शाहू राजांना सुचवावयाचे होते काय? खचितच नाही. कामगारांमध्ये जागृती निर्माण करण्यामागे त्यांचे राज्य स्थापण्याचे उद्दिष्ट नसून कामगारांची आर्थिक व सामाजिक उन्नती साधणे एवढाच प्रयत्न होता. लेखकद्वयांनी केलेला उल्लेख अनाठायी आहे.

भांडवली गुंतवणुकीबरोबरच मानवी गुंतवणूक समाजाच्या विकासासाठी आवश्यक आहे. या भूमिकेतून शाहू महाराजांनी मानवी गुंतवणुकीकडे किती कटाक्षाने लक्ष दिले होते याचे बरेच तपशीलवार विश्लेषण लेखकांनी दिले आहे. प्राथमिक, माध्यमिक व महाविद्या-लयीन शिक्षणासाठी शाहू महाराजांनी कसे कसे प्रोत्साहन दिले ते समग्रपणे सांगून विविध जातींच्या वसतिगृहांचे जाळे निर्माण करण्या-मागची महाराजांची भूमिकाही विशद करण्यात आली आहे. याखेरीज अस्पृश्यांची हजेरी बंद करणे, गुन्हेगार जमातींना सन्मार्गाला लावणे व मनोरंजनासाठी साठमारी, कुस्तीसारखे खेळ लोकप्रिय करणे याबाबतही शाहू महाराजांनी केलेल्या प्रयत्नांचा आढावा घेतला आहे.

या सर्व विश्लेषणात काही महत्त्वाचे संदर्भ राहून जावेत याचे मात्र नवल वाटते. पान १२५ वर महाराजांनी ग्रंथालयांना मदत दिल्याचे उल्लेख आहेत; परंतु सध्याच्या करवीर नगर वाचन मंदिराचा संदर्भ कुठेच येऊन जात नाही. महाराजांच्या काळात हे ग्रंथालय "कोल्हापूर नेटिव्ह लायब्ररी" या नावाने ओळखले जात होते. श्रीशाहू महाराज या संस्थेचे पहिले आश्रयदाते होत. मद्रासचे 'जस्टिस' दैनिक व इतर काही वृत्तपत्रे त्यांनी उत्स्फूर्तपणे संस्थेस नियमितपणे दिली. एवढेच नव्हे, तर संस्थेचे रूपांतर मध्यवर्ती वाचनालयात झाल्यानंतर संस्थेच्या नोकरावर होणारा सारा खर्च व संस्थेस मदत दरबाराकडून मिळत असे. आपले पिता श्रीशाहू महाराज ग्रंथालयाबाबत अनुसरलेले उदार धोरण चालू ठेवण्याचे यांनी अभिवचन श्रीराजाराम महाराज यांनी त्यांच्या राज्यारोहणप्रसंगी दिले होते.

दुसरी गोष्ट म्हणजे आजचे केशवराव भोसले नाट्यगृह (तेव्हाचे पॅलेस थिएटर). शाहू महाराजांनी ज्या काही चिरस्मरणीय गोष्टी केल्या त्यांमध्ये या नाट्यगृहाची उभारणी ही एक आहे. १९१३ साली या नाट्यगृहाचे बांधकाम सुरू होऊन १९१५ साली दसऱ्याचे मुहूर्तावर त्याचे उद्घाटन झाले. नाट्यगृहाचे बांधकामासाठी लागणारे काही सामान त्यावेळी शाहू महाराजांनी परदेशातून मागविले होते. नाट्यगृहाचे उद्घाटन किर्लोस्कर मंडळीच्या 'मानापमान' या नाटकाने झाले.

या प्रकरणात महाराजांनी नाट्य व चित्रकलेला कसे प्रोत्साहन दिले याचा थोडक्यात का असेना, परामर्श येऊन जायला हवा होता. मानवी गुंतवणुकीत अशा उपक्रमांचे स्थान महत्त्वाचे आहे हे प्रकर-णाच्या प्रास्ताविकात आवर्जून सांगितल्यानंतर तपशील येणे अपरिहार्य वाटते. केवळ 'चित्रकला, नाट्यकला व संगीतकला यांना प्रोत्साहन दिले' (पान १३९) एवढ्यावरच बोळवण करणे रास्त ठरणार नाही. वास्तविक शाहू महाराजांनी नाट्य, संगीत, चित्र, मल्ल अशा विद्येत चमकलेली व अग्रभागी तळपणारी अशी माणसे आपल्या राज्यात असावीत या जिद्दीने अनेक कलाकारांना कोल्हापूरच्या परिसरात आणले. त्यांच्या अडीअडचणी दूर केल्या. नाटकमंडळींना घरच्यासारखे मानून त्यांचा प्रपंच चालविला, बालगंधर्वांना मिरजेस पाठवून त्यांच्यावर औषधोपचार करविला तर केशवराव भोसले पुण्यात आजारी असताना स्वत: त्यांच्या घरी जाऊन त्यांची चौकशी आस्थेने केली. "नाट्यकंपन्यांना शाहू महाराज एखाद्या रुखवता-प्रमाणे धुण्याच्या पाण्यापासून ते तोंडाचा रंग जाण्याच्या शिकेकाई-पर्यंत सर्व जिनसा पुरवीत असत. जवळजवळ किराणा मालाचे एक मोठे दुकानच ते कंपनीला देत असत." (करवीर नाट्य मंडळ स्मरणिका, नाट्यसंमेलन १९७०, पान २०) बालगंधर्व, केशवराव भोसले, दत्तोपंत हल्ल्याळकर, दत्तोबा भोसले, विष्णुपंत औंधकर, विष्णुपंत पागनीस वगैरे नामवंत नटांना प्रोत्साहन देण्यात शाहू महाराजांचा मोठा हातभार होता.

'देवल क्लब' ही कोल्हापुरातील नाट्य व संगीताच्या क्षेत्रात काम करणारी एक जुनी संस्था. शाहू महाराजांनी या संस्थेलाही सक्रीय आश्रय दिला. संस्थेच्या सध्याच्या इमारतीसाठीची जागा व रोख सहा हजार रुपये १९१६ मध्ये त्यांनी देवल क्लबला दिल्याची नोंद आहे.

वरील माहिती थोडक्यात का असेना पुस्तकात येऊन जावयास हवी होती. त्यामुळे मानवी गुंतवणुकीचे प्रयत्न अधिक स्पष्टपणे नजरेत भरू शकले असते.

शाहूमहाराजांनी १८९४ साली, म्हणजे वयाच्या विसाव्या वर्षी, कारभाराची सूत्रे आपल्याकडे घेतली आणि थोड्याच कालावधीत— १८९६ आणि १९००—त्यांना दुष्काळाच्या गंभीर आपत्तीशी झुंज द्यावी लागली. एवढ्या लहान वयातही त्यांच्या प्रयत्नांची झेप वाखाणण्यासारखी होती. खचितच—त्यांनी तातडतोबीच्या उपाययोजना जातीने लक्ष घालून केल्याच; तथापि, अशा आपत्ती पुन्हा उद्भवणार नाहीत या दृष्टीनेही प्रयत्न केले. दुष्काळाशी झुंज देण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा सिद्ध करण्याबरोबरच स्वस्त धान्याची दुकाने, धान्याची इतर ठिकाणांहून आयात, पिण्याच्या पाण्याच्या सोयी, रस्ते व पूल यांची बांधकामे, दुष्काळी भत्तावाटप, दुष्काळी कचेऱ्या, लहान मुलांची देखभाल, गरीबांसाठी आश्रम, मोफत अन्न व शिधावाटप, गरीब विद्यार्थ्यांना वसतिगृहातील सवलती, दुभत्या जनावरांची देखभाल, धरणे व पाटबंधाऱ्यांच्या योजना, शेतकऱ्यांना कर्जे, सुधारित शेतीचे प्रयोग व शिक्षण, अशा एक ना अनेक मार्गांनी दुष्काळाची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न महाराजांनी जातीने लक्ष घालून केला. लेखकद्वयांनी हा सर्व भाग तपशीलात दिला असल्याने शाहू महाराजांच्या प्रजाहितदक्षपणाची कल्पना येऊ शकते.

शाहू महाराजांचे एकंदर प्रयत्न स्तुत्य व अनुकरणीय होते हे निर्विवाद; परंतु त्यांच्या कामगिरीचे वर्णन करताना अतिशयोक्ती होणार नाही याची दक्षता घ्यावयास हवी होती. 'त्या काळात एकही भूकबळी पडला नाही हे महाराजांच्या प्रशासनाचे, आर्थिक धोरणाचे वैशिष्ट्य !' (पान १६९) हे विधान परिशिष्ट दोनमध्ये दिलेल्या आकडेवारीशी पडताळून पाहता विसंगत वाटते. परिशिष्टातील संबंधित आकडेवारी खालीलप्रमाणे आहे :

| वर्ष | जन्मसंख्या | मृत्युसंख्या | एकूण लोकसंख्या | जन्म (दरहजारी) | मृत्यू (दरहजारी) |
|---|---|---|---|---|---|
| १८९६–९७ | ३१,०६२ | २६,६४६ | ९,१३,१३१ | ३४ | २९ |
| १८९७–९८ | २२,४२३ | ३३,०९९ | ,, | २५ | ३६ |
| १८९८–९९ | २७,९३४ | १७,९९० | ,, | ३१ | २० |
| १८९९–१९०० | २७,७४६ | २४,८१९ | ,, | ३० | २७ |
| १९००–०१ | २०,८२८ | ३६,८३८ | ९,१०,०११ | २३ | १४ |
| १९०१–०२ | १८,७४२ | ४४,२६६ | ,, | २१ | ४९ |
| १९०२–०३ | २६,७७४ | ४०,११८ | ,, | २९ | ४४ |

टीप : दरहजारी मृत्यूचा पुस्तकात छापलेला हा आकडा चूक आहे. तो इतर इतर माहितीच्या संदर्भात ४० असावयास हवा.

या कोष्टकावरून लक्षात येईल की, दुष्काळानंतरच्या वर्षात (१८९७–९८, १९००–०१, १९०१–०२ आणि १९०२–०३) मृत्युसंख्या बरीच वाढली आणि दरहजारी मृत्युसंख्या जन्मसंख्येपेक्षा बरीच जास्त राहिली. शाहू महाराजांच्या उपाययोजनेचा फायदा प्रामुख्याने कोल्हापूर शहरातील नागरिकांना मिळू शकला. ग्रामीण भागातील परिस्थिती शोचनीयच राहिली होती. याची जाणीव शाहू महाराजांना होती व याबद्दलची आपल्या मनातील काळजी व व्यथा त्यांनी आपल्या मित्राला लिहिलेल्या पत्रात व्यक्त केली होती. या गोष्टी लक्षात घेतल्या तर 'एकही भूकबळी पडला नाही' असे विधान वाजवी ठरणार नाही.

या प्रकरणाच्या संदर्भात लेखकद्वयांनी केन्सच्या अर्थशास्त्राचा गाभा स्पष्ट करून केन्सप्रणीत धोरणाचा अवलंब त्यापूर्वीच शाहू महाराजांनी कशा रीतीने केला होता हे ठसविण्याचा प्रयत्न केला आहे. विशेषत: आर्थिक विकासाच्या कार्यक्रमासाठी परंपरागत 'समतोल अर्थसंकल्पा'चे धोरण सोडून देणे आवश्यक असते व ही गोष्ट शाहू महाराजांच्या प्रयत्नात प्रकर्षाने जाणवते, हे स्पष्ट केले आहे व त्यासाठी कोल्हापूर शहर व सबंध संस्थान यांच्या उत्पन्न व खर्चाचाही तपशील विस्तृतपणे दिला आहे. तथापि, हा तपशील पडताळून पाहिला, तर मात्र शाहू महाराजांनी समतोलाच्या अर्थसंकल्पाचे धोरणच सामान्यत: अनुसरले होते असे जाणवते. लेखकांनी पान २०८ ते २११ वर कोल्हापूर संस्थानाचे जहागिरीसह उत्पन्न व खर्च यांचा तपशील दिला आहे. एकूण उत्पन्न व खर्च यांचे आकडे एकत्रित आणले, तर वस्तुस्थितीची जाणीव स्पष्टपणे होऊ शकेल. त्यात सामान्यत: जमा व खर्च यांची सांगड घातलेली दिसते. एवढेच नव्हे तर, बऱ्याच वर्षी थोडीफार शिल्लकच राहिलेली आढळते. खास तर १९०० च्या दुष्काळाच्या वर्षात व त्यानंतरही काही वर्षांत जमाखर्चातून शिल्लक राहिलेली दिसते. ह्या गोष्टी विचारात घेतल्या तर आपला अर्थसंकल्प शिलकी राखण्याकडेच महाराजांचा अधिक कल होता असे म्हणावे लागेल.

प्रकरणवार आढावा घेतल्यानंतर शेवटी काही सर्वसामान्य स्वरूपाचे मुद्दे. जागोजागी आलेले शब्दप्रयोग खटकणारे आहेत. उदाहरणार्थ, 'जीवनाचे राहणीमान', 'ओलेतीखालील जमीन', 'परकीयांचे ब्रिटिश सरकार', 'दुधदुभती जनावरे' वगैरे. प्रकरणांच्या मांडणीत द्विरुक्ती टाळता येणेही शक्य झाले असते. उदाहरणार्थ, महाराजांच्या परदेश प्रवासातील अवलोकनाच्या संदर्भात तीच ती वाक्ये अनेक ठिकाणी आली आहेत. रस्ते, पूलबांधणी याविषयींची माहिती एकाच प्रकरणात (प्रकरण दुष्काळ) दोनदा आली आहे. (पाहा—पान १५३ आणि १६३–६४). पाणीपुरवठ्याच्या योजनाबाबतच्या काही तपशीलाची पुनरुक्ती झाली आहे.

लेखकांनी प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी आवश्यक ती संदर्भयादी व सांख्यिकी माहिती देऊन शाहू छत्रपतींच्या अर्थकारणावर प्रकाश टाकण्याचा स्तुत्य प्रयत्न केला आहे. परिशिष्टातूनही आलेख व सांख्यिकी माहितीचा प्रयत्न केला आहे. एकंदरीत, काही त्रुटींचा भाग बाजूला ठेवला तर, सामान्य वाचकांना शाहू महाराजांच्या आर्थिक व्यवहारांची व कल्याणकारी प्रयत्नांची माहिती होण्याच्या दृष्टीने पुस्तक फार उपयोगी पडेल. ☐ ☐

['श्री शाहू छत्रपतींचे अर्थकारण', सौ. मीना कुलकर्णी व श्री. ब. शि. कुलकर्णी, 'गौरी-नन्दन' पब्लिकेशन, कोल्हापूर, पृ. ३३६, किं. १५ रु.]

[समाज प्रबोधन पत्रिका, मे-जून १९७६ अंकावरून साभार पुनर्मुद्रित]

# न्याय

## फ्रान्समधील गाजलेला खटला

वा. दा. रानडे

फ्रान्समधील एका खटल्याने न्यायदानाच्या क्षेत्रात एक नवा इतिहास निर्माण केला आहे. दोन खून केल्याच्या आरोपावरून पिएरे गोल्डमन या डाव्या दहशतवाद्यास दोन वर्षांपूर्वी जन्मठेपेची शिक्षा झाली होती. त्याच्यावरील खटला पुन्हा चालविण्यात आला व त्यात तो निर्दोषी ठरला.

एका केमिस्टच्या दुकानावर डिसेंबर १९६९ मध्ये दरोडा घातला, दोन महिला नोकरांना गोळ्या घालून ठार केले आणि एका ग्राहकावर व एका साध्या वेशातील पोलिसावर गोळ्या झाडल्या या आरोपांवरून गोल्डमनला जन्मठेपेची शिक्षा झाली होती. दरोडा घालणारा व खून करणारा हाच माणूस असल्याचे आम्ही ओळखतो अशी साक्ष पाच साक्षीदारांनी दिली होती व ती ग्राह्य मानून कोर्टाने वरील निकाल दिला होता. गोल्डमन दहशतवादी डावा गनीम होता, तो बंडखोर होता, काळ्या लोकांचा मित्र होता आणि ज्यू होता. त्याने काय केले यापेक्षा तो कोण आहे हे लक्षात घेऊनच त्याला शिक्षा झाली.

'गोल्डमनला झालेली शिक्षा एकोणिसाव्या शतकातील न्यायाच्या कल्पना विसाव्या शतकातील माणसाला लावून दिलेला निकाल आहे' असे गोल्डमनचे वकील मेत्र किजमन यांनी बचावाची बाजू मांडताना म्हटले होते आणि एकोणिसाव्या शतकातील एका खटल्याचे उदाहरणही दिले होते. या खटल्यात एका निरपराध माणसाला देहान्ताची शिक्षा झाली होती आणि सहा साक्षीदारांची साक्ष ग्राह्य मानून न्यायमूर्तींनी हा निकाल दिला होता. आपल्याला अनुकूल असे साक्षीदार पोलिस मिळवू शकतात; त्यामुळे निरपराध्यालाही शिक्षा होऊ शकते, हा एकोणिसाव्या शतकातील न्यायपद्धतीत असलेला दोष विसाव्या शतकातही कायम असल्याचे गोल्डमनला झालेल्या शिक्षेने पुन्हा एकदा प्रकर्षाने दिसून आले होते. आरोपी हा गुन्हेगार असल्याचे सिद्ध होईपर्यंत त्याला निरपराधीच मानले पाहिजे हे न्यायाचे तत्त्व इंग्लंडमध्ये कसोशीने पाळले जाते, पण फ्रान्समध्ये ते सातत्याने पाळले जात नाही असे या खटल्यात दिसून आले व त्यामुळेच गोल्डमनला शिक्षा झाली होती.

गोल्डमनने तुरुंगात आत्मचरित्र लिहिले व ते प्रकाशित झाले. सध्याच्या न्यायपद्धतीतील पूर्वग्रह अकार्यक्षमता आणि पुराव्याच्या बनवाबनवीवर त्यात कडक टीका केली होती. आरोपीने गुन्हा केला आहे की नाही हे निर्विवादपणे सिद्ध झाले आहे का हे पाहण्यापेक्षा आरोपी कसा आहे, त्याने आतापर्यंत काय काय केले, हे पाहूनच त्याला गुन्हेगार ठरविण्याकडे या न्यायपद्धतीचा कल दिसून येतो असे गोल्डमनने त्यात म्हटले होते. आपण तीन दरोडे घातल्याचे त्याने स्वतःच कबूल केले आहे. एका केमिस्टच्या दुकानावर कौटुंबिक निवृत्तिवेतनाचा पगार वाटपासाठी घेऊन जाणाऱ्या एका नोकरावर आणि एका फॅशनहाऊसवर हे दरोडे त्याने घातले होते. पण ज्या चौथ्या दरोड्यात झालेल्या खुनांबद्दल त्याला जन्मठेपेची शिक्षा झाली तो गुन्हा केल्याचे त्याने कधीच कबूल केले नाही. तीन दरोडे या माणसाने घातल्याचे तो स्वतःच कबूल करतो तेव्हा चौथाही त्यानेच घातला असला पाहिजे असे गृहीत धरूनच पोलिसांनी या खटल्याची उभारणी केली होती. सध्याच्या न्यायपद्धतीत न्यायमूर्ती आणि ज्यूरी यांचा दृष्टिकोन नैतिक, सांस्कृतिक, राजकीय व सामाजिक पूर्वग्रहांनी बनलेला असतो. गोल्डमन डाव्या गटाच्या चळवळीतील गनिमी सैनिक होता, तो ज्यू होता. वंशद्वेष आणि राजकीय पूर्वग्रह यांचा पगडा न्याययंत्रणेवर असल्याने आपणास पहिल्या खटल्यात न्याय मिळाला नाही अशी त्याची तक्रार होती, खंत होती. 'माझ्यावरील आरोपाचा खरोखर तपास झालाच नाही' असे त्याने आत्मचरित्रात लिहिले आहे.

ज्या गुन्ह्याबद्दल गोल्डमनला जन्मठेपेची शिक्षा झाली होती त्याबद्दल आत्मचरित्रात तो लिहितो, '१९ डिसेंबर १९६९ ला बॅस्टीलजवळील एका डेअरीवर दरोडा घालण्याचे मी ठरविले होते. मला एक मित्र भेटला. त्याच्याजवळ मी हा विचार बोलून दाखविला. ज्या बंदुकीने मी खून करणार होतो ती कोण्या एका बँकेत ठेवलेली बंदूकही मी त्याला दाखविली, पण त्या डेअरीवर दरोडा घालून विशेष काही मिळणार नाही असे दिसून आल्यावर मी तो बेत रद्द केला. जो लोट्रिक या मित्राकडे मी गेलो. तेथे काही ध्वनिमुद्रिका ऐकल्या, जेवण घेतले आणि घरी गेलो. त्याच रात्री एका केमिस्टच्या दुकानावर एका काळ्या माणसाने दरोडा घातला होता, पण गोल्डमनने ज्या मित्राजवळ दरोड्याचा विचार बोलून दाखविला त्याची खात्री झाली की, गोल्डमननेच हा दरोडा घातला आणि त्याने पोलिसांना तसे सांगितले. गोल्डमन हाच गुन्हेगार असे ठरवून पोलिसांनी पुराव्याची रचना केली. ओळखपरेडमध्ये आरोपीस ओळखणे, हा एक महत्त्वाचा पुरावा मानला जातो. ज्या सहा साक्षीदारांनी गोल्डमनला ओळखपरेडमध्ये ओळखले त्यांपैकी एक साध्या वेशातील पोलिस होता. गोल्डमनला हातकड्या घालून ओळखपरेडकडे नेत असल्याचे पोलिसठाण्याच्या पॅसेजमध्येच त्याने पाहिले होते. बाकीच्यांनी त्यास ओळखले, याचे कारण त्याने एकट्यानेच दाढी वाढवलेली होती आणि पोलिसांनी त्याचे जे वर्णन जाहीर केले होते त्याच्याशी गोल्डमनचा चेहरा जुळणारा होता.

गोल्डमनला पहिल्या खटल्यात झालेल्या शिक्षेला जसे पोलिस जबाबदार होते, तशीच काही प्रमाणात वृत्तपत्रेही होती. वृत्तपत्रांनी त्याचे जे फोटो प्रसिद्ध केले होते व त्यासोबत जी माहिती दिली होती त्यावरून पोलिसांचा गुन्हेगार मिळाला, असाच ग्रह होत होता. साक्षीदारांवर त्याचा प्रभाव पडून गोल्डमन हाच गुन्हेगार अशी त्यांची समजूत होणे स्वाभाविक होते.

खटल्याची फेरसुनावणी मात्र अगदी निराळ्या वातावरणात झाली. एखाद्या मनोविकारतज्ज्ञाच्या पद्धतीने न्यायमूर्तींनी खटल्याची सुनावणी सुरू केली. गोल्डमनला ते म्हणाले, 'तुला काय सांगायचे असेल ते सर्व सांग. त्यासाठी तुला पाहिजे तेवढा वेळ घे.'

गोल्डमनला अखेर न्याय मिळाला. खुनाच्या आरोपातून तो निर्दोष सुटला. पहिल्या तीन दरोड्यांबद्दल त्याला बारा वर्षांची शिक्षा झाली होती. त्यांतली सहा वर्षे त्याने आतापर्यंत भोगली असून चांगल्या वर्तणुकीबद्दल त्याला शिक्षेत आणखी सूट मिळेल व तो लौकरच सुटेल अशी बातमी आहे. गोल्डमनने आत्मचरित्र लिहून आपली बाजू प्रभावीपणे मांडली होती. त्याचा प्रभाव पडूनही तो निर्दोषी सुटणे शक्य आहे. पण ज्यांना लेखनाची देणगी नाही, पण गोल्डमनप्रमाणेच निरपराध असून ज्यांना अन्यायाने शिक्षा झाली असेल त्यांना न्याय कसा मिळणार, हा प्रश्न या अनुषंगाने मनात येतो. □

# सोलकढी

## □ जणू काही आगरकर

आपला महाराष्ट्र आणि मराठी माणूस या विषयावर माझे अखंड चिंतन चाललेले असते, हे एव्हाना 'सोलकढी'च्या निष्काळजी वाचकांच्याही लक्षात आलेले असेल. तरीसुद्धा, याच विषयाचे चिंतन करणाऱ्या, यशवंतराव चव्हाण, वि. म. दांडेकर, गोवर्धन पारीख, लक्ष्मणशास्त्री जोशी, सुशीलकुमार शिंदे, देवयानी चौबळ, खुशवंतसिंग, प्रभाकर पाध्ये, नरहर कुरुंदकर, वसंत पळशीकर, महामहोपाध्याय मिराशी, सरोजिनी बाबर, अनिल अवचट, पु. रा. बेहेरे, दुर्गा भागवत, पु. ल. देशपांडे, चंद्रशेखर मराठे, विद्या बाळ, त्र्यं. कृ. टोपे, श्री. वा. काळे, ग. वा. बेहेरे, दादूमिया, दादा कोंडके, ज्योत्स्ना देवधर प्रभृती थोर्थोर विचारवंतांच्याबरोबर माझे नाव न चुकता घेतले जाते तेव्हा मी अगदी संसंकोचून जातो. एकेकाचा स्वभाव, दुसरे काय. नाहीतर, महाराष्ट्रविषयक संशोधनात अनंतरावाने एकट्याने जेवढी मोलाची भर घातली असेल, तेवढी बरोबरच्या सकलसमस्त थोर्थोर विचारवंतांनी एकत्रितपणे घातली असेल, असे म्हणवत नाही. साधे वेडाचे उदाहरण घ्या : महाराष्ट्राला राजकारण, नाटक, बुद्धिवाद अशी तीन वेडे आहेत असे गेली शंभरदीडशे वर्षे मंडळी आपली सवयीने घोकत असायची. पण महाराष्ट्राला भांडखोरपणाचे, शहाणपणाचे आणि गांभीर्याचे अशी आणखीही तीन वेडे आहेत हे, पुरावे देऊन, 'सोलकढी'च्या अनंतरावानेच मराठी वाचकांना प्रथम सांगितले.


अलीकडे महाराष्ट्राच्या आणखी एका वेडाचा शोध मला लागला आहे. एखादा शोध लागण्यासाठी इतरफितर संशोधकांना जसे काहीतरी निमित्त लागते तसे मला लागत नाही; कारण माझे संशोधन निमित्तासाठी खोळंबलेले नसते; स्वयंचलित, फिजूलकिल्ली घड्याळासारखे ते अव्याहत चालूच असते. असो. महाराष्ट्राचे हे आणखी एक वेड म्हणजे दारिद्र्याचे. दरिद्री राहणे, दरिद्री दिसणे महाराष्ट्राला आवडते. आमचे काका सांगायचे, कपडा फाटका असला तरी चालेल; स्वच्छ असला म्हणजे झाले. आणि आगरकरांचा रात्री धुवून सकाळी वाळत घातलेला सदरा स्वच्छ आणि फाटका, दोन्ही असला पाहिजे. आमचे काका, आगरकरांचा हा सदरा नेहमी काढीत. इतके कशाला, आगरकरांचा सदरा त्यांनी आपल्या गाठोड्यात जपून ठेवला होता. खुद्द गोपाळरावांकडून त्यांनी तो मुद्दाम मागून आणला होता, म्हणे. आमच्या लहानपणी पुष्कळ घरांतून असा गोपाळराव आगरकरांचा सदरा दाखवायला ठेवून दिलेला असे. आता आगरकरांच्या मूळ सदऱ्याचे असे अनेक सदरे कसे झाले, ते मला कधीच कळले नाही. तो सदरा शेजारी वाळायला घालून, म्युनिसिपालिटीच्या दिव्याखाली अभ्यास करून दमेकरी आगरकर मोठे झाले. मला आठवते, आगरकरांसारखा मोठा होण्यासाठी एम. ए. होण्यासाठी म्युनिसिपालिटीच्या दिव्याखाली अभ्यास करताना मी, कारण नसताना, त्यांच्यासारखा खोकतसुद्धा असे. म्युनिसिपालिटीच्या दिव्याखाली ज्यावेळी आगरकर अभ्यास करत होते त्यावेळी त्यांना दमा होता का आणि ते खोकत होते का, ते मला नेमके ठाऊक नाही. पण आगरकर आणि दमा यांची अशी काही सांगड माझ्या डोक्यात आहे की, त्यांना जन्मापासून दमा असला पाहिजे असे माझ्यापुरते मी ठरवून टाकले आहे. याच न्यायाने माझ्या बालशिवाजीनेसुद्धा झकास दाढी राखलेली असते. सांगायची गोष्ट अशी की, म्युनिसिपालिटीच्या दिव्याखाली बसून आगरकरांसारखा अभ्यास करताना मी त्यांचे बेअरिंग दम्याखोकल्यासुद्धा अगदी थेट पकडत असे.

सगळे गुण धनाच्या आश्रयाला जातात असे धन्य संस्कृत सुभाषित असेल तर असू दे; दारिद्र्य गुणवानही असते, असा महाराष्ट्राचा भक्कम समज आहे. त्यामुळे सतत उद्योग करून आपले दारिद्र्य टिकवायची धडपड महाराष्ट्र नेकीने करत असतो. अर्वाचीन मराठी साहित्यात दिसणारे श्रीमंत माणसाचे चित्र पाहिले तर, श्रीमंती ही केवढी भयानक गोष्ट आहे ते मनावर बिंबेल. मी तर श्रीमंतीचा फार्फार धसका घेतला आहे. निर्गुण श्रीमंती कोणत्या, मनाच्या मानी मराठी माणसाला मानवेल? (व्वा. ममाममामा—काय अनुप्रास, काय शैली?) त्यामुळे नुकतीच वर्तमानपत्रात आलेली एक हकीगत वाचताना माझी दारिद्र्यनिष्ठा तावूनसुलाखून निघाली.

सुमारे आठ वर्षांपूर्वी, अमेरिकेत, एका पेट्रोलपंपाचा मालक आपल्या मोटारीने लॉस एंजलसला चालला होता. रस्त्यात एके ठिकाणी एक म्हातारा माणूस जखमी आणि असहाय होऊन पडला होता. मोटारवाल्याने म्हाताऱ्याला आधार देऊन गाडीत घेतले आणि एका हॉटेलापाशी सोडले. वर त्याला पंचवीस-पन्नास पैशांइतकी बक्षिसी दिली. काही दिवसांपूर्वी मोटारवाल्याला एक टेलिफोन आला. त्यावेळी हॉवर्ड ह्यूजेसच्या मृत्युपत्रात मोटारवाल्यासाठी एक कोटी डॉलर्स ठेवल्याची बातमी त्याला समजली. तो पार चक्रावून गेला. ज्या म्हाताऱ्याला त्याने साहाय्य केले होते तो होता सर्वांत श्रीमंत अमेरिकन माणूस हॉवर्ड ह्यूजेस. मोटारवाल्याच्या सत्कृत्याची परतफेड त्याने अशी टोलेजंग केली होती. गोष्ट काही येथेच संपत नाही. मोटारवाल्याला अचानक घबाड मिळाल्याचे गावभर झालेच. तेव्हा अनेक प्रकारच्या दलालांनी त्याला भले भंडावून सोडले. अकल्पित धनप्राप्तीचा प्रथम त्याला धक्का बसला; मग श्रीमंतीमुळे ओशाळवाणे वाटू लागले; नंतर त्याच्या कुटुंबाची हीहोलपट सुरू झाली. अखेर त्यांना आपल्याच घरात बंदिवास पत्करावा लागला. तरीही दलालदांडगाई थांबेना. तेव्हा मोटारवाल्याने, पैसे हाताळायचा सराव असलेल्या आपल्या एका ज्ञानी नातेवाईकाला बोलावून घेतले.

तात्पर्य, पैशावर सरकारचे जसे शिक्कामोर्तब असते तसे दुःखाचेही असते. एक दिसते, दुसरे दिसत नाही. म्हणजे इतरांना. महाराष्ट्राला दुसरेच दिसते. ही हकीगत वाचल्यावर माझ्या कित्येक मोटारमोठ्या मित्रांनी रस्त्यात एखादा निःसहाय्य म्हातारा काय, ते पाहायची पद्धत चालू केली आहे. माझ्यापाशी मुदलात मोटारच नाही तेव्हा रस्त्यात विस्कटून पडलेल्या म्हाताऱ्याला मदत करायचा प्रश्नच माझ्याबाबतीत उद्भवत नाही. शिवाय माझी दारिद्र्यनिष्ठा, संधी सापडताच भंगेल इतकी ठिसूळ नाही. त्यामुळे उद्या यदाकदाचित जरी अचानक धनलाभ झाला तरी, त्यापैकी जन्मभर बासमती तांदूळ खाता येईल, एवढेच पैसे माझ्यासाठी ठेवून, उर्वरित पैसे मी एखाद्या समाजहितपरायण संस्थेला देऊन टाकून दारिद्र्यच पत्करीन आणि जणू काही आगरकर होऊन राहीन, असे आश्वासन येथेच देऊन ठेवतो. मग पुढच्या शतकातल्या महाराष्ट्रीय कुटुंबातून माझा सदरा, दारिद्र्याची शिकवण देण्यासाठी जपून ठेवला जाईल.

—अनंतराव



# लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी १९४८-४९

## पु. ल. इनामदार

### प्रकरण नऊ : तर्कनिवेदने ( आर्ग्युमेन्ट्स् )

२७ डिसेंबर १९४८ ला माझ्या तर्कनिवेदनाच्या भाषणाची सुरुवात मी माझ्या तर्कनिवेदनाचा आराखडा सांगून केली होती. मी माझे तर्कनिवेदन दोन विभागांमध्ये करणार असल्याचे सांगितले. एक गोपाळ गोडसे अभियुक्ताच्या बचावाचे आणि दुसरे अभियुक्त डॉ. परचुरे यांच्या बचावाचे. बचावपक्षाची तर्कनिवेदने करणाऱ्या वकिलांमध्ये सगळ्यांत लहान म्हणून आठ अभियुक्तांच्या क्रमांकाप्रमाणे अभियुक्त क्रमांक ६ व ८ चा वकील म्हणून शेवटच्या क्रमांकाने उभे राहणे मला सोयीस्करच ठरले होते. कारण माझ्यापूर्वी आपापले तर्कनिवेदन करून गेलेल्या माझ्या श्रेष्ठ सहयोगी वकिलांनी अभियोगपक्षाच्या पुराव्याची विस्तृत चर्चा केली होती. तसेच अभियुक्त क्रमांक १ नथूरामने अभियोगपक्षाच्या पुराव्याची केलेली मीमांसा कोणत्याही वकिलाच्या तर्कनिवेदनाहून कमी योग्यतेची खासच नव्हती, असे म्हणून मी या सगळ्या जेष्ठ सहकाऱ्यांचे नि अभियुक्त क्रमांक १ चे ऋण नम्रपणे स्वीकार केले होते. या सगळ्यांनी अभियोगपक्षाच्या मुंबई, पुणे, दिल्ली येथील पुराव्याची विस्तृत चर्चा केली होती व त्यांपैकी काहींनी ग्वाल्हेरच्या पुराव्याची थोडीफार चर्चा केली होती, हे मान्य करून मी माझे काम हलके झाल्याबद्दल त्यांचे आभार मानले होते. मुंबईचा सार्वजनिक सुरक्षा कायदा दिल्ली प्रांताला या अभियोगाकरताच खास विशेषाधिकारान्वये लागू केल्याने त्या अनुषंगाने या लालकिल्ल्यामध्ये चाललेल्या अभियोगावरही काय काय परिणाम झाले आहेत हे दाखविण्याचा नम्र प्रयत्न मी करणार आहे असे सांगितले. नव्या भारतीय राष्ट्राच्या राजकारणी सत्ताधिशांना हा अभियोग लालकिल्ल्यातील न्यायालयात चालविणे का बरे सुचले ? लालकिल्ल्यातील न्यायासनापुढे राजसत्तेच्याविरुद्ध बंड करून उठलेल्या स्वातंत्र्यवीरांविरुद्ध अभियोग चालविण्याचा पायंड भारतात पूर्वीच्या ब्रिटिश सत्ताधीशांनी घालून दिला. त्याचेच अनुसरण करून महात्मा गांधी खून खटल्यालादेखील भारतीय शासनाविरुद्ध बंड करून उठणाऱ्या बंडखोर स्वातंत्र्यसैनिक अभियुक्तांच्या श्रेणीत बसविण्याचा भारत शासनाचा विचार होता काय? याच लाल किल्ल्यात नुकत्याच चालविल्या गेलेल्या अभियोगात स्वातंत्र्यसेनानी सुभाषचंद्रांच्या चार सहाय्यक स्वातंत्र्यसैनिकांना सैनिकी न्यायालयापुढे उभे करून त्यांचा सैनिकी कायद्याने न्याय करण्याचे ब्रिटिश सत्ताधिशांचे धोरण या महात्मा गांधी खून खटल्याकरता मुंबईच खास कायदा येथे लागू करून, लालकिल्ल्यामध्ये एक विशेष न्यायालय उभे करून या खटल्याचाही निर्णय करण्याचे शासनाने ठरविले आहे हे का ? मला सुचणारे या दोन अभियोगांतील साम्य मी बोलून दाखवितो याला कारण सध्याचे भारतीय सत्ताधीशच आहेत असे मी सांगितले व मलाच काय, पण या न्यायालयासमोर आलेल्या सगळ्या अभियुक्तांना या वातावरणाचा तडाखा बसणार आहे का या शंकेने माझे मन तळमळते असेही सांगितले होते.

अशा रीतीने सर्वसाधारण टीका करून मी अभियुक्त गोपाळ गोडसेच्या वतीने बोलावयास आरंभ केला होता. जानेवारी १९४८ मध्ये गोपाळभोवती काय परिस्थिती होती याचे चित्रण मी पुराव्यात आलेल्या निर्देशांच्या आधारावर रंगविण्यास सुरुवात केली. गोपाळ हा नथूरामचा धाकटा भाऊ. पण नथूराम आपले आईवडील व इतर भावांपासून वेगळा राहत असे आणि अभियोगपक्षाच्या पुराव्यात असे कुठेही, कोणीही सांगितले नव्हते की, १७ जानेवारी १९४८ पूर्वीच्या नथूरामच्या कोणत्याही हालचालीमध्ये किंवा राजकारणामध्ये

गोपाळने कधीही, कोणत्याही प्रकारचा कायिक अथवा वाचिक भाग घेतला होता. अभियोगपक्षाच्या पुराव्यावरूनच हे कोर्टासमोर आले होते की, गोपाळ हा लग्न झालेला कुटुंबवत्सल प्राणी होता; पुण्या-जवळच्या खडकी कॅन्टोनमेन्टमध्ये राहत होता नि खडकीच्या सैनिक छावणीमधल्या कार्यालयात कर्मचारी होता. गोपाळ गोडसेने १७ जानेवारीपासून २३ जानेवारी १९४८ पर्यंत 'मला माझ्या खेड्यावर उकसाण, तालुका मावळ, जिल्हा पुणे येथे–खाजगी कामाकरता जायचे आहे' असे कारण दाखवून सात दिवसांची रजा मागितली होती व मौजे उकसाण येथील आपला पत्ता तेथील श्री. बाबुराव धामणकर यांच्याकडचा दिला होता व ह्याबाबतचे अर्ज अभियोगपक्षाने अभियोग प्रदर्श क्र. १३२ व १३२अ असे पुराव्यात दाखल केले होते. चौकशी पोलिसांनी उक्त श्री. बाबुराव धामणकरांचे धारा १६४ क्रि. प्रो. कोड अनुसार मॅजिस्ट्रेटसमोर लिपीबद्ध कथनही करवले होते. परंतु श्री. बाबुराव धामणकरांचे नाव अभियोगपक्षाच्या साक्षीदारांच्या नामसूचीमध्ये लिहिले नव्हते, की त्यांचे मॅजिस्ट्रेटसमोर दिलेले कथन कोर्टासमोर दाखल केले नव्हते. अभियोग साक्षीदार क्रमांक १३४ श्री. सी. ए. पिन्टो या पोलिस अधिकाऱ्याने गोपाळला दिनांक ५–२–१९४८ रोजी कामशेत–उकसाण रस्त्यावर अटक केल्याचे सांगितले व त्यावेळी गोपाळजवळ एक खाकी रंगाची कापडाची पिशवी अभियोग वस्तु प्रदर्श क्र. ५४ मिळाल्याचेही सांगितले होते, पण गोपाळला अटक करतेवेळी झालेल्या कार्यवाहीचे पंच, साक्षीदार कुणी नव्हते, की अटकेचा पंचनामा किंवा वस्तू गोपाळजवळ मिळाल्याचा पंचनामा पिन्टो यांनी बनवला नव्हता, की उकसाणशी संबंधित पोलिस ठाण्यावर यासंबंधी काही नोंद केली नव्हती. गोपाळ त्यावेळी उकसाणकडे जायला निघाला होता, की उकसाणहून परत येत होता याबद्दलसुद्धा पोलिस अधिकारी साक्षीदारांच्या तोंडी कथनाव्यतिरिक्त दुसरा काही पुरावा नव्हता. अपराधसंबंधी विधिसंग्रहाच्या नियमाप्रमाणे सर्व कार्यवाही का केली नाही असा प्रश्न विचारून मीच त्याचे उत्तर न्यायाधीश महोदयांना सुचविले ते असे की, प्रदर्श क्र. ५४ ही खाकी पिशवी गोपाळची नव्हतीच मुळी आणि ती ५–२–४८ रोजी गोपाळजवळून पोलिसांनी मिळविली होती हेही खरे नव्हते. ही पिशवी कुणाची हे या अभियोगपर्वातल्या साक्षीदारांपैकी कुणीच 'आपली आहे' म्हणून सांगत नव्हते. ही पिशवी बडगे याची होती व ती गोपाळच्या माथी मारायचा बडगेचा डाव होता. स्वतः पकडले जाताच आपल्याजवळची पिशवी पोलिसांना देऊन ती गोपाळच्या नावे टाकून गोपाळला–नथूरामच्या भावाला–या अभियोगपर्वात गोवण्याचे कारस्थान सारे बडगेचे. कटाच्या कारस्थानाच्या पुराव्याच्या साखळीतली एक महत्त्वाची कडी असे स्वरूप देण्याचे कारस्थान बडगेच्या मदतीने पोलिसांनी रचले व त्यासाठी अटक व पुराव्यातला 'मुद्देमाल' मिळवला. यासंबंधीच्या साऱ्या नियमांना धाब्यावर बसवून हे पिन्टोमहाशय कोर्टाला सांगत आहेत की, 'मी म्हणतो की, ही पिशवी गोपाळजवळ मला सापडली!' पिन्टोमहाशयांनी कोर्टासमोर कबूल केले आहे की, त्यांनी गोपाळला पकडल्यावर गोपाळ दि. १७ जानेवारीपासून अटकेच्या दिवसांपर्यंत खडकी येथील त्याच्या घरी किंवा सैनिकी छावणीमधल्या त्याच्या कार्यालयात, किंवा उकसाण या खेड्यावर कधी होता की नाही, आणि होता तर कधी, कुठे व कोणकोणत्या दिवशी याची काही चौकशी केली नाही. अशारीतीने पोलिसांनी गोपाळच्या खडकी नि उकसाणबाबतच्या वास्तव्याच्या पुराव्याला दडपून टाकून बडगेला स्वच्छंदपणे गोपाळचे वास्तव्य दिल्लीला होते असे म्हणायला मोकळीक करून ठेवली. 'मी दिल्लीला गेलो नव्हतो, तर त्या दिवसांत उकसाणला होतो' असे गोपाळने म्हणावे, तर त्याचा पुरावा कोण देणार? उकसाणच्या श्री. बाबुराव धामणकरांना ३० जानेवारीनंतरच्या जाळपोळीत समाजकंटकांनी पोळून ठेवले होते आणि आरक्षी दंडधारींनी श्री. बाबुरावांचे धारा १६४ क्रि. प्रो. कोडान्वये कथन घेऊन त्यांना बचावपक्षाची साक्ष देता येऊ नये याची पूर्ण व्यवस्था करून ठेवली होती. आधीच ब्राह्मण नि त्यावर गोडसे कुटुंबाचा संबंधी या दुहेरी दोषांनी अपंग झालेले बाबुराव धामणकर या लालकिल्ल्यातील कोर्टात येण्याचे पुन्हा धाडस करू शकतील का? असा कोर्टालाच मी प्रश्न विचारून म्हटले की, 'तरी पण अभियोगपक्ष म्हणणार की, गोपाळने आपल्या बचावाचा काही पुरावा दिला नाही, तेव्हा आमचा 'ओळख सांगे' साक्षीदारांचा पुरावा नि बडगे माफी साक्षीदाराचा पुरावा हा खरा!' अभियोगपक्षाचे दिल्लीच्या घटनांचे सारे 'ओळख सांगे' साक्षीदार आपापल्या परीने कसे अविश्वसनीय आहेत हे प्रत्येक साक्षीदाराच्या कथनावरून सांगितले. ही सगळी कथने अर्धसत्ये सांगत आहेत, स्वतः विषयांच्या खऱ्या घटनांमध्ये गोपाळचे नाव घालून त्या असत्याला अर्धसत्याने खरे भासवीत आहेत. ओळखपरेडी, पोलिसांनी गोपाळला पकडल्यावर, तब्बल एक महिन्याच्या कालावधीनंतर सगळ्या साक्षीदारांना वरळी प्रशिक्षण केंद्राची हवा दाखवून मुंबईला करविल्या होत्या व या शिबिराची वारी गटागटाने करणाऱ्या साक्षीदारांच्या ओळखीवर भरंवसा ठेवावा असे अभियोगपक्ष म्हणत होता. वरळी येथे पोलिसांजवळ अभियुक्त बंदी तर होतेच पण अभियुक्तांचे काढलेले फोटोही होते. हस्ताक्षर ओळखीची विद्या सांगणारे साक्षीदार गज्जरही होते. संशयास्पद अक्षरासारखे अक्षर अभियुक्तांना काढायला लावून मग दोन्हींच्या तुलनेवर आधारलेले मत ठोस पुरावा म्हणून कोर्टासमोर मांडण्यात येत होता. ज्या दिल्लीच्या हॉटेलचे 'ओळख सांगे' साक्षीदार आले त्या हॉटेलच्या 'पाहुण्यांच्या नोंदवही' वरून ह्या हॉटेल चालकांना हॉटेलमध्ये बायका पुरविण्याचा धंदा करण्याच्या संशयाची ताकीद मिळाली होती! अभियोग साक्षीदार आंगचेकर हा सिंध पाकिस्तानमधून मुंबईला आलेला निर्वासित नि १५ जानेवारी ते २० जानेवारीच्या दरम्यानच्या काळात दिल्लीची वारी त्याने केली होती हे पोलिसांना कळले असावे. आंगचेकरामध्ये पोलिसांचा साक्षीदार बनण्याची जातकुळी होतीच. त्यावर आणखी दिल्लीच्या वारीची मीठमिरची. पोलिसांना यापेक्षा दुसरा दैवायत्त साक्षीदार कशाला हवा? या साक्षीदाराने तोंडभरून गोपाळची तोंडओळख–काही अल्पशा वेळां-

## 'मी म्हणतो की, ही पिशवी गोपाळजवळ मला सापडली!'

तली—गोपाळला करकरे व मदनलालच्याजवळ हॉटेलमध्ये बसलेला—पाहिले म्हणून सांगितली. मदनलालचे दिल्लीचे वास्तव्य ही खरी गोष्ट, पण त्यावर आंगचेकरची मीठमिरची करकरे नि गोपाळची; असे मी मांगितले. या साक्षीदाराचे कथन अभियोगपर्वाच्या अगदी सुरुवातीच्या दिवसातच झाले होते. माफीचा साक्षीदार बडगेच्या साक्षीच्या पुष्कळ पूर्वी. मी पोलिस साक्षीदारांची अर्धसत्ये नि अर्ध-असत्ये म्हटली ती याच सगळ्या साक्षीदारांना अनुलक्षून. हा सगळा 'ओळख सांगे' पुरावा स्वयंसिद्ध अतिशय संशयास्पद जातीचा आहे नि तो माफीच्या साक्षीदाराच्या कथनाचा पुष्टीकर्ता होऊ शकत नाही, एवढेच नव्हे तर, खुनाच्या कटाच्या पुराव्याच्या साखळीची कोणतीही महत्त्वाची कडी मानावयाजोगी या पुराव्यांची लायकी नाही असे मी परोपरीने सांगितले. गोपाळ गोडसेकरवी आक्षेपजनक वस्तूंचा मुद्देमाल असा काही मिळाला नव्हता. पुण्याच्या दोघा ब्राह्मण साक्षीदारांना गोडसे मंडळींची ओळख असल्याच्या आधारावर वरळीच्या प्रशिक्षण केंद्रात ठेवले होते. गोपाळने दिलेल्या माहितीवरून हे साक्षीदार सापडले, असे सांगण्यात आले. या साक्षीदारांनी गोपाळने एका टॉवेलात गुंडाळलेले हत्यार लपवून ठेवण्यासाठी आम्हाला जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात दिले होते असे सांगितले पण ते हत्यार या साक्षीदारांनी पुण्याला फर्ग्युसन कॉलेजच्या रस्त्यावर टाकून दिले होते व ते मिळाले नाहीच, असे निष्पन्न झाले. उपलब्धि केवळ शासकीय आरक्षी अतिथीगृहात अतिथी देव झालेल्या दोन ब्राह्मणांची मौखिक साक्ष ! निष्पक्ष न्याय करू पाहणाऱ्या न्यायासनासमोर किंमत काय अशा भयभीत साक्षीदारांच्या साक्षीची ?' शेवटी उपसंहाररूपाने गोपाळ गोडसेचे चित्र मी वर्णन केले ते असे की, 'गोपाळ हा कुटुंबवत्सल तरुण, नथूरामच्या व्यावसायिक अथवा राजकारणी जीवनापासून वास्तविक 'मीलो दूर' राहणारा नि सैनिक छावणीच्या कार्यालयात इमानेइतबारे नि कोणत्याही रीतीने दोषभाक् न होता शासकीय सेवा करणारा होता. १७ जानेवारीपासूनच्या पुढील सात दिवसांसाठी कार्यालयीन अनुपस्थितीचे निवेदन त्याने आपल्या उकसाण या खेड्यावर जाण्यासाठी अभावितपणे दिले पण दैवदुर्विलसिताने याच दिवसांत नथूरामचे दिल्लीला प्रयाण झाले. नथूरामच्या राजकारणी हालचालींचा गोपाळच्या सरकारी नोकर व संसारी माणूस या जीवनाशी काही संबंध नव्हता. गोपाळने आपल्या निवेदनात दिलेले अनुपस्थितीचे कारण खोटे आहे हे अभियोगपक्षाने सिद्ध करण्याचा प्रयत्नही केला नाही. उलट गोपाळ हे कारण सिद्ध करू शकणार नाही याची खात्री ब्राह्मणांविरुद्ध उठलेल्या जाळपोळ, मारहाण अभियानावर विसंबून नि बाबुराव धामणकरांचे तोंड धारा १६४ क्रि. प्रो. कोडान्वये घेतलेल्या कथनाने गच्च आवळून ठेवण्याची दक्षता घेऊन करून ठेवली. अशा रीतीने एकीकडे गोपाळच्या अनुपस्थिती—बचावाची अभियोगपक्षाने गळचेपी केली आहे, तर दुसरीकडे वरळी मुंबईच्या शासकीय शिबिराची वारी घडविलेल्या 'ओळख सांगे' साक्षीदारांची पलटण न्यायालयासमोर उभी करून अविश्वसनीय माफी साक्षीदारांची रुजुवात दुसऱ्या अविश्वसनीय 'ओळख सांगे' साक्षीने करण्याचा दावा अभियोगपक्ष करीत आहे. गोपाळ गोडसे अभियुक्तांचे प्रश्नपरीक्षण पोलिसांनी वरळीच्या नव्या सी. आय. डी. कार्यालयात केले असे समजले. पण 'या प्रश्नपरीक्षणाच्या वेळी काय काय घडले हे केवळ अभियुक्त गोपाळला माहिती की प्रश्नपरीक्षण करणाऱ्या चौकशी अधिकाऱ्याला माहिती. यासंबंधी बचावाच्या रूपाने अभियुक्त गोपाळला काही सांगायचे असले तरी त्या अभियुक्ताच्या सांगण्यावर मी बचावाची इमारत उभी करू शकत नाही. कारण असा खरा पुरावा शपथेवर सांगायला कोर्टासमोर उभा राहणारा प्रश्नपरीक्षक पोलिस अधिकारी अजून भारत भूमीवर तरी जन्माला यायचा आहे !' माझ्या न्यायप्रिय वाचकांना मी येथे इतकेच सांगतो की, सत्य हे पुष्कळदा फार एकाकी असते नि ते न्यायालयासमोर सिद्ध करणे जवळ जवळ अशक्य असते. असो. अशा रीतीने मी गोपाळ गोडसेच्या बचावाचे माझे तर्कनिवेदन २८ डिसेंबर ४८ च्या संध्याकाळपर्यंत पुरे केले होते.

बुधवार दि. २९ डिसेंबरला सकाळी कोर्टात जाताना माझ्या डोक्यात कामाचे विचार चालूच होते. काल गोपाळचे काम तर संपल्यासारखेच आहे. आज लवकरच ग्वाल्हेरच्या कामाकडे वळले पाहिजे—म्हणजे डॉ. परचुऱ्यांच्या कामाकडे. ह्याच डॉ. परचुऱ्यांविषयी भोपटकर म्हणाले आहेतना की, डॉ. परचुरे निश्चित फाशी जाणार ! एखाद्या शापवाणीप्रमाणे ती आठवण मला छळीत असे व मी परचुऱ्यांना वाचवू शकेन का अशा साशंक प्रश्नाने मी घाबरून जात असे. त्या दिवशी अशा विकल मनःस्थितीतच कोर्टात जात असताना दर्यागंज ओलांडून दिल्लीच्या जामा मशिदीच्या भव्य पवित्र स्थानाला वळसा घालून जाताना मी अभावितपणेच त्या पवित्र स्थानाकडे बघून मान लवविली ! याची मला अजून स्पष्ट आठवण आहे. कारण मी मान लवविताच माझ्या मनावरचा ताण एकदम कमी झाल्यासारखे मला वाटले नि टॅक्सीमध्येच एकदम ताठ बसून लालकिल्ल्यात—कोर्टात—केव्हा पोचतो हे बघायला लागलो होतो ! माझे विचार रुपेरी पडद्यावरचा लेख वाचावा तसे माझ्या डोळ्यांसमोर मला दिसायला लागले होते !

दि. २९ ला मी सुरुवातीसच खुनाच्या कटाबाबत पुन्हा थोडी चर्चा केली आणि त्यामध्ये दफ्तरींनी उभ्या केलेल्या मुद्यांपैकी काहींना उत्तरे देण्याचा प्रयत्न केला होता. हे मुद्दे होते नथूराम, आपटे व मदनलाल यांच्या विषयीचे. पण खुनाच्या कटाचा आरोप या सगळ्यांबरोबरच गोपाळ गोडसेवरही होताच. म्हणून गोपाळचा वकील म्हणून मी माझे तर्कनिवेदन या बाबतीतही सांगणार होतो. याच संदर्भात मी साक्षीदार त्रयी प्रोफेसर जगदीशचंद्र जैन, माननीय मोरारजी देसाई व अंगदसिंग या साक्षीदारांच्या पुराव्याची चर्चा केली. या संदर्भाने मला पोलीस साक्षीदार श्री. जे. डी. नगरवाला स्पेशल कमिशनर पोलीस, मुंबई, यांच्याबद्दलही बोलावे लागले. माझ्या तर्कनिवेदनाचे स्वरूप असे की, या तिन्ही व्यक्ती खरे बोलतात, की खोटे बोलतात हा विचार क्षणभर बाजूला ठेवून या साक्षीदारांचा साधी माणसे म्हणून विचार करू या. यांतले एक विद्याविभूषित जैनी प्राध्यापक, दुसरे महात्मा गांधींचे विश्वासू अनुयायी श्री. मोरारजीभाई देसाई आणि त्यावर मुंबई प्रांताच्या आरक्षी विभागाचे खाते सांभाळणारे गृहमंत्री. यांना २१ जानेवारी १९४८ ला, म्हणजे मदनलालने महात्माजींच्या प्रार्थनासभेत बॉम्बस्फोट केला या घटनेच्या दुसऱ्या दिवशीच कळले की, 'हा मदनलाल सांगत होता की,

त्याचे साथीदार महात्माजींचा खून करण्याच्या प्रयत्नात आहेत ! नि प्रोफेसर महाशय मदनलालला ओळखतात.' राष्ट्रपित्याच्या खुनाच्या कटाचे वर्तमानही प्रोफेसरमहाशय गृहमंत्र्यांना सांगतात की, 'ही बातमी मी सांगितली असे कुणाला–पोलिसांनाही–सांगू नका हं !' हे वर्तमान मुख्यमंत्री श्री. बाळासाहेब खेर यांच्या कक्षेमध्येच गृहमंत्र्यांना सांगितले गेले. पण मोरारजीभाई मुंबईच्या पोलिस प्रमुख नगरवाला यांना भेटायचा नुसता प्रयत्न करतात; आज्ञा देऊन जेवत असाल तर हात धुवायला माझ्याकडे या अशी तातडी दाखवीत नाहीत. रात्री मोरारजीभाईंना अहमदाबादेला वल्लभभाई पटेलांना भेटायला जायचे असते तेव्हा म्हणे स्टेशनवर नगरवाला येऊन मोरारजीभाईंना भेटले नि मोरारजीभाईंनी पोलिस प्रमुखाला हे वर्तमान सांगितले ते किंवदंतीच्या रूपात. मोरारजीभाईंनी ही बातमी देणाऱ्या प्रोफेसर जैनांचे नाव नगरवालांना सांगितले नाही. नगरवाला काय किंवा गृहमंत्री काय दोघांनीही ही बातमी आपल्याला आज कळली याची विधिवत् नोंद करण्याचे कर्तव्यसुद्धा केले नाही. प्रार्थनासभेतल्या बॉम्बस्फोटाच्या संदर्भातही राष्ट्रपित्याच्या खुनाच्या कटाची बातमी होती पण तिला योग्य ते महत्त्व देण्याची साधी बुद्धी या शिक्षित नि सत्ताधारी मंडळींनी कशी दाखवली नाही ? त्यानंतर २४ जानेवारीच्या सुमारास प्रोफेसर महाशय पुन्हा मोरारजीभाईंना भेटतात तरीपण प्रोफेसर मजकुरांचे नाव मोरारजीभाई नगरवालांना सांगत नाहीत. ह्या काळात नगरवालांना दुसरीकडून मिळालेल्या सूचनांवर नगरवालांनी म्हणे पुण्याला बडगेच्या घराची 'गुपचुप पाळत' ठेवण्याचे हुकूम दिले होते ! पण या हुकुमाचा लेख पुराव्यात नाही की, हुकूम कार्यान्वित केल्याचा पुरावा नाही–जसा ग्वाल्हेरचा पहिलाच पोलिस कॉन्स्टेबल साक्षीदार दंडवते आदि फरारींचा शोध मी स्वतः करीत असल्याचे सांगत होता तसा ! अशा आरामात राष्ट्रपित्याच्या खुनाच्या कटाचे वर्तमान उराशी बाळगीत प्रोफेसर महाशय व गृहमंत्री महाशयही ३० जानेवारी दिवस उजाडू देतात. त्यानंतर राष्ट्रपित्याची हत्या झाल्याचे वर्तमान येऊन थडकते. त्यावर झोपी गेलेला जागा झाल्याच्या थाटात घाई गर्दी होते म्हणे. तरीपण २ फेब्रुवारीपर्यंत श्री. मोरारजीभाई प्रोफेसर जैनांचे नाव नगरवालांना सांगत नाहीत. जैनांचे नाव केव्हा कळले याचीही नोंद नाही, की नगरवाला प्रोफेसर महाशयांचे परीक्षण करीत नाहीत. गांधीजींच्या हत्येच्या गुन्ह्याचा तो कट होता या धोरणाने शीघ्रातिशीघ्र तातडीने अनुसंधान करावे असे फर्मान मोरारजीभाई सोडतात. पण...नगरवालांनी दि. १३ फेब्रुवारीला परीक्षण केले, पण ते कुणाचे ? प्रोफेसर जैनांचे नाही, तर माननीय गृहमंत्री मोरारजीभाई देसाई यांचे. ते लिहून घेतल्यावर प्रोफेसर मजकुरांचे परीक्षण घेतले जाते ! खुद्द गृहमंत्र्यांनीच खुनाच्या कटाचे कथन लिहून दिल्यानंतर प्रोफेसर जैन त्याहून काय कमी सांगणार ? त्यांनीही मोरारजीभाईंची री ओढली. याच भाऊगर्दीत अंगदसिंग नावाचे गृहस्थ उगवून कटाच्या बातमीचे गुपित उराशी बाळगून होते हेही दिसले नि मग 'मदनलालने प्रोफेसर जैनांना दिल्लीला जाण्याच्यापूर्वीच महात्माजींच्या खुनाचा कट त्याचे साथीदार करीत आहेत हे सांगितले होते.' या कहाणीचे–या सनसनाटी नाटकाचे सूत्र-स्क्रिप्ट-तयार झाले. नाही तरी नाटकाचा सांगाडा उभा करताना नाट्यमयता हा पहिला निकष. तेव्हा मूळ कथानकाचे सूत्र व नाटकामधले प्रवेश यांची क्रमवारी जुळवणे यात फरक पडतोच. माझे म्हणणे होते की, मान्यवर मंडळी मुळातल्या घटनेला सहा महिन्यांवर अधिक काळ उलटून गेल्यावर–तसे म्हटले तर तीस जानेवारी नि तेरा फेब्रुवारी या काळातल्या गांधीजींच्या हत्येच्या कटाच्या बातमीमधले कालक्रमाचे सूत्र उलगडताना सगळी गुंतागुंत करीत आहेत. आधी काय नि मग काय याचा निर्णय करू न शकल्यामळे नगरवालांनी प्रथम मोरारजीभाईंचे प्रश्नपरीक्षण करण्याची धूर्तता दाखवली व मोरारजीभाईंच्या सुरात सूर मिळवायला प्रोफेसर जैन तयार होणे विशेष आश्चर्य नव्हते. अंगदसिंग तर काय एक सामान्य मनुष्य. प्रोफेसर नि गृहमंत्री यांपेक्षा वेगळे तो काय सांगणार ? पण असे जरी असले, तरी न्यायासनासमोर साक्षीदाराच्या व्यक्तित्वाला किंवा तोंडी कथनाला किंमत नसून साक्षीदारांच्या वागण्यावरून त्याच्या कथनाचा अर्थ लावणे अधिक बरोबर. गुन्ह्याची बातमी तात्काळ पोलिसांच्या रोजनिशीमध्ये लिहिली गेली म्हणजे त्यावरून गुन्ह्याच्या कहाणीचे सूत्र नीट उलगडते. हा व्यवहार अपराधासंबंधी विधिसंग्रहात आवश्यक मानला आहे. पण येथे तर ही रोजनिशी न पोलिस कमिशनरांनी लिहिली न गृहमंत्र्यांनी. न प्रोफेसर मजकुरांनी लिहवली न अंगदसिंगने लिहवली. अशा स्थितीत सत्यासत्याचा निवाडा साक्षीदाराच्या वागणुकीवरून करायचा म्हटले तर, या साक्षीदारांना राष्ट्रपित्याच्या हत्येच्या कटाची पूर्वसूचना तीस जानेवारीपूर्वी मिळाली असे म्हणणे सयुक्तिक नाही. कारण विद्वत्ता, अधिकार नि राष्ट्रपित्याविषयी आदर, निष्ठा, प्रेम सगळे काही वाटणारे भारतभूमीचे हे सुपुत्र असे भोंगळपणे वागतात याची कल्पना तरी करवते का ? २० जानेवारीच्या बॉम्बस्फोटाच्या पार्श्वभूमीवर या सुपुत्रांना हत्या कटाची बातमी कळून तीस जानेवारीपर्यंत झोप तरी कशी आली ? या सुपुत्रांनी तीस जानेवारीपर्यंत काही लक्षणीय हालचाल केली नाही याला अर्थ केवळ एकच उरतो की, हालचाल करण्याजोगी काही बातमी या कुणाही सुपुत्रांना तीस जानेवारीपूर्वी कळली नव्हती. बॉम्बस्फोट करणाऱ्या मदनलालची प्रोफेसर जैनांशी ओळख होती या 'पराचा' तीस जानेवारीनंतर मदनलालने हत्येच्या कटाची बातमी पूर्वीच सांगितली हा 'कावळा' तयार होणे अधिक सयुक्तिक.

खुनाच्या कटाबद्दलचे माझ्या पक्षकारांव्यतिरिक्त इतर सामान्य चर्चा म्हणून काही मुद्दे ३०–४० मिनिटांत सांगून झाल्यावर मी माझ्या मुख्य कामाला–डॉ. परचुरे यांच्याविरुद्ध असलेल्या अभियोगपक्षाच्या पुराव्याबद्दल तर्कनिवेदन करण्यास–आरंभ केला. मी सुरुवातीसच डॉ. परचुऱ्यांचे व्यक्तित्व, डॉक्टरांच्या कुटुंबाविषयी, त्यांच्या डॉक्टर म्हणून सरकारी नोकरीविषयी, त्यांची राजकारणी

**'पण....नगरवालांनी १३ फेब्रुवारीला परीक्षण केले, पण ते कुणाचे ?'**

मते, आकांक्षा व डॉक्टरांचे समाजातले व राजकारणातले स्थान ह्यांविषयी, कोर्टाच्यासमोर आलेल्या पुराव्यावरून संदर्भ देत सांगितले आणि मग दिनांक २४ जानेवारी १९४८ ला डॉक्टरांनी स्वतःच्या नेतृत्वाखाली ग्वाल्हेरच्या मोतीमहाल सचिवालयासमोर, ग्वाल्हेरच्या महाराजांनी ग्वाल्हेर काँग्रेसी नेत्यांच्या हाती राज्यकारभाराची सूत्रे सोपविण्याचा व त्यांना मंत्रिपदाची शपथ देवविण्याचा जो समारंभ केला, त्याविरुद्ध ग्वाल्हेर राज्य हिंदुसभेच्या कार्यकर्त्यांकडून व जनतेकडून जे विराट निदर्शन केले गेले व असंतोष व्यक्त केला गेला त्याचे वर्णन करून त्या असंतोषाची पार्श्वभूमी सांगितली. ग्वाल्हेरमध्ये हिंदुसभा पक्षाचा बोलबोला होता. मतमोजणीचा आधार घेतला असता तर, हिंदुसभा पक्षच बहुमताने पुढे आला असता वगैरे सांगून त्या पक्षाचे प्रमुख म्हणून डॉक्टर परचुरे यांच्या व त्यांच्या पक्षाच्या हातीच जनतेचे प्रतिनिधी म्हणून राज्यसूत्रे सोपविणे कसे अधिक उचित, अधिक न्यायसंगत होते, हे दाखविले. ग्वाल्हेर महाराजांचे हे करणे ' केवळ काँग्रेसी नेत्यांना २४ जानेवारीला मंत्री बनवणे ', २० तारखेच्या दिल्लीच्या बॉम्बस्फोटाच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसपुढे शरण जाण्यासारखे होते. त्याहून अधिक महत्त्वाची पार्श्वभूमी अशी की, महाराजांनी जनतेच्या प्रतिनिधींवर राज्यकारभार सोपवावा, ही मागणी हिंदुसभा पक्षाबरोबर काँग्रेस पक्ष, मुस्लिम नेते व अन्य फुटकळ नेते सर्वचजण करीत होते. तेव्हा सर्वांत प्रभावी असलेल्या हिंदुसभा पक्षाच्या नेतेमंडळींना वगळून केवळ काँग्रेस पक्षालाच राज्यकारभार हाती घेण्यास पाचारण करावे, काँग्रेसीनेत्यांनी हे आमंत्रण स्वीकारावे याबद्दल स्थानिक काँग्रेसी नेत्यांविषयी जनतेकडून तिरस्कार दाखविला जात होता. काँग्रेस पक्षाच्या ह्या विश्वासघातकी कृत्याला डॉक्टरांच्या विरुद्ध उठविणारे ग्वाल्हेरचे आर. एस. एस. चे नेतेही होते, अशी डॉक्टरांची समजूत होती. कारण आर. एस. एस. ला विरोधी अशी हिंदुराष्ट्रसेना चालविणारे डॉक्टर आर. एस. एस. च्या डोळ्यांत सलत होते वगैरे वर्णन अभियोगपक्षाच्या पुराव्यातले उतारे वाचून दाखवून मी सांगितले. डॉक्टर परचुऱ्यांचा असंतोष जानेवारीच्या त्या शेवटच्या सप्ताहात ग्वाल्हेर महाराजांच्या शरणागतीविरुद्ध होता तसेच लोकतांत्रिक शासनाची मागणी करणाऱ्या सहयोगी पक्षाचा विश्वासघात करणाऱ्या स्थानिक काँग्रेसी नेत्यांविरुद्ध होता; आणि जेव्हा तेव्हा डॉक्टरांचे पाय ओढून त्यांचा अपमान करू पाहणाऱ्या स्थानिक आर. एस. एस. नेत्यांविरुद्ध होता. हा सगळा असंतोष स्थानिक होता, स्थानिक कारणांसाठी होता. या असंतोषाचे कारण अथवा लक्ष्य ग्वाल्हेरच्या बाहेरच्या राजकीय वा अन्य गटांमध्ये मुळीच नव्हते, हे मी अभियोगपक्षाच्या साक्षीदारांनीच कसे कबूल केले आहे ते दाखवून सांगितले. डॉक्टरांचे व हिंदुसभा पक्षाचे २४ जानेवारी १९४८ चे निदर्शन जोरदार झाले होते, याची बातमी हिंदुस्थानभरच्या वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाली होती. पण त्याचा ग्वाल्हेर संस्थानबाहेरच्या राजकारणाशी काही संबंध नव्हता. ही १९४८ च्या जानेवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यातली – विशेषतः २४ जानेवारी व त्यानंतरची ग्वाल्हेरची परिस्थिती व डॉक्टरांच्या असंतोषाचे स्वरूप !

या डॉक्टरांच्या घरी दिनांक २८ जानेवारीला दुपारी पुण्याचे हिंदुसभाई दृष्टिकोण हिरीरीने मांडणाऱ्या वर्तमानपत्राचे चालक व संपादक आपटे व नथूराम हे दोघे बसलेले असतात व नेमक्या त्याच वेळी डॉक्टरांच्या घरी मधुकर काळे नावाचा ग्वाल्हेरचा नवतरुण 'डॉक्टर, २४ तारखेला तुम्ही निदर्शन फारच बढिया केले, पण आता तुमचा पुढला कदम काय ?' असे विचारायला येतो ! अशा वेळी नथूराम व आपटेचे स्वागत अशा डॉक्टरांनी कसे केले असेल ? असा प्रश्न विचारून मी अभियोग साक्षी मधुकर काळे याच्या साक्षीकडे वळलो. येथे डॉक्टर परचुऱ्यांचा बचावपक्ष असा की, आपटे हा २८ जानेवारीला नथूरामला घेऊन डॉक्टरांकडे आला तो दिल्लीला महात्माजींसमोर पुन्हा जोरदार निदर्शने करण्यासाठी, ग्वाल्हेरहून ग्वाल्हेर हिंदुसभेचे डॉक्टरांच्या तालमीतले निदर्शने करणारे स्वयंसेवक मागण्यासाठी आला होता पण डॉक्टरांनी ते देण्याचे नाकारले होते. पण अभियोगपक्षाची कहाणी अशी की, 'नथूराम व आपटे २८ जानेवारीला ग्वाल्हेरला डॉक्टर परचुऱ्यांकडून रिव्हॉल्व्हर किंवा पिस्तूल मिळविण्यासाठी आले व डॉक्टरांनी स्वतःचे पिस्तूल देण्याचे नाकारले पण आपला चेला गंगाधर दंडवते याला 'नथूराम व आपटेला एखादा रिव्हॉल्व्हर अथवा पिस्तूल मिळवून दे' असे सांगितले. एकीकडे डॉक्टरांचा बचावपक्ष सिद्ध करायला माझा आधार डॉ. परचुऱ्यांचे मोठे भाऊ श्रीकृष्णराव परचुरे यांचा. कारण त्यांना पकडल्यावर पोलिसांनी त्यांना जेव्हा मॅजिस्ट्रेटपुढे उभे केले होते त्या वेळी श्री. कृष्णरावांनी हेच सांगितले होते की, 'आपटे व नथूराम दिल्लीला निदर्शनासाठी ग्वाल्हेरचे स्वयंसेवक मागण्यासाठी २८ जानेवारीला आले होते. पण डॉक्टरांनी या लोकांना मदत देण्याचे नाकारले. हे कृष्णरावांचे मॅजिस्ट्रेटपुढे दिलेले कथन पोलिसांजवळ होते. पण ते दाबून ठेवून पोलिसांनी कृष्णरावांना गांधीजींच्या हत्येच्या कटाची माहिती असून त्याला प्रोत्साहन दिल्याचा आरोप लावून अटकेत ठेवले व ग्वाल्हेरच्या काँग्रेस शासनाने त्यांना बँकिंग अँण्ड इनव्हेस्टमेंट सेक्रेटरीच्या हुद्याच्या सरकारी नोकरीतून काढून टाकले आहे व आता या अभियोगांत अभियुक्त न बनवता तसेच सोडून दिले आहे व आता त्या पन्नास बावन्न वर्षांच्या कृष्णराव परचुऱ्यांपुढे काँग्रेस सरकारपुढे जोहार मायबाप जोहार करून नोकरीवर रुजू करून घ्या, असे पदर पसरून मागणी करण्याची वेळ आली आहे. नाहीतर ते आपल्या कुटुंबाचे, मुलाबाळांचे पोट कसे भरणार या वयात ? अशा कृष्णराव परचुऱ्यांना बचावपक्षाचा साक्षीदार म्हणून कोर्टात या, असे मी कसे म्हणणार? हे म्हणून मी साक्षीदार मधुकर काळेची कहाणी–साक्ष–कशी नितांत असंभवनीय व अविश्वसनीय आहे हे दाखवावयास सुरुवात केली. मधुकर काळेने आपल्या कथनात जी पुष्कळशी विधाने केली होती तीच घेऊन त्याचे कथन– त्याच २८ जानेवारीला भर दुपारी डॉक्टरांच्याकडे येणे कसे असंभवनीय ठरते हे दाखवू लागलो. सरकारी नोकरीत शिरल्यावर डॉक्टरांनी मधुकर काळेला हिंदुराष्ट्रसेनेमधून काढून टाकले होते व त्याचे सेनेच्या कवायती, बौद्धिके यांमध्ये भाग घेणे बंद केले; एवढेच नव्हे तर, माझ्या घरीसुद्धा तू येऊ नकोस, असे डॉक्टरांनी बजावले होते. असे असूनही तो डॉक्टरांच्या घरी दुपारी आला तो स्वतःच्या ऑफिसमधून सुटी घेऊन बँकेमध्ये शहरात जाण्यासाठी, पण 'वाकडी वाट' व 'तांतडी' करून न

विचारता डॉक्टरांच्या घरात शिरला ! तेथे दोघां पाहुण्यांच्या व डॉक्टरांच्या बोलण्यातही सामील झाला. दंडवतेने रिव्हॉल्व्हर कसे चालवायचे ते दाखवतो – अंगणात चला, असे म्हणून नथूराम व आपटेला मागच्या चौकात नेले. तेथेही मधुकर काळे गेला. चौकात दंडवतेने रिव्हॉल्व्हरचा बार उडविला तो आकाशाकडे नेम धरून असे मधुकरने सांगितले ! येथेच मी ग्वाल्हेरचे मॅजिस्ट्रेट साक्षीदार श्री. मंझरअली यांच्या साक्षीविषयी बोलून मधुकर काळेच्या म्हणण्याप्रमाणे बार आकाशात उडवला पण मग गोळी मारल्याचे निशाण मॅजिस्ट्रेट महोदयांनी भिंतीवर शोधून काढले हे कसे, असे विचारले. चौकात रिव्हॉल्व्हर चालवून पाहताना नथूराम व आपटे या दोघांनाही त्याचा घोडा दाबता येईना असे मधुकरने सांगितले होते व अंगणात डॉ. परचुरे आले नव्हते असेही सांगितले. म्हणून पिस्तुलाची कल्पना निघून पुन्हा ही पाहुणे मंडळी दिवाणखान्यात आली. तेथे दंडवतेने डॉक्टरांना आपले पिस्तुल या पाहुण्यांना का देत नाही असे विचारले. पण स्वतःचे अनुमत (लायसेन्सड) पिस्तुल कुणालाही द्यायला मी मूर्ख नाही असे डॉक्टरांनी ताडकन् उत्तर दिले, असे मधुकर काळेच सांगत होता हे दाखवले. पुढे मधुकरने स्वतःविषयी 'ग्वाल्हेरच्या नोकरीत असलेल्या माझ्या पिताजींच्या अकाली निधनानंतर मला विद्यार्थीदशेत शिष्यवृत्ती व बी. ए. झाल्यावर नोकरी ग्वाल्हेर सरकारनी दिली आहे – माझ्या आईला शासनहानीपूर्तीचे निवृत्तिवेतन – काम्पेन्सेटरी पेन्शन दिले आहे – माझ्या बहिणीला शिष्यवृत्ती मिळत आहे – माझी आई पक्की कॉंग्रेसी आहे' वगैरे सांगितले होते. हे सांगणारा हा मुलगा सरकारच्या व आईच्या प्रभावाखाली कसा आहे हे मी दाखवले व त्यावर कडी म्हणजे या तरुणाला पोलिसांनी फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात पकडले होते, मुंबई–वरळीलाही नेले होते वगैरे सांगून हा साक्षीदार सरकारचा मिंधा व पोलिसांच्या जुलमाने भयभीत असा आहे व यावर विश्वास ठेवायला कुणाचेही मन धजणार नाही, असे मी दाखवले. मधुकर काळेने इतर माहितीही सांगितली होती. गंगाधर पटवर्धन पोलिसांचा खबऱ्या ('मुखबिर' – 'इनफॉर्मर') आहे, गंगाधर पटवर्धनच्या घरात मधुकर खिरे राहतो, ३० जानेवारीला महात्मा गांधींची हत्या झाल्याचे वर्तमान मी डॉक्टरांना सांगितले व त्यांनी ताबडतोब आपला दवाखाना बंद केला व डॉक्टर माझ्याबरोबर सरळ घरी निघून आले. एकटा मधुकर खिरेच राजपूत बोर्डिंगमध्ये गेला होता – डॉक्टर आपले राजकारण हिंसेच्या स्तरावर कधीच नेत नाहीत – वगैरे या मधुकर काळेने सांगितलेल्या माहितीकडेही जज्ज आत्मचरणजींचे लक्ष वेधण्याचा मी प्रयत्न केला व शेवटी म्हणालो की, असा हा मधुकर काळे कोवळा तरुण सर्व तऱ्हेने संशयास्पद परिस्थितीत असणारा, पोलिसांनी साक्षीस बोलावले म्हणून कितीतरी दिवस पोलिसांच्या कैदेत ठेवलेला, असंभवनीय घटना सांगणारा – अशा कवडी मोलाच्या साक्षीवर विसंबून अभियोगपक्ष कोर्टाला सांगत आहे की, 'या साक्षीने आम्ही डॉक्टरांनी नथूराम व आपटेशी महात्माजींची हत्याकरण्याचा कट केला असे सिद्ध केले आहे !

डॉक्टर परचुरे व मधुकर काळेविषयी मी जवळ जवळ दीड तासभर बोलत होतो.

२८ जानेवारीच्या दुपारी नथूराम व आपटे ग्वाल्हेरला डॉक्टरांकडे कसे व केव्हा आले याबद्दल अभियोगपक्षाने दोन साक्षीदार गरीबा व जुम्मनखान हे ग्वाल्हेरचे टांगेवाले उभे केले आहेत पण त्यांच्याविषयी मागून सांगेन असे म्हणून मी आधी अभियोग साक्षीदार क्रमांक ३९ जगदीश गोयल याच्या साक्षीकडे वळलो. या साक्षीदाराकडून अभियोगपक्षाने 'नथूरामला ग्वाल्हेरला पिस्तूल मिळाले.' हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला होता. मी जगदीश गोयलने स्वतःच सांगितलेल्या माहितीच्या आधारावर बोलत होतो. 'महात्मा गांधींची हत्त्या ३० जानेवारीला झाल्यानंतर एक दोन दिवसातच ग्वाल्हेरला– व सगळ्या हिंदुस्थानभरच – जी हिंदुसभाई व संघीय लोकांची सरसकट धरपकड सुरू झाली ती बघून हा वैश्य नवतरुण ग्वाल्हेरहून पळून गेला. तो स्वतः गरीब वाणी, फारसा शिकलेला नाही. ग्वाल्हेर संस्थानच्या 'आरजी' म्हणजे अस्थाई वॉर प्रॉफिट टॅक्स कार्यालयात अस्थाई कर्मचारी – धरपकडीला भिऊन पळून गेला. त्यानंतर हा जगदीश गोयल ११ एप्रिल १९४८ ला झाशी येथे पकडला गेला तो मुळी इंडिअन पिनल कोडच्या कलम ३०२ खाली ! पण पोलिसांनी त्याला लवकरच मुंबईला नेऊन वरळीला ठेवले. तेव्हापासून हा जगदीश पोलिसांच्या कैदेत खुनाच्या आरोपाखाली राहिला. तो लाल-किल्ल्यांतील कोर्टात १२ जुलैला साक्ष द्यायला आला त्यादिवसापर्यंत. ग्वाल्हेरचा हा गरीब बनिया पोलिसांच्या कैदेतून कोर्टात साक्ष द्यायला येऊन सांगत होता की, 'नथूरामने महात्मा गांधींवर ज्या बरेटा पिस्तुलाने गोळ्या मारल्या ते पिस्तुल मजजवळ होते. ते पिस्तुल मी दिनांक २८ जानेवारी १९४८ ला गंगाधर दंडवतेला ५०० रुपयांना विकत दिले. त्याबद्दल गंगाधर दंडवतेने मला एक जुना रिव्हॉल्व्हर व ३०० रुपये आणून देऊ केले पण ते मी घेतले नाहीत. ते बरेटा पिस्तुल अभियोगप्रदर्श वस्तु क्रमांक ३९ हे आहे. त्या दिवशी मी, नथूराम व आपटे यांना डॉक्टरांच्या दवाखान्यात बसलेले पाहिले होते. या दोघांना मी पूर्वीपासून हिंदूमहासभाई व संघीय नेते म्हणून ओळखत होतो ! वगैरे. जगदीश गोयलने हे मुख्य परीक्षणात सांगितले पण त्याने यामध्ये 'हे पिस्तुल मी नथूरामला दिले किंवा नथूरामने मला त्याची किंमत देऊ केली' असे म्हटले नव्हते किंवा या व्यवहारामध्ये डॉक्टर परचुऱ्यांचे व त्याचे प्रत्यक्ष काही बोलणे झाले असे तो मुळीच म्हणत नाही. याकडे मी कोर्टाचे लक्ष वेधून पुढे हे पिस्तुल जगदीशचे आहे तरी का ? याबद्दल त्याजजवळ मालकीहक्काचा किंवा अनुमतीचा – लायसेन्सचा – काही कागदपुरावा नाही. त्याने हे पिस्तुल त्याच्याजवळ आहे, असे ग्वाल्हेर पोलिसांना कधीही सांगितले नाही. त्याने हे लपवून ठेवले होते. हे पिस्तुल त्याच्याजवळ कसे आले याबद्दल तो कोर्टाला काही सांगत नाही. असे भारी किंमतीचे विलायती पिस्तुल कुणाला न सांगता लपवून जवळ बाळगण्याला तो इतका सधन नाही. टेंपररी कारकुनी करणारा गरीब वाणी नवतरुण. हे पिस्तुल बेकायदा जवळ बाळग-

## अशा कवडीमोलाच्या साक्षीवर विसंबून ते कोर्टाला सांगत आहेत की....

ण्याची याची हिंमत कशी होईल ? असे विचारून मी जगदीशच्या पोलिसांच्या कैदेत ठेवला जाण्याबद्दल कोर्टाचे लक्ष वेधले. या वाणी मुलाला खुनाच्या आरोपाखाली ११ एप्रिलला पकडले होते व याची त्या आरोपातून या कोर्टात साक्षीला उभा राहीपर्यंत सुटका झाली नव्हती. खुनाच्या आरोपाची तलवार डोक्यावर टांगती असताना हा कोर्टात साक्षीला उभा राहिला होता असे म्हणून या साक्षीदारावर कवडीचा विश्वास ठेवू नये असे मी कोर्टाला विनविले व येथेच जगदीशची ज्या नाथीलाल जैन नावाच्या अंबाह, जिल्हा मुरेना येथे राहणाऱ्या माणसाशी ओळख आहे असे तो म्हणतो त्या नथीलालला पोलिसांनी कोर्टात साक्षीला का उभे केले नाही ? नाथीलाल पोलिसांचा साक्षीदार होता, लालकिल्ल्यात आलाही होता तरी त्याला कोर्टात उभे केले नाही, ते का ? नाथीलालची साक्ष पोलिस काढीत नाहीत, दंडवते कोर्टासमोर नाही, जगदीश गोयलची साक्ष विश्वास ठेवण्याच्या लायकीची नाही याचा अर्थ पोलिस प्रदर्श वस्तु क्रमांक ३९ हे बरेटा पिस्तुल नथूरामला कोणी दिले हे अभियोगपक्षाने सिद्ध केले नाही. एवढेच नव्हे तर, या घातकी पिस्तुलाच्या मालकीबद्दल नानातऱ्हेचे तर्ककुतर्क करायला जागा ठेवावी असा पोलिसांचा डाव आहे असे मी म्हटले. या पिस्तुलाच्या मालकीचा महत्त्वाचा पुरावा पोलिसांना ग्वाल्हेरला मिळाला नाही. पोलिसांना एकच गोष्ट ग्वाल्हेरला मिळाली ती म्हणजे, महात्माजींवर गोळ्या झाडणाऱ्या बरेटा पिस्तुलासारखे हुबेहुब दुसरे पिस्तुल – ज्याच्याजवळ आहे असे ग्वाल्हेरचे डॉक्टर परचुरे ! डॉक्टर परचुऱ्यांजवळ त्यांच्या बरेटा पिस्तुलाचे विधिवत लायसेन्स-अनुमत नसते तर – तर पोलिसांनी नथुरामच्या पिस्तुलाबाबत कोणत्या पिस्तुलाचा पुरावा कोर्टापुढे आणला असता ? असा संशय मी कोर्टामध्ये व्यक्त केला.

मी हे सगळे बोलत असतानाच मधल्या विश्रांतीची वेळ झाली होती. आम्ही चहा प्यायला म्हणून उठलो पण जिकडे तिकडे सगळीजण माझ्याकडे बघत आहेत पण कुणीही माझ्याशी बोलत नाहीत हे काय ? असे आश्चर्य वाटायला लावणारे वातावरण माझ्याभोवती होते. नेहमी हसऱ्या चेहऱ्याने माझ्याशी थट्टा-विनोदाने बोलणारे श्री. दफ्तरी गंभीर चेहऱ्याने गप्प होते. श्री. आत्मचरणदेखील माझ्याकडे टकाटका बघत होते ! मी श्री. डांगे यांच्याबरोबर जाऊन चहा पिऊन आलो व आपल्या पुढच्या कामाची तयारी मुकाट्याने करू लागलो होतो.

कोर्टाचे काम सुरू झाल्यानंतर ज्या साक्षीदारांविषयी मला बोलायचे होते त्यांपैकी तीन साक्षीदार माझ्या दृष्टीने अगदीच महत्त्वाचे नव्हते. हे तिन्ही साक्षीदार म्हणजे १९४८ मध्ये गांधीहत्या झाल्यानंतर व त्यासंबंधात साऱ्या भारतभर हिंदुसभाई व संघीय लोकांची सर्रास धरपकड झालेल्या दिवसांत, बऱ्याचशा रिकामटेकड्या लोकांचा किंवा मतलबी लोकांचा जो एक व्यवसाय झाला होता त्याचा एक नमुना होता. आपले स्वतःचे हेवेदावे उगवून घेण्यासाठी म्हणून किंवा सरकारची अथवा काँग्रेसी नेत्यांची मेहेरबानी मिळविण्यासाठी म्हणून हे मतलबी रिकामटेकडे आपल्याविरोधी माणसाविषयी 'याने गांधीहत्येची बातमी ऐकून आनंद प्रदर्शित केला.' 'याने तर त्यादिवशी घरी मिठाई वाटली,' 'हा तर गांधी, काँग्रेस यांच्याविषयी नेहमी विरोधी बोलणारा' अशा वावड्या उडवीत अशा महाभागांपैकी हे साक्षीदार होते. यांतला एक मधुकर खिरे हा पोलिसांचा खबऱ्या गंगाधर पटवर्धनच्या घरातच राहणारा. याने डॉक्टर परचुरे ३० जानेवारीला संध्याकाळी महात्मा गांधींची हत्या झाल्याचे वर्तमान कळून दवाखाना बंद करून या साक्षीदाराच्या व मधुकर काळेच्याबरोबर घरी जायला निघाले ते वाटेवर माझ्याबरोबर राजपूत बोर्डिंगमध्ये शिरले व तेथे रामदयालसिंग व जगन्नाथसिंग या दोन राजपूत ठाकुरांना भेटले व रस्त्यालगतच्या भर चौकात गांधीजींविषयी पहा मी सांगितले नव्हते अशा तोऱ्याने बोलले असे सांगत होता. पण ते कसे मधुकर काळे याच्या साक्षीविरुद्ध होते, मधुकर काळेच्या म्हणण्याप्रमाणे मधुकर खिरे हा एकटाच राजपूत बोर्डिंगमध्ये गेला व मधुकर काळे व डॉक्टर सरळ घरी परत आले होते, याच्याशी जुळणारे नव्हते. दुसरे म्हणजे या साक्षीदाराने डॉक्टर दोघा ठाकुरांशी काय काय बोलले याची त्याला माहिती नव्हती कारण तो लगेच तेथून घरी निघून गेला होता. तेव्हा हा साक्षीदार काही कामाचा नाही हे कोर्टाला दाखवले. दुसरे साक्षीदार रामदयालसिंग हे गृहस्थ स्वयंमन्य नेते. ते देखील कसे डॉक्टर परचुरे व त्यांच्या राजकारणाला मी काही किंमत देत नाहीं अशा ऐटीने बोलूनदेखील डॉ. परचुरे यांच्याबद्दल कसे चांचरत व हात राखून बोलत होते हे त्यांच्याबरोबरचे साक्षीदार जगन्नाथसिंग यांच्या कथनाच्या तुलनेने सांगितले आणि शेवटचे साक्षीदार जगन्नाथसिंग तर डॉक्टर परचुरेने गांधीजीको औरंगजेब का औतार बताया येथपर्यंत साक्ष देऊन गेला होता पण... ह्या ठाकुर महाशयांनी आपल्या भरघोस मिशांवर उलटी मूठ फिरवीत कोर्टासमोर कसे ये है डॉक्टर परचुरे !' म्हणून स्वातंत्र्यवीर सावरकरांकडे बोट दाखवले होते हे मी सांगितले व हे तिन्ही साक्षीदार अगदी फुसके फटाके आहेत, मुळीच विश्वास ठेवण्याच्या लायकीचे नाहीत, एवढेच नव्हे तर हे साक्षीदार जे काही सांगतात त्याने डॉक्टर परचुऱ्यांविरुद्ध लावलेल्या कोणच्याही आरोपाचा कोणताही भाग सिद्ध होत नाही असे सांगितले आणि असे सांगून मी ज्या साक्षीदारांकडे वळलो ते म्हणजे ग्वाहेरचे दोन टांगेवाले गरीबा आणि जुम्मनखान.

या दोन्ही साक्षीदारांना मी फारसे महत्त्व देत नव्हतो. याच्या अनेक कारणांपैकी एक होते की, नथूराम व आपटे हे दोघेही, आम्ही २८ तारखेला ग्वाल्हेरला गेलो होतो व तेथे डॉक्टर परचुऱ्यांना भेटलो होतो असे कबूल करीत होते व म्हणाले होते की, आपटेला ग्वाहेरहून स्वयंसेवक नेऊन दिल्लीला पुन्हा निदर्शने करावीत असे वाटत होते म्हणून स्वयंसेवकांची मदत मागण्यासाठी आम्ही डॉ. परचुऱ्यांकडे गेलो होतो. याउलट असलेली अभियोपक्षाची कहाणी खोटी आहे असा बचाव होता. ह्या बचावाच्या दृष्टीने एका भागाशी या दोन टांगेवाल्यांचा संबंध होता तो असा की, नथूराम व आपटे दिनांक २७–२८ जानेवारीच्या रात्री दिल्लीहून ग्वाल्हेरला आले ते कोणच्या गाडीने याबद्दल हे दोघे टांगेवाले काय सांगतात हे कोर्टाला दाखवयाचे. यादृष्टीने मी सुरुवात केली ती, ग्वाहेरला जानेवारीच्या या दिवसांत अतिशय थंडी असते असे सांगून व त्याचा आधार म्हणून अभियोग साक्षी मेजर जाल या म्हाताऱ्या पारशी साक्षीदाराने फेब्रुवारीच्या तिसऱ्या आठवड्यापर्यंत ग्वाल्हेरला कडाके

की थंडी रहती है या वर्णनाकडे बोट दाखविले आणि मग अशा थंडीत 'मध्यरात्रीचा–प्रहर निद्रेचा भर' असताना ग्वाल्हेरला उतरणे व कुणाकडे जाऊन त्यालाही अंथरूणातून उठवणे कुणी पसंत करीत नाहीत. त्यापेक्षा दिल्लीहून रात्री १० वाजता निघणाऱ्या व ग्वाल्हेरला पहाटे दिवस उजाडायच्या ब्राह्ममुहूर्तावर येणाऱ्या अमृतसर मुंबई एक्सप्रेसनेच ग्वाल्हेरचा प्रवास सर्व दिल्लीचे प्रवासी पत्करतात असे सांगून ते दोघे पहाटेच्या वेळी ग्वाल्हेरला आले व धर्मशाळेत उतरले हा बचावपक्षाचा मुद्दा मी कोर्टाला दाखवला. परंतु अभियोगपक्षाच्या टांगेवाल्या साक्षीदार गरीबाने निःसंदिग्ध शब्दांत सांगितले होते की, 'डॉ. परचुऱ्यांचे पाहुणे रात्री 'बम्बई एक्सप्रेसने' आले. ही बम्बई एक्सप्रेस मुंबईकडून येणारी गाडी होती हे मी पहिल्या वर्गाच्या फाटकाजवळ उभे राहून पाहिले ! याचा अर्थ स्पष्ट असा होता की, मुंबईहून येणाऱ्या मुंबई अमृतसर एक्सप्रेसने डॉ. परचुऱ्यांचे पाहुणे आले. ते नथूराम व आपटे कसे असणार ? मध्यरात्री ग्वाल्हेरला येणारी दिल्लीची एक गाडी होती. पण ती होती दिल्ली मद्रास ग्रॅण्ड ट्रंक एक्सप्रेस व त्या गाडीला ग्वाल्हेरचे टांगेवाले मद्रास एक्सप्रेस म्हणतात हे मला माहीत होते. म्हणून मी कोर्टाचे लक्ष वेधून सांगितले की, गरीबा साक्षीदार अभियोगपक्षाच्या कहाणीला सिद्ध करीत नाही. तो दुसऱ्याच कुणा पाहुण्याविषयी बोलत असावा असे म्हटले पाहिजे. कारण गरीबा साक्षीदाराने आपल्या कथनात असे स्पष्ट विधान केल्यावर त्यावर अभियोगपक्षाने त्या साक्षीदाराला चुकीचे विधान करणारा, विरुद्ध पक्षाला मिळालेला, असे म्हटले नाही. की पुनर्परीक्षणामध्ये त्याची चूक दुरुस्त करण्याचा प्रयत्न अभियोगपक्षाने केला नाही. तेव्हा त्या साक्षीदाराच्या कहाणीत चुकीची दुरुस्ती करण्याचा अभियोगपक्षाला आता अधिकार नाही. त्या साक्षीदाराची चूक होते आहे ती त्याने गाठलेल्या सवारी पाहुण्याच्या चेहरेपट्टीच्या ओळखीची. तर त्याला ती चेहरेपट्टी नीट रीतीने न्याहाळायला जानेवारीच्या मध्यरात्रीच्या वेळी भर थंडीत किती वेळ मिळाला ? कोणीही प्रवासी त्यावेळी उघड्या डोक्याने, मोकळ्या चेहऱ्याने येत नाहीत. डोक्यावरून, अंगाभोवती ब्लँकेटे गुंडाळून, डोक्याला चेहऱ्याभोवती मफलर गुंडाळून येतात. त्यावेशामध्ये चेहरेपट्टी काय पहायला मिळणार ? फार तर डोळे नि नाक. पण या एवढ्याच आधारावर किती ओळख राहणार ? कोर्टासमोर असलेल्या अभियुक्त नथूराम व आपटे यांच्या नाका डोळ्यांमध्ये असे ओळख ठेवण्याजोगे विलक्षण काही नाही. गरीबा टांगेवाल्याने 'ओळख सांगे' साक्षीदाराची अभियुक्तांची चेहरेपट्टी ओळखण्याचे कौशल्य दाखविले याचे कारण त्याला मुंबईची वरळीच्या पोलिस केंद्राची वारी पोलिसांनी करविली होती हे आहे. कारण गरीबाने कबूल केले होते की, त्याला व जुम्मनखानाला पोलिस इन्स्पेक्टर मंडलीक मुंबईला घेऊन गेले होते. इन्स्पेक्टर मंडलिकांना गरीबा कसा मिळाला याचेही उत्तर मी गरीबाकडून मिळवले होते ते असे की, महात्मा गांधींच्या हत्येनंतर काही दिवसांनी एके दिवशी पहाटे बम्बई एक्सप्रेसने मंडलीक ग्वाल्हेरला उतरले नि त्यांनी माझा टांगा घेतला व त्यांना मी त्यांच्या घरी पोचवले. ते माझ्या टांग्यांत बसले असताना मी ह्यांना सांगितले होते की, गांधीजींच्या हत्येपूर्वी मी काही मुंबईच्या पाहुण्यांना डॉक्टर परचुऱ्यांकडे पोचवले होते. गरीबाचे हे म्हणणे खरे असावे बहुतेक त्या दिवसांत डॉक्टरांच्या घरी श्रीकृष्णराव परचुऱ्यांचे जावई डॉ. फडके मुंबईहून आले होते व त्यांचे बरोबर डॉक्टर शेंडेही आले होते व या जावयाचे प्रश्नपरीक्षणही पोलिसांनी मुंबईच्या मॅजिस्ट्रेटपुढे करविले होते. डॉक्टर शेंडे पुण्याचे व चेहरपट्टी, चण, वर्ण, डोळे यांमध्ये बरेचसे आपटेसारखे दिसणारे आणि ग्वाल्हेरच्या शेंडे घराण्यातले म्हणून टांगेवाल्याने नगाला नग म्हणून दोन पाहुणे सांगितले. पण गफलत केली ती फक्त चेहरेपट्टी–ओळख सांगण्याची. कारण त्याला पोलिसांनी मुंबई वरळीची वारी घडविली होती. ह्या माझ्या माहितीच्या आधावरच मी पोलिस कमिशनर नगरवालांना प्रश्न विचारला होता, की पुण्याचे डॉक्टर शेंडे यांचे नाव पोलिस चौकशीत तुमच्यापुढे आले का व या डॉक्टर शेंड्यांचा चेहरा आपटेच्या चेहऱ्यासारखा दिसतो की नाही, याची चौकशी केलीत का ? या सर्व आधारावर गरीबा टांगेवाल्याचे कथन अभियोगपक्षाच्या कहाणीविरुद्ध आहे एवढेच नव्हे तर ओळख सांगे. या मुद्यावर भरवशालायक नाही. कारण या अभियोगात सगळ्याच 'ओळख सांगे' साक्षीदारांचा पुरावा गोळा करण्यात पोलिस अधिकाऱ्यानी सर्व तऱ्हेचे नियमबाह्य वर्तन केले आहे

जुम्मनखान टांगेवाल्याचा भाग एवढाच की, गरीबाने सवारी मिळवून आपल्या टांग्यात बसवली, पण टांगा चालू करताच घोड्याचे जीन टांग्याला बांधायचा 'बंम्' –दांडा–तुटला म्हणून त्याने आपली सवारी जुम्मनखानच्या टांग्यात बसवली. जुम्मनखान त्यांना घेऊन पुढे गेला व परचुऱ्यांच्या घरी त्यांना उतरवले. या टांगेवाल्याच्या 'ओळख सांगे' तत्परतेविषयी माझे मुंबई–वरळीचे तर्क मी सांगितले व 'जिथे गरीबाची सवारीच या अभियोगातली सवारी नव्हती, तेथे जुम्मनखानाची सवारी या अभियोगातली कशी झाली असेल ?' असा प्रश्न विचारला. याचे उत्तर– 'पण आता उद्याच सांगेन,' असे मी म्हटले.कारण हे बोलत असतानाच कोर्टाची वेळ संपत आली, म्हणून मी माझे भाषण तेथेच थांबवले. पुन्हा पाहिले तो कुणीही माझ्याशी बोलत नव्हते. श्री. दफ्तरींनी माझ्याकडे न बघता माझ्यासमोरून कोर्टातून निघून जाण्याची ती पहिलीच वेळ होती असे म्हटले पाहिजे. कारण त्या दिवशी माझ्याभोवती मुकाट एकाकीपणाची व्यथा मला फार जाणवली होती ! त्यात चीड आणण्यासारखे एकच ! अभियोगपक्षाकडले 'असेच कुणीतरी' पोलिसमहाशय माझ्याशी बोलते झाले, ते हे विचारायला की, 'काय वकीलसाहेब, ही केस उद्या संपू देणार का तुम्ही ?' या प्रश्नातला मला चीड येण्याजोगा 'वातड 'पणा जिवानिशी जाणाऱ्या शेळीच्या दृष्टीने होता हे मी सांगायला हवे का ?'

कोर्टाचे काम संपवून मी हिंदुमहासभाभवनामध्ये परत आलो ते निराश मनाने नव्हे. पण आनंदाने किंवा मोकळ्या मनानेही नव्हे. सगळी मंडळी माझ्याशी मोकळेपणी बोलत का नाहीत हेच मला


## 'काय वकीलसाहेब, ही केस उद्या संपू देणार का तुम्ही ?'

समजत नव्हते. टॅक्सीमधून परत येतानादेखील कुणी काही मला विचारले नाही, की काही मला म्हटले नाही. खोलीवर येऊन मुलांची विचारपूस, गप्पा झाल्या तेव्हा कोठे मला जरा बरे वाटले. मुले कुतुबमिनार पाहून आली होती. मला काय काय सांगत होती, जेवणखाण झाल्यावर मुलांना निजवले. मी घरच्यासाठी रेशमी कापडाची व उबदार मऊ नवी रजई नुकतीच भरवून घेतली होती. तीमध्ये गुरफटून निजताना मुले आनंदात झोपली. पण मला मात्र झोप येईना. सारखे उद्याचे काम आठवून डॉक्टर परचुऱ्यांच्या अपराध स्वीकृतीविषयी मला तर्कनिवेदन सांगायचे आहे हे आठवे व मला सुचेनासे होई. माझे म्हणणे जज्ज आत्मचरण ऐकून घेतील का ? की मला मॅजिस्ट्रेट श्री. अटलविरुद्ध बोलूच देणार नाहीत ? उलटसुलट विचाराने माझे मन भोवंडून जात होते व भोपटकरांचे ' डॉक्टर परचुरे नक्की फाशी जाणार ' हे शब्द आठवून माझ्या डोक्यावर तलवार टांगली असल्यासारखे वाटून मला झोप येत नव्हती. केव्हातरी मध्येच मला झोप लागून गेली. माझ्याभोवती २९ डिसेंबरची थंडी मला गारठून टाकत होती.

पहाटे मी नेहमीप्रमाणे जागा झालो ते उत्साहित मनानेच. सकाळचे माझे काम पाहून तयारीने कागद क्रमवार लावून घेतले. समारोपाचे भाषण टाईप करून ठेवले होते ते आठवणीने घेतले. स्वत:चे स्नान वगैरे आटोपून मुलांना उठवले. त्यांचाही कार्यक्रम चालू करून दिला. त्या दोघांना दुपारी जेवण झाल्यावर सौ.भोपटकरां-बरोबर लालकिल्ल्यामध्ये कोर्टात या असे सांगितले. सकाळी न्याहारी करून कोर्टात जायला वेळेवरच निघालो. मनात मॅजिस्ट्रेट श्री.अटलां-बद्दल काय काय नि कसेकसे बोलायचे ते आठवत होतो. समारोपाच्या भाषणाची वाक्ये आठवत होतो. सगळे नीट वाचून बोललेच पाहिजे, अशा निर्धाराने कोर्टात पोचलो होतो. मी वकील या नात्याने आरोपींच्या पिंजऱ्यातल्या अभियुक्तांना न्याय मिळावयाकरता कशा-कशाची आवश्यकता असते नि नेमके तेच कसे लालकिल्ल्यातील न्यायालयात मिळणे कठीण झाले होते, याबद्दलची मनातली मळमळ सारी स्पष्टपणे मोठ्याने बोलून दाखवायचीच असे ठरविले होते. डॉ. परचुरे, गोपाळ गोडसेचाच वकील म्हणून मी बोलणार होतो, असे नसून आरोपींच्या पिंजऱ्यात बसणाऱ्या जगातल्या सगळ्या आरोपींच्यावतीने न्यायपीठावर बसणाऱ्या जगातल्या सगळ्याच न्यायाधीशांच्यापुढे सगळ्याच वकिलांचे बोलणे बोलून दाखवणार होतो !

[ क्रमश: ]


सॅपोटेक्स १००% विशुद्ध सोप पावडर




आतां ३ नवीन सुबक आकारांत उपलब्ध
२½ कि.ग्रॅ. १ कि.ग्रॅ. ½ कि.ग्रॅ.

आपल्या कपड्यांची धुलाई अत्यंत स्वच्छ आणि सफेद होण्यासाठी सॅपोटेक्स वापरा. त्यात सफेदीसाठी ऑप्टिकल व्हाइटनर मिसळलेले असते. सॅपोटेक्सने धुलाई केल्याने नाजूक कपडे सुद्धा सुरक्षित राहतात.

**सॅपोटेक्स-भारतातील सर्वांत अधिक खपाची सोप पावडर**

स्वस्तिक हाउसहोल्ड ॲण्ड इंडस्ट्रिअल प्रॉडक्ट्स लि.

पुस्तके

# कुसुमावती वाङ्मयदर्शन

सर्वच सृजनशील प्रतिभावंतांच्या विशिष्ट व्यक्तिमत्त्वाचा आणि जीवनश्रद्धांचा ठसा त्यांच्या वाङमयनिर्मितीवर अपरिहार्यपणे पडत असतो. भिन्नभिन्न लेखकांच्या बाबतीत हे भिन्नभिन्न तऱ्हेने घडलेले आढळते. कधी-कधी या जीवननिष्ठा फारच व्यापक व संमिश्र असतात. अशा वेळी वाङमयनिर्मिती-वरील त्यांचा ठसा नेमके बोट ठेवून दाखविता येत नाही, तो सखोल अभ्यासातून आणि तर्कानेच कल्पिता येतो. परंतु काही लक्षणीय व्यक्तिमत्त्वे मात्र अत्यंत स्पष्ट व दृढ अशा जीवनश्रद्धांवर उभी असतात. अशा वेळी त्यांचा आविष्कारही या व्यक्तिमत्त्वाचीच एक स्वाभाविक व अपरिहार्य अशी फलश्रुती असते. कुसुमावतींच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि त्यांच्या निर्मितीचा विचार करताना या दोहोंमधील नाते अतिशय जिव्हाळयाचे होते, किंबहुना या दोहोंत पूर्ण एकात्मता होती, असा प्रत्यय सतत येत राहतो. म्हणूनच त्यांच्या निर्मितीचा परामर्ष त्यांच्या जीवनश्रद्धांच्या वाटेनेच घेणे श्रेयस्कर होईल.

काही एका सामाजिक कल्याणातच कलेचे अंतिम श्रेयस् असते हा कलाविषयक दृष्टिकोन कुसुमावतींनी सदैव मनोमन बाळगला होता. त्यामुळे त्यांच्या सर्वच लेखनामागील दृष्टी ही वाङमयाचे उद्दिष्ट काय, आणि हे उद्दिष्ट व जीवनहेतू यांचे परस्पर नाते काय यासंबंधी त्यांनी विचारांती मनात धरलेल्या दृढ भूमिकेशीच निगडित आहे. कुसुमावतींच्या जीवननिष्ठांचा शोध घेताना, 'बी' कवींची आठवण होते. विश्व आणि साहित्य यांच्या परस्पर संबंधांविषयीच्या या उभयतांच्या तात्त्विक विचारांमध्ये मोठेच साधर्म्य आढळते.

'वाङमयीन समीक्षेचे निकष' या आपल्या लेखात कुसुमावतींनी वाङमयीन समीक्षा-दृष्टीची, नीतिकल्पनानुसारी, मानसशास्त्र-प्रेरित, समाजशास्त्रनिष्ठ व सौंदर्यशास्त्रावर-आधारित अशी चतुर्विध स्वरूपाची वर्गवारी केली आहे. या सर्व दृष्टिकोनांचा अभ्यास व तौलनिक विचार करून समाजशास्त्रनिष्ठ समीक्षादृष्टी ही इतर सर्वांहून वाङमयाच्या-मूल्यमापनात कशी अधिक सर्वस्पर्शी व उपयुक्त ठरू शकते याचेही विवरण त्यांनी केले आहे. त्यांनी स्वतः हीच भूमिका स्वीकारली होती. वाङमयापासून त्यांच्या काही निश्चित आणि विवक्षित अपेक्षा आहेत. कलेच्या समीक्षेसाठी केवळ एकाच व्यवच्छेदक लक्षणाला मान्यता देऊन चालत नाही, जीवन-मूल्यांच्या निकषावर कलेची पारख करणे आवश्यक ठरते हा आपला विश्वासही त्यांनी स्पष्टपणे प्रकट केला आहे. कुसुमावतींची ही भूमिका त्यांच्या दृष्टीने अत्यंत स्पष्ट, निश्चित आणि परिपूर्ण होती. साहजिकच तिचा पाठपुरावा त्यांनी आपल्या सर्वच लिखाणांतून अत्यंत आग्रहाने तसाच आर्जवाने केला. त्यांच्या निष्ठा आणि त्यांचे अतिशय सुसंस्कृत व सौजन्यशील व्यक्तिमत्त्व या दोहोंचाही ठसा त्यांच्या टीकालेखनावरही स्पष्टपणे उमटला आहे.

कुसुमावतींनी वाङमयासंबंधी आणि वाङ्मय व जीवन यांच्या नात्यासंबंधी स्वीकारलेली भूमिका ही एक महत्त्वाची व अनेक टीकाकारांनी अंगिकारलेली भूमिका आहे. परंतु ती भूमिका इतक्या भरीव, सुव्यवस्थित पायावर मांडण्याचे, तिची सर्वांगीण छाननी करण्याचे व तिच्याच आधारे प्रत्यक्ष वाङ्मयकृतींचाही अभ्यास करून तिला भरीवपणा देण्याचे कार्य कुसुमावतींनीच अधिकारवाणीने केले आहे. आपले टीकालेखन प्रयत्नपूर्वक, आकर्षक आणि वाचनीय करण्याचा अट्टाहास जसा त्यांनी बाळगला नाही तसाच अकारण क्लिष्टतेच्या व दुर्बोधतेच्या आहारीही त्या कधी गेल्या नाहीत.

कुसुमावतींचे व्यक्तिमत्त्व आणि त्यांची निर्मिती यांमध्ये एक अतूट नाते व एकात्मता असल्याने त्यांचे कथालेखन हेही यथार्थपणे त्यांच्या रसिक, सहृदय व प्रांजल मनाचेच स्वच्छ प्रतिबिंब आहे. या व्यक्तिमत्त्वामधील चिंतनशीलता, संयम आणि विवेक या अंगभूत वैशिष्ट्यांमधून, तसेच त्यांच्या अंतरंगात खोलवर मुरलेल्या कथाविश्वाचे स्वरूप, त्याचा विस्तार आणि त्याच्या कक्षा निश्चित झाल्या आहेत. कुसुमावतींची कथा ही घटनांपेक्षा व्यक्तीमध्येच अधिक रंगून जाणारी आहे. भिन्नभिन्न परिस्थितीच्या चक्रात आणि मानसिक बाबतीत सापडलेल्या स्त्रीमनाचे दर्शन त्यांनी अशा हळुवार सूक्ष्मतेने घडवले आहे की, त्यातून नकळतच स्त्रीजीवनाच्या अनेक जिव्हाळ्याच्या प्रश्नांना आणि स्त्रीमनाच्या नाजूक व्यथांना वाचा फुटली आहे. त्यांनी रेखाटलेले हे स्त्रीमन हे केवळ आधुनिक काळात वावरणारे आणि त्यानेच निर्माण केलेल्या समस्यांना सामोरे जाणारे नाही. मावळतीकडे झुकलेल्या जुन्या पिढीकडेही त्यांनी आपल्या विचारी व समंजस दृष्टीने पाहिले आहे. त्यांची सुखदुःखेही आत्मीयतेने व तन्मयतेने टिपली आहेत. किंबहुना कोणत्याही काळातील स्त्रीमनाची अनादी व्यथाच त्यांच्या कथेतून व्यक्त झाली आहे, समर्थपणे साकार झाली आहे. 'एकटीच', 'पिसारा', 'लहरी', इत्यादी अनेक कथा याचीच साक्ष मोठ्या हृदयंगम स्वरूपात देतात.

कुसुमावतींच्या कथालेखनाच्या तुलनेने त्यांचे ललितलेख तसे मोजकेच आहेत. परंतु मोजके असले तरी ते अतिशय लक्षवेधी आणि वैशिष्ट्यपूर्ण आहेत. 'माध्यान्ह', 'मध्य

रात्र', आणि 'चंद्रास्त' हे त्यांचे तीन महत्त्वाचे ललितलेख. या लेखांच्या शीर्षकांकडे पाहिले तरीसुद्धा कुसुमावतींच्या ललितलेखनाचा गाभा नेमका काय होता याची प्रचीती सहजपणे येते. या ललितलेखनांतून कुसुमावतींना पाहणे हा एक वेगळाच अनुभव आहे. या ललितलेखनातील प्रकट चिंतनामध्ये निसर्ग हा या संवेदनशील व सौंदर्यवेधी मनाचा प्रामाणिक साथी आहे.

कुसुमावतींचे हे ललितलेखन ज्या काळात झाले, त्या १९२५ नंतरच्या काळात मराठी वाङ्मयात लघुनिबंधांचे पीक उदंड येत होते. ना. सी. फडके, अनंत काणेकर, वि. स. खांडेकर यांनी आपापल्या प्रवृत्तिनुसार हा वाङ्मयप्रकार लोकप्रिय केला होता. साहजिकच अनेक होतकरू लेखकांना लोकप्रियतेचा व वाङ्मयीन यशस्वितेचा एक सोपा मार्ग मिळाला. तंत्रनिष्ठेच्या साचेबंद चौकटीत हा लघुनिबंध अधिकाधिक नकली आणि निर्जिव होऊ लागला. या पार्श्वभूमीवर कुसुमावतींचे हे ललितलेख पाहिले म्हणजे त्यांचे सच्चे, अकृत्रिम रूप डोळ्यांत अधिक भरते. 'मराठी लघुनिबंधातील नाटकी व नकली वैयक्तिकतेच्या जागी कुसुमावतींनी आत्मनिष्ठा आणली. खोल उत्कट अनुभवांचा, प्रगल्भ व तरल आविष्कार साधला. संवेदनांचे व भावनांचे अस्सल काव्य व्यक्त केले.' मराठी ललितलेखनाचा प्रवास आणि विकास आज अनेक अंगांनी आणि दिशांनी झाला आहे. आजच्या ललितलेखनाचे हे विकसित रूप पाहताना कुसुमावतींच्या या मोजक्या ललितलेखांचे महत्त्व विसरून चालणार नाही.

ललितलेखांमध्ये एखाद्या कलावंताच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब जितक्या सहजतेने उमटते, तितके ते कवितेचा अपवाद सोडता इतर वाङ्मयप्रकारांत सहसा उमटत नाही. कुसुमावतींच्या अभिजात व रसिक व्यक्तिमत्त्वाने त्यांचे ललितलेखन मूलतःच निराळे झाले आहे. या मनाचे, या व्यक्तिमत्त्वाचे रंगरूप आणि त्याच्या भावावस्था या ललितलेखांत उमटल्या आहेत. म्हणूनच या ललितलेखांतून होणारे त्यांचे दर्शन हे अधिक जिव्हाळ्याचे व जवळकीचे वाटते.

—लता किणीकर

कुसुमावती : वाङ्मयदर्शन
कॉन्टिनेण्टल प्रकाशन
पृष्ठे १६१
किंमत ८ रुपये.


# राजहंस प्रकाशन सूची

| | | | |
|---|---|---|---|
| १ | शिलंगणाचं सोनं | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| २ | शनवारवाड्यातील शमादान | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| ३ | पुरंदरच्या बुरुजावरून | ब. मो. पुरंदरे | ४ – ०० |
| ४ | पुरंदऱ्यांचा सरकारवाडा | ब. मो. पुरंदरे | ७ – ०० |
| ५ | फिडेल, चे आणि क्रांती | अरुण साधू | ७ – ०० |
| ६ | परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २ – ०० |
| ७ | सहा साहसे | दा. सी. देसाई | २ – ०० |
| ८ | पूर्णिया | अनिल अवचट | ६ – ०० |
| ९ | गुजराथेतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७ – ०० |
| १० | कोठे आणि कधीतरी | डॉ. सुधीर फडके | १० – ०० |
| ११ | रातराणी | विजय तेंडुलकर | १२ – ०० |
| १२ | आणि ड्रॅगन जागा झाला | अरुण साधू | १४ – ०० |
| १३ | एका पराभवाची कहाणी | अनंत भावे | १५ – ०० |
| १४ | शतपावली | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| १५ | श्रीग्रामायन | श्री. ग. माजगावकर | १५ – ०० |
| १६ | आनंदाच्या दाही दिशा | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| १७ | नाझी भस्मासुराचा उदयास्त | वि. ग. कानिटकर | ४५ – ०० |
| १८ | पॅपिलॉन | रवींद्र गुर्जर | २५ – ०० |
| १९ | हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा | अशोक परळीकर | १२ – ०० |
| २० | देवाघरचा पाऊस | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| २१ | मॅक्झिम गॉर्की | सुमती देवस्थळे | १० – ०० |

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### २९।५।७६ ते ४।६।७६

**मेष : नव्या पर्वाकडे वाटचाल**

हा आठवडा प्रगतीचा व आनंदाचा आहे. पहिला गुरू, दुसरा रवी हे ग्रह अनुकूल आहेत. उद्योगात लक्ष घाला. केवळ नोकरीच्या मागे लागू नका. तुमचा पिंड नोकरीचा आहे हे खरे आहे, पण या आठवड्यात औद्योगिक क्षेत्रात तुम्ही महत्त्वाची कामगिरी करू शकाल. खते, तयार कपडे, औषधे यांचा व्यापार करण्यात फायदा होईल. चालू व्यापार अडचणीतून बाहेर पडेल. जुने येणे वसूल होईल. स्वतंत्र असा कोणताही उद्योग सुरू करण्याचे तरुणांचे स्वप्न साकार होऊ शकेल. नोकरीत तसा वाईट काळ नाही, पण अजून तरी कामाचे 'वजन' कमी होण्याचे चिन्ह दिसत नाही. विनम्रपणाने वागून वरिष्ठांची मर्जी मिळवू शकाल. ज्यांना नोकरी नाही त्यांना काम मिळेल. शुभ दिनांक ३०–३१ व १.

**महिलांना :** नोकरी करणाऱ्या महिलांनी व्यावसायिक कोर्स पूर्ण करावा. पैशाची कमतरता भासणार नाही.

**विद्यार्थ्यांना :** विद्यार्थ्यांनी चळवळी व भांडणापासून दूर राहावे, नियमांचे पालन करावे.

**वृषभ : योजनांना गती मिळेल**

मागच्या आठवड्यापेक्षा हा आठवडा जास्त सुसह्य व प्रगतीकारक जाईल. बारावा गुरु तुम्हाला अडचणीतून नेत आहे हे खरे असले तरी, शनि-मंगळ तुम्हाला अनुकूल साथ देत आहे. शनि-मंगळाचे काम यावेळेपासूनच फायद्याचे होऊ शकेल. अखेरची संधी मिळून अनेक दिवसांचे स्वप्न साकार होऊ लागेल. मनातील ढळलेला आत्मविश्वास, अंगात शिरलेला आळस दूर होऊन जोमाने कार्य करू लागेल. जी व्यक्ती तुम्हाला मदत करू शकेल ती व्यक्ती अनपेक्षितपणे तुमच्या सहवासात येईल. नोकरीच्या क्षेत्रात आजवर जे काम केलेले असेल ते वरिष्ठांकडून हिशोबात धरले जाईल. श्रम व परिश्रम सत्कारणी लागतील. शुभ दिनांक ३१–२.

**महिलांना :** मैत्रिणीच्या सहवासात मन प्रसन्न राहील. पैसा, उद्योग, नोकरी यांत अनुकूलता राहील.

**विद्यार्थ्यांना :** शाळा किंवा कॉलेज बदलायचे असेल तर यावेळी प्रयत्न करा. यश येईल.

**मिथुन : अविचार सोडा**

रवि-शुक्राची माया अजून तरी काही काळ तुम्हाला मिळणे कठीण आहे. त्यामुळे विचारांशी व विवेकाशी तुमची झालेली फारकत उपासनेच्या मार्गानेच तुम्हाला पुन्हा मिळवता येईल. नोकरीत भलता अभिमान बाळगू नका व भलत्या माणसाच्या दडपणाला बळी पडू नका. जमीन व घर याबाबतीत त्रास होऊ शकेल. घरमालक असाल तर, भाडेकरूंकडून व भाडेकरू असाल तर, घरमालकांकडून. शेतीच्या व्यवसायात जास्त प्रयत्न होणे जरूर आहे. खर्च फार होईल. मदतीसाठी आलेल्या माणसांकडून आयत्यावेळी अडवणूक होईल. श्रम खूपच करावे लागतील. तब्येत सुधारेल. लेखनात नवे नवे उद्योग करीत बसाल. पण त्यामुळे आलेली संधी गमावते की काय, असे वाटेल. चालू नोकरीत काम फार पडले तरी ते करा. शुभ दिनांक ३१–१–२.

**महिलांना :** व्यापार किंवा इतर प्रकारचा ज्यांचा धंदा आहे त्यांनी नोकरांवर विश्वासून राहू नये. नोकरीत वरिष्ठांच्या मर्जीवर अवलंबून राहू नका.

**विद्यार्थ्यांना :** साहित्य, कलाक्षेत्रांत मन गुंतवा. कलावंत व्यक्ती भेटतील. परिचय होईल.

**कर्क : शुभदायक !**

आठवडा समाधानकारक जाईल असा एकंदर ग्रहांचा अंदाज आहे. शनि–मंगळाची युती होऊन गेलेली असून त्याचे परिणाम या आठवड्यापासून दिसू लागतील. तुम्हाला साडेसाती असल्यामुळे काही नुकसानकारक घडेल का अशी शंका तुमच्या मनात आहे ती दूर करा. या आठवड्यात तुमच्या सार्वजनिक जीवनात अशी एखादी शुभदायक घटना घडण्याची शक्यता आहे की, त्यामुळे अनेक लाभ दृष्टिपथात येतील. या राशीच्या भाग्यवंत लेखकांना साहित्यक्षेत्रात अभिमानास्पद मान मिळणार आहे. सरकारी पुरस्कारदेखील मिळू शकेल. नोकरीत मान, अधिकारात वाढ, मिळकतीत वाढ असे काही तरी घडू शकेल. प्रवासाचे अचानक ठरेल. परदेशी जाण्याच्या दृष्टीने काही हालचाली होऊ शकतील. शुभ दिनांक ३०, ३१, २.

**महिलांना :** भरतकाम व वीणकाम करणाऱ्या महिलांना चांगली मिळकत होईल. नोकरीत पगारवाढ मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** दत्त उपासना करा. अनेक बाबतीत यश येईल.

**सिंह : दक्ष राहावे**

साडेसातीतच शनि–मंगळाची युती तुमच्या व्ययस्थानी झाली आहे ती तुम्ही दक्ष राहावे यासाठीच. व्यापारी, कारखानदार, शेतकरी, अधिकारी इत्यादी लोकांनी आपले आर्थिक व्यवहार काळजीपूर्वक करावे. कर्ज फेडणे अशक्य होणार आहे. उसने पैसे घेऊ नका. ते ठरलेल्या मुदतीत परत करणे अशक्य होईल. वचनभंगाचा मोठा ठपका यावेळी तुमच्यावर येऊ शकेल. स्वतःचा कोणताही उद्योग असो कामगाराकडून नुकसान होणार नाही याची काळजी घ्या. नोकरीत दक्ष राहा. वरिष्ठांबरोबर मतभेद अगर भांडण होऊ देऊ नका. नोकरदारांनी त्यांच्या कामाच्या वेळा कटाक्षाने पाळाव्यात. शुभ दिनांक २९, ३१.

**महिलांना :** तुम्ही कोणतेही काम केलेत तरी त्याचे श्रेय तुम्हाला मिळण्याची आशा नको. नोकरीत कामाचा ताण वाढेल.

**विद्यार्थ्यांना :** सध्याची परिस्थिती कोणताही बदल करायची नाही. काळजीपूर्वक वागा.

**कन्या : समाधान कमीच !**

तुम्हाला खरे म्हणजे तसे वाईट दिवस नाहीत. पण मन सतत व्यग्र राहाते व समाधान असे अजिबात मिळत नाही असाच अनुभव यावेळी येईल. पैसा गरजेपुरता मिळत राहील पण हात सोडून खर्च करावा असे काही घडणे जरा कठीणच. पैसे कसे येतील व कसे जातील हे कळणे कठीण होईल. कामाचा ताण कमी होणे नाही. रोज एक डोकेदुखी संपली तरी दुसरी वर डोके काढील. पत्रव्यवहार भाषा कडक राहील. कौटुंबिक संबंधांत वादळ निर्माण होईल. नोकरीत काम

सारखे वाढतच राहील. धाई-गर्दी पाठ सोडणार नाही. मात्र असे असले तरी प्रतिष्ठा व तुमचा दरारा कमी होणार नाही. तब्येत सुधारेल. शुभ दिनांक २९, ३१.

**महिलांना :** तब्येत सुधारली तरी मन उत्साही होण्यास अजून थोडा काळ वाट पहावी लागेल. व्याप वाढेल. ताण पडेल.

**विद्यार्थ्यांना :** परीक्षेतील यश दुणावेल. कौतुक होईल.

**तूळ : महत्त्वाच्या घटना**

आज आघाडीवर ज्या राशी आहेत त्यांत तुमची रास आहे. जे म्हणाल ते घडते, जे मनात ठरवाल ते पार पडते. त्यामुळे प्रतिष्ठा व प्रगती यांचे मिश्रण आज तुमच्याभोवती निर्माण झाले आहे. या आठवड्यात तुमच्याभोवती एखाद्या महत्त्वपूर्ण घटनेचे वलय निर्माण होणार असून ही घटना अत्यंत उत्तम अशी असेल. या आठवड्याचा 'नायक' अशी तुमची गणना होईल. मित्रमंडळीस हात सोडून पैसे खर्च करावे लागतील. कलावंतांना कुठे बसूं तर कुठे उठू असे होऊन जाईल. नोकरीत स्थलांतर घडून येणार असल्याने मन अत्यंत उत्साही राहील. ज्या पत्राचे उत्तर येण्याची तुम्ही वाट पहात होतात ते येईल. बेकारांना नवकीच दिलासा मिळेल. शुभ दिनांक २९, ३१.

**महिलांना :** रंगभूमी व गानक्षेत्र यांत उपेक्षित झालेल्या महिलांना वरदान मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** आवडता अभ्यास करायला अनुकूलता लाभेल.

**वृश्चिक : श्रमाला साथ**

भाग्यस्थानी येऊन बसलेले शनि-मंगळ तुम्हाला हितकारक अशी पावले उचलणार आहेत. तुमच्याभोवती निर्माण झालेली अडचणीची कोंडी हेच शनि-मंगळ समर्थपणे फोडणार आहेत. पैसा तुम्हाला पुरत नाही याची मला कल्पना आहे. कारण राहू-हर्शल व्ययस्थानी आहेत व ते नवे नवे खर्च निर्माण करीत आहेत. गेले काही दिवस तरी पैशासाठी वणवण हा तुमचा रोजचा कार्यक्रम झाला आहे. पण मित्र हो, याच आठवड्यात बदल घडत असल्याचे दिसून येईल. तुम्ही करीत असलेल्या श्रमाला अनुकूल साथ मिळू लागेल. नोकरीत जे अजिबात अनुकूल घडत नव्हते ते आता घडू लागेल. थोडा दिलासा मिळेल. शुभ दिनांक १-२

**महिलांना :** ज्या उत्साहाने तुम्ही उद्योग उभारला तो उत्साह यावेळी टिकून राहील. पैसा कमी पडणार नाही.

**विद्यार्थ्यांना :** नव्या उमेदीने ठरवलेला अभ्यास पार पडेल. मदत मिळेल.

**धनू : कौटुंबिक घडामोडी**

राशिस्वामी गुरू पांचवा असताना आत्मसामर्थ्य वाढते, उपासनेचे फल पदरात पडते, सूचक स्वप्ने पडतात व पुढे घडण्याऱ्या घटनांची चाहूल लागते याचा प्रत्यय येईल. प्रवचनकार, लेखक, कीर्तनकार यांचे कार्य प्रभाव पाडून जाईल व त्यांच्या लोकप्रियतेला भरती येईल. कौटुंबिक स्वास्थ्य मात्र हवे तेवढे मिळणे कठीणच आहे. शनि-मंगळ तुमच्या उभारीला अपशकून करण्याचा सतत प्रयत्न करतील. घटकेत उत्साह तर घटकेत निराशा असा ऊनपावसाचा खेळ चालू राहील. नोकरीत तुमच्या योजनांना यश मिळणार असल्यामुळे धांदल, ताण व गर्दी ही तुम्ही तुमच्याभोवती स्वतःच निर्माण करणार आहात. आर्थिक परिस्थितीचे चटके जरी बसले तरी ते जाणवणार नाहीत. शुभ-दिनांक २-३-४

**महिलांना :** आजाराची भीती बाळगू नका. धार्मिक भावनेचा मनावर पगडा राहील. घरगुती वातावरण उत्साही राहील.

**विद्यार्थ्यांना :** योगासने समजून घ्याल. त्याचा अभ्यास आत्मसामर्थ्य वाढवील. मन प्रसन्न राहील.

**मकर : अनुकूल घडेल**

सध्या तुम्हाला गुरूची साथ नाही. सुखस्थानी त्याचे भ्रमण स्वास्थ्याच्या दृष्टीने फारसे चांगले नाही. रवि-शुक्र हीच कायती तुमची आशेची किरणे आहेत. त्यांच्या बळावरच तुम्ही जे काय ठरवाल त्यात अल्प प्रमाणात का होईना यशस्वी व्हाल. सार्वजनिक काम करण्याला उत्साह वाटेल. अनेक दिवस जे काम होत नव्हते ते होईल. नोकरीत कार्यक्षमता वाढेल व त्याचा प्रभाव वरिष्ठांवर पडेल. नोकरीत अनेक दिवस जे स्वप्न पहात होतात ते साकारलेले दिसेल. प्रवास अवश्य करावा. महत्त्वाच्या कामगिरीसाठी परदेशी जाण्याचा योग आहे. सेवानिवृत्त लोकांना चांगले दिवस येऊ लागतील. आरोग्याला प्रसन्नतेची जोड मिळेल. आर्थिक परिस्थिती सुधारेल. शुभ दिनांक ३१-२.

**महिलांना :** तुमचा त्रास आता खूपच कमी झाला आहे. उत्साहाने नोकरीत काम कराल. बढती मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** परीक्षेत अभूतपूर्व पण अनपेक्षित यश मिळेल. चैन टाळा.

**कुंभ : प्रगतीची झेप**

शनि-मंगळासारखे दोन अत्यंत सामर्थ्यवान ग्रह शत्रुस्थानी म्हणजे शत्रूचे कंबरडे मोडलेच म्हणून समजायला हवे. तसेच तिसरा गुरू दिवसेदिवस तुमच्या कर्तबगारीला वेग आणत आहे. ती कर्तबगारी फोफावत आहे. अशा स्थितीत रवी सुखस्थानात बसून तुमच्या सुखाला कितीही अपशकून करू द्या ! त्याची तुम्ही मुळीच पर्वा करू नका. या वेळी धाडशीपणाने पुढे पाऊले टाका. यश तुमच्या हाती सहजगत्या पडणार आहे. उद्योग असो की नोकरी असो तुमच्या वाट्याला प्रगतीची झेपच येणार आहे. नोकरीत प्रमोशन मागण्यासाठी तुम्ही संधीची वाट पहात होता ती संधी आता आली आहे. इतकेच नव्हे तर, सर्व प्रकारचे गैरसमज दूर होऊन बरेच काही पदरात पडू शकेल. भागीदारीत एखादा नवा धंदा सुरू करता येईल. शुभ दिनांक ३१-२.

**महिलांना :** कोण काय बोलतो वा टीका करतो हे लक्षात घेऊ नका. सद्यःस्थिती दोलायमान राहिली तरी नुकसान होणार नाही.

**विद्यार्थ्यांना :** शिक्षणासाठी मदतीचे केलेले प्रयत्न यशस्वी होतील.

**मीन : सुखात भर**

सारे काही अनुकूल घेऊन हा आठवडा प्रवेश करीत आहे. यश आणि आनंद या दोन्हींचा लाभ तुमच्या पदरात पडणार आहे. तुम्ही लेखक अगर पत्रकार असाल तर तुमचा गौरव होणार आहे. एकतर सरकारी पुरस्कार मिळेल, नाही तर एखाद्या संस्थेकडून गौरव होईल. कीर्ती आणि प्रसिद्धी हातात हात घालून तुमच्यासमोर उभी राहणार आहेत. नव्या लेखनाची सुरुवातदेखील या वेळी तुम्ही करू शकाल. नोकरीची परिस्थिती अनुकूल राहील. ज्यांना अस्तित्वाची देखील खात्री वाटत नसेल त्यांच्या बाबतीत अगदी उलट अनुभव येईल. मागितले काय व मिळाले काय असे म्हणून तो आश्चर्यचकित होऊन जातील. आरोग्य व त्याचबरोबर उत्साह येईल. मिळकतीत वाढ होईल. शुभ दिनांक २९-३१.

**महिलांना :** नोकरीच्या दृष्टीने हा आठवडा अनुकूल आहे. विशेषकरून शिक्षकांना जास्त अनुकूलता आहे.

**विद्यार्थ्यांना :** व्यावसायिक परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठे यश मिळेल. ☐

# परंतु दादा कोंडके सोंगाड्या इतके झाले!



नंदू राजे

## लेखांक आठ

**दादा स्वतःचं किंवा सोंगाड्याचं जे देणं लागतो ते त्यानं अजूनही पुरं केलेलं नाही....**

'पुण्यात धा–बारा हप्ते लय दणक्यात हाऊसफुल्ल गर्दीत पिक्चर चालू होतं. पब्लिक कमी होण्याची बिलकूल लक्षणं नव्हती. लातूर, सांगली, नाशकातपण नीट उभं राहायला लागलं होतं. लय हवा होती बघ सोंगाड्याची त्या वक्ताला. पण मुंबैला चांगलं थेटर गावत नव्हतं. विच्छा उचलून धरणारा इथला तमाम पब्लिक पिक्चरला येईल असा माझा होरा होता. मॅजेस्टिक थिएटर मिळत होतं पण दादरमधलं थेटर हवं होतं मला. प्लाझा मिळणं शक्यच नव्हतं. शिवाय बापूंचं पिक्चरदेखील चालत होता प्लाझाला. आणि कोहीनूरवाले तर तीन हप्त्यांच्या वर द्यायला मागत नव्हते. शेवटी ठरवलं, काय होईल ते होईल, तीन तर तीन आठवडे; कोहीनूरचीच उडी घ्यायची. म्हणालो पिक्चर चालायला लागलंच तर कोहीनूरवाले काय भांडवल वगैरे करायचं मनात घेतीलच. फुडचं फुडं बघू......'

एन्हाना दादानं त्याच्या दुसऱ्या चित्रपटाची–एकटा जीव

सदाशिवची पूर्वतयारीदेखील करायला सुरुवात केली होती. कथा पटकथा बांधून घ्यायला सुरुवात केली होती. सोंगाड्याचं अपूर्व यश डोळ्यांच्या आवाक्यात आलेलं होतंच आणि नुस्त्याच त्या यशावर हा वळवळ्या इसम स्वस्थ बसून राहणार होता. सदाशिवची तयारी धडाक्यानं करायची व शक्यतो सोंगाड्या गावभर गाजत असतानाच दुसरा पट करून मार्केटात चढवायचा असं हिशेबी पण धूर्त गिमिक्स सध्या मराठी निर्मात्यांच्या डोक्यात न बसणारे अन खिशाला न परवडणारं-केलं तर एकापरी दुसऱ्या चित्रपटाच्या यशाचा संभव निश्चितच वाढेल हे गणित दादाच्या डोक्यात फिट्ट होतं.

मुंबै–दादरच्या कोहिनूरात सोंगाड्या पहिले दोन हप्ते हाऊसफुल्ल गर्दीत पब्लिकची दाद घेऊन होता आणि दादानं कोहीनूरच्या कपूर-साहेबांना थिएटरची मुदत वाढवून देण्यासंबंधी विनंती–गळ घातली आणि नाही तर हा प्रश्न आपण शिवसेनेला धसास लावायला सांगू अशी माफकं धमकीही. (मला पक्क आठवतं 'तुझी न बाळासाहेब ठाकऱ्यांची पहिली ओळेखभेट केव्हा कशी झाली' या प्रश्नाला एरवी फटाफट उत्तरं देणारा दादा प्रथमच अडखळला होता. काही मोघम, जुजबी बोलून ह्यानं उत्तर देण्याचं नीटपणे टाळलं होतं) नवकेतन-सारख्या, देव आनंदसारख्या मातब्बर निर्मात्याचं तेरे मेरे सपने आधीच केलेलं करारबद्ध बुकिंग टाळणं बहुधा कपूरसाहेबांना अशक्य झालं असेल, की दादा म्हणतो तसं निर्माता म्हणून चित्रपटसृष्टीत नुक्त्याच प्रवेश केलेल्या कानगिल्या निर्मात्याला शिवसेना काही भरीव साहाय्य करणार नाही व शिवसेनालादेखील तेव्हा फार काही पाठिंबा नाही असं धरून कपूरांनी सोंगाड्याचं बुकिंग वाढवून द्यायला चक्क नकार दिला.

> 'नंतर मात्र आयला लईच धमाल आली' दादाला ही मागची भंकस आठवून आताही हसू फुटतं. 'निदर्शनं काय, काळे बावटे काय, घोषणा–मोर्चा काय, माम्ला एकदम फिट्ट झाला बघ. बाळासाहेबांनी थेट्रासमोर एक लय जोरदार भाशन हानलं न आपण बी बघा गरीब बिचाऱ्या मराठी निर्मात्याला ही मंडळी कशी अडवतात बिडवतात असलं तुनतुनं वाजवलं.'

खरं तर दादाला गरीबबिच्चारा असं त्याचा खास दोस्तही मानायचा नाही.

एकूण काय तर कोहीनूर मॅनेजमेंटला सोंगाड्या खाली उतरवणं शक्य झालं नाही. ही अशी पब्लिसीटीदेखील सोंगाड्याच्या प्रसिद्धी-च्याच कामाला आली आणि सोंगाड्या सिल्व्हर ज्युबिली करून पार गेला तरी हाऊसफुल्लचा बोर्ड खाली यायला मागेना.

> 'सोंगाड्याचं यश नेमकं कशात आहे असं तुला वाटतं दादा ?'
> 'आयला पिक्चरच्या सक्सेस काय एकाच गोष्टीवर अवलंबून अस्तोय. पिक्चर हीट होण्याबद्दल तुला एक किस्सा सांगतो... तर काय झालं एक एक्दम मराठी विराठी निर्माता होता बघ... एक्दम शिनेसम्राट वगैरे... तर काय झालं...'

आता हा किस्सा ऐकल्याशिवाय माझं निभणारच नव्हतं, पण दादाला अडवायचा झालेला व्यवहारी मोह मला सहज टाळता आला. 'काय सांगत होतो... हां तर या पिक्चरकिंगनं देवाची फार्फार फ्रार्थनाभिर्थना केली पण देव हुशार. तो म्हणतो साला प्रोडयूसर मनापास्न कशाला प्रार्थना करेल, तर त्यानं नारदाला शिप्रायडी-गिरी करायला पाठवून दिलं. नारदानं लय चौक्शी-बिक्शी केली तर, प्रोडयूसर खराच भगत हाय असं त्याला आढळून आलं. मग काय नारदानं देवाला रिपोट केलाच की, देवा मराठी मानूस हाय, पिक्चरवाला बी हाय तरीपण सच्चा इसम आहे. तशी देवबाप्पाला प्रसन्न न होणं अगदी इंपाशिबलच झालं तर लक्ष्मिबी म्हणाय् लागली की प्रसन्न व्हाच. झालं, देव म्हणाला चल तीन वर मागून घे. निर्माता म्हणाला, आयला आता आपली लॉटरी फुटलीच. तशी त्यानं पयला वर मागितला की, बाप्पा महाराष्ट्र सरकारची दिवाळी बंपर आफरची लॉट्री फुटायचीय तर एक्दम मॅजेस्टिक टिकीट नंब्रासकट द्यावा. देवानं दिलं. आयला टॅक्स मायनस प्रोडयूसरला सफेद पैका गावलान. तशी त्यानं घोड्याचा जॅकपॉट पूल मागितला. देवानं तो पण दिला... पैकाच पैका, हाय की नाही. तशी तो प्रोडयूसर म्हनला देवा, आता एकच सांगा, आपलं कलर पिक्चर उद्या लागतंय त ते हिट्ट व्हईल का ते सांगा... आयला देवाचीपुन ततपप झाली, लय डोक्श खाजवून देवानं इचार केला न म्हनला... पयला शो बघून मग सांगतो!' न आयला तू विचारतोस नेमकं कारण काय म्हणून.'

'दादा पण तरीदेखील... निदान मोठ्यातलं मोठं कारण, तुझ्या अंदाजानं ?' 'हे बघ सिनेमातले आडाखे हिशेब काही त्यावेळी मला ठाऊक नव्हते. एक ढोबळ अंदाज तेव्हढा होता. म्हंजे हिशेब अंदाज बाबांचे. पण आता मागं वळून पाहिलं तर वाटतं की, त्यावेळी मराठी पिक्चरचा बाज होता ग्रामीण, तमाशाचा. लय तुरेफेटेवाले शाहीर हीरो. आणि बरोबर गावचा पाटील न फरशी कुऱ्हाड. विनोद होता तो फारतर तमाशा-तल्या नाच्यापोऱ्याचा. बहुधा हे तेच तेच पाहून पब्लिक वैतागले होते न ही सोंगाड्याची कॉमेडी एक्दम वेगळी वाटून आवडली. बस, आणखीन काय सांगायचं.'

मराठी चित्रपटांचा हा ग्रामीण बाज अजूनही अर्धामुर्धा टिकून आहेच. त्यावेळीही अगदी आतासारखी– मराठी कॉमेडी सिनेमात न नाटकात फार तर मध्यमवर्गीय स्तरावर, बहुतांशी इंपोर्टेड, चोरलेली आणि केवळ टी.व्ही.लायक अशीच फालतू होती.

विच्छावाईज् न सोंगाड्यापासून आलेली ही कॉमेडीची पारंपारिक पण वेगळीमोकळी हवा ही दादाची सर्वात मोठी कॉन्ट्रीब्यूशन मानायला हवीयू.. फक्त ती राबवा-

यला, पेलायला समर्थ सोंगाडचे मात्र आजूबाजूस दिसत नाहीत.

तरीही हे एवढं वेगळेपण सोडलं तर, सोंगाडचांत दादानं व्यावसायिक गिमीक्स निटपणे वापरली होतीच. आता जरी त्याचं श्रेय दादा स्वतःकडे घेत नाही तरीही डोळसपणे सिनेमा बघितलेल्या या माणसाला ती गिमीक्स निटपणे ठाऊक असावीत असा मला ठाम संशय आहे. दिग्दर्शक गोविंद कुलकर्णी आणि लेखक वसंत सबनीसांच्या थोड्याफार प्रसिद्धीचा त्यानं निटपणे फायदा उठवला. राम कदमसारख्या त्यावेळेच्या 'चालू' संगीतदिग्दर्शकाचाही– त्यांच्या नावाचा न संगीताचा फायदा सोंगाडयाच्या यशाला मिळालाच. सोंगाडयाची गाणी प्रचंड लोकप्रिय झाली. लोकप्रियता चित्रपटाच्या यशाला अत्यंत आवश्यक असते. सोंगाडयातली फक्त रागदारी वळणाची दोन गाणी फारशी वाजली नाहीत आणि दादानं त्याच्या नंतरच्या चित्रपटात ती चूक पुन्हा केली नाही. शिवाय नाही म्हटलं तरी अरविंद लाड– जास्त करून हिंदी चित्रपटाचं छायाचित्रण करणारा कुशल फोटोग्राफर व नटनटयांपैकी रत्नमाला, निळू फुले, गुलाब मोकाशी, नाच्याच्या कामात प्रसिद्ध असलेला गणपत पाटील यांच्या नावानीही सोंगाडयाला वजनदार बूड मिळालं होतंच. प्रसिद्धीतंत्राचाही नीट हंगामा दादानं केलाच. त्यात विच्छाच्या लोकप्रियता व दादा कोंडकेची स्वतःची प्रतिमा त्यानं जाहिरातीत सारखी हातोडाहॅमर केली. कधी नव्हे ते मराठी चित्रपटांची जाहीरात तीन तीन, चार चार, कॉलमी लांबरुंदीची त्यानं केली– आणि तिथं गुंतवणूक वाढेल याचा मूर्ख हिशेब केला नाही.

मराठीत जवळपास प्रथमच, हिंदी वळणानं पिक्चरची प्रसिद्धीपूर्व हवा अशी निर्माण करता येते, त्याचा धंद्यासाठी तुफान उपयोग होऊ शकतो, हे दाखवणारा दादा हा बहुधा पहिलाच निर्माता होता. सोंगाडयाला कापडं चढविण्यातदेखील त्यानं मखलाशी केलीच. भोंगळ हाफपॅण्ट, हमखास विनोद निर्माण करेल त्यावर भर देऊन त्यानं इतर नाना कपडयांत सोंगाडयाला उभा केला. धोतरबंडी, काचलेलं धोतर व कुडता, चमन, शेंडी, तर कधी शाळकरी टोपी. एकप्रकारे दादानंही सोंगाडयाच्या रूपाबाबत केलेले वैयक्तिक प्रयोगच होते. त्यात ज्याला ज्याला हवं त्या कापडांत त्यानं त्यानं सोंगाडयाला अ‍ॅक्सेप्ट करावं, उचलून धरावं, जवळिक साधावी वा स्वयंप्रतिबिंब पाहावं असा चलाख हिशेब होता. त्याच्या पुढल्या चित्रपटातदेखील दादानं अशी रूपं घेतलीच. 'एकटा जीव'मध्ये तो धनगराच्या वेशात भोंगळ सुटात उभा राहिला. 'आंधळा'मध्ये धोतर-बंडी, कुडता व डबलरोलमधील दुसरी भूमिका त्यानं तद्दन फिल्मी हिरोस्टाईल कपडयांत वागवली. पांडू हवालदारच्यावेळी तो पुन्हा नीटपणे हाफपॅण्टीत आला तरी, हिंदी पिक्चरची टिंगल करण्याचं निमित्त करून त्यानं कपडे बदललेले होतेच आणि आत्ताच्या 'तुमचं आमचं जमलं'मध्ये त्यानं काचेदार धोतर आणि बिनगळयाचा सदरा राबवला. ह्या प्रत्येक चित्रपटात त्यानं हाफपॅण्ट सोडली नव्हतीच. त्याकरता त्यात त्यानं पंचेस ठेवलेले होते...पण हाफपॅण्टवर लक्ष केंद्रित केलं नाही. त्यानं या हाफपॅण्टवाल्या सोंगाडयाची प्रतिमा करण्याचा अट्टाहास न करता दादा कोंडके या माणसाची प्रतिमा करण्यात लक्ष केंद्रित केलं.

नटनटयांच्या निवडीतदेखील त्यानं बेरकी चोखंदळपणा दाखवला. पहिल्या दोन चित्रपटांतल्या ग्रामीण भूमिकेत उषा चव्हाण, तर 'आंधळा मारतो'मध्ये शहरी भूमिकेसाठी त्यानं अंजनासारख्या हिंदी चित्रपटांत काम करणाऱ्या–तिच्या अशुद्ध उच्चारासह–नटीला बांधून घेतलं. 'एकटा जीव'मधल्या शहरी साईडरोलसाठी त्यानं पुष्पा भोसलेला वापरलं, तर 'आंधळा मारतो'मध्ये अरुणा इराणीला तिची हिंदी पिक्चरातली रक्कम मोजून गेस्ट रोल करायला लावला. पांडूतल्या पोलिसाच्यासमोर नेमकी केळीवाली उभी करून उषा चव्हाणला आणलं, तर अशोक सराफसारख्या गुणी पोराला– ज्याचा अभिनयाचा बाज, खल आणि विनोदी असा मिश्र आहेय, असा मूळात निळू फुलेसाठी लिहिलेल्या भूमिकेत आणलं.

सोंगाडयाच्या यशापासून पहिला अर्धा भाग संपूर्ण विनोद–टवाळी आणि नंतरचा अर्धा कथानक वगैरे असं व्यावसायिक यश बहुधा हमखास देऊ शकेल असाही फार्म्युला दादानं बांधून टाकला. त्यात सोंगाडयाच्या कॉमेडीचा ऱ्हास होणं हे अपरिहार्य, अटळ होतंच आणि केवळ ह्याच कारणानं दादाचे चित्रपट–दादाकडे अमाप टॅलण्ट असूनही–त्याची वाजवी किमान उंची गाठू शकले नाहीत, पुढं गाठतील असं वाटत नाही. ज्या स्वतःच्या लोकप्रियता, गुणवत्ता असलेल्या विच्छाच्या सोंगाडयावर दादानं सोंगाडया चित्रपटाच्यावेळी भिस्त टाकली, विश्वास दाखवला त्याच विच्छाच्या सोंगाडयावर व स्वतःच्या टॅलण्टबद्दल दादाला संपूर्ण आत्मविश्वास दाखवू शकला नाही ही दादाची न सोंगाडयाची शोकान्तिका आहेय.


# पॅपिलॉन
# पॅपिलॉन

लेखक : हेन्री शॅरीयर
अनुवाद : रवींद्र गुर्जर

किमत : पंचवीस रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

सोंगाड्याच्या यशात मराठी पत्रकारांचा वाटाही मोठाच मानायला हवा. सहसा मोकळेपणी, कशाचंही फारसं कौतुक न करणाऱ्या ह्या मंडळींत – मी धरून – जणूकाही दादाची न सोंगाड्याची प्रशंसा करण्यात अहमहमिका, स्पर्धा करून राहिली. पुण्यातली परीक्षणं माझ्या नजरेस आली नाहीत पण मुंबईतल्या एकूण एक दैनिकांनी, साप्ताहिकांनी सोंगाड्याला न भुतो न भविष्यती उचलून धरला. दैनिक नवाकाळला तो ' अविस्मरणीय ' वाटला, तर फिल्म केसरीला त्यात ' अवीट गोडी ' आढळली. श्री साप्ताहिकाला ' आत्तापर्यंतच्या तमाशापटातला झिजलेला एकही प्रसंग इथं दिसला नाही ' असं वाटलं. तर मराठा समीक्षकाचं ' दोन घटका मनसोक्त मनोरंजन ' झालं. महाराष्ट्र टाईम्सनं मथळ्यात जरी ' बरी करमणूक ' असा मध्यमवर्गीय हातराखू सूर काढला, तरी मजकुराच्या अखेरी ' दादा कोंडक्याचे हे पहिलेच चित्र इतके आकर्षक वाटते की, त्यांच्या आगामी एकटा जीव सदाशिवची आपेक्षेनं वाट पहावी ', असं मोकळं प्रशस्तीपत्र दिलं. सर्वसाधारणपणे टीकाकार व पब्लिक या दोघांनीही इतकं वाखाणलेलं पिक्चर अभावानेच आढळतं. पण या स्तुती-सुमनांच्या वर्षावांत हा कुणी खुळा दादा कोंडके पिक्चर काढतोय तर त्याला सक्रीय पाठिंबा द्यायला हवा असा सहानुभुतीपर सूर मला जाणवतो. आत्ता करतो तशा शराब पार्ट्या करणं दादाला तेव्हा परवडण्यासारखं नव्हतंच. त्या चालू झाल्या आंधळा मारतो डोळा-पासून. पण या पार्ट्यांचा आणि दादाच्या यशाचा फारसा संबंध आहे असं मला वाटत नाही.

पण एक मराठा सोडला – आणि ह्यातलाही संदर्भ ढोबळच आहे – तर इतर सगळ्यांनी दादानं साधलेली एक अलौकिक गोष्ट नीटपणे इग्नोर केली... मास्तर विनायकानंतर प्रथमच मराठी चित्रपटांत एक सामान्य मनुष्य हिरो म्हणून वावरला... चित्रपटात असा अँण्टी हीरो निर्माण करण्याबद्दल – कदाचित स्वतःच्या नकळत का होईना– दादा कोंडकेला तोड नाही. परदेशी वळणानं वा अनुकरणानं इथली काही प्रायोगिक मंडळी आताशा अँण्टी हिरो उभा करीत नाहीत अशातला भाग नाही. पण हे दादानं आठ वर्षांपूर्वी, त्याच्या पहिल्या चित्रपटात अन ते सुद्धा तद्दन व्यावसायिक बोलपटात केलं, अपेक्षेबाहेर यशस्वी केलं, याचं थोडं फार श्रेय भालजी पेंढारकरांना निश्चितच आहे, पण ते मानण्याचं, त्यावर जुगार खेळण्याचं आणि त्याला पड-द्यावर राबवण्याचं संपूर्ण श्रेय मी तरी दादालाच देईन... आणि याच निमित्तानं नेमका तमाशाच्या जमिनीवरला फुलत झडत, वाढत, कमी होत किंचितसं वळण वजा करत थेट नव्या, आजच्या युगाच्या लोककलेच्या सिनेमाच्या उभ्या बोर्डावर चढला...

दादा कोंडके या नावाच्या इसमानं आतापर्यंतच्या पाच चित्रपटांत काय असं अलौकिक साधलं आहे्‌ की त्याला इतकं सिरीअसली घेतलं जावं असा सवाल करणाऱ्या काही बुजूर्ग मंडळींना हे माझं उत्तर आहे्‌... वाँडेविल तमाशातला पारंपारिक सोंगाड्या मरून पडलेला होता त्याला दादानं – अभावितपणे, हिशेबाने, धूर्तपणे केवळ धंदाव्यवसाय करण्याच्या निमित्तानं का होईना – जिवंत उभा केला आणि तोसुद्धा तद्दन मराठमोळ्या माखीव–गंधील मातीच्या साच्यांत ! ...आणि दादानं हे साधलं तेसुद्धा व्यावसायिक सिनेमांच्या गळेदाब चौकटीत...

दादाच्या ' विच्छानं ' लोकनाट्य वर नेलं. ' आम्ही दादाच्या आधी-पासून लोकनाट्य करत होतो ' असे म्हणणारे अनेक असले तरी नवा मध्यमवर्गीय नाटकवेडा प्रेक्षक लोकनाट्याला उपलब्ध करून दिला तो विच्छा माझी पुरी करानंच. आणि दादाच्या सोंगाड्यानं मरगळ-लेल्या मराठी चित्रपटाला जान दिली – निदान इथही धंदा होऊ शकतो इतकी तरी जाण दिली हे मान्य केलं तर तेही काही कमी नाही...

फक्त हा पडद्यावरला सिनेमा किंवा सिनेमातलं संगीत ही या आत्ताच्या जमान्याची लोककला आहे, फोक आर्ट, फोक साँन्ग्स आहेत हे ह्या माध्यमाकडे स्नॉबीश दृष्टिकोनांतून बघणाऱ्या मंडळींना मान्य व्हायचं नाही !

तरीही धंद्याकडे, कदाचित वाजवीपेक्षा जास्त लक्ष देवून ज्या सोंगा-ड्याचं दादानं पुनरुत्थापन केलं त्याच सोंगाड्याला खच्ची केलं, त्याच्यातली असली पुरी जान कमी केली हे निश्चित आहे...

मी दादाला म्हणालो... ' दादाचे पितृतुल्य गुरू बाबा पेंढारकर मला कोल्हापुरात म्हणाले होते; ' की, दादारे खूप धंदा केलास चार सिल्व्हर ज्युबिल्या झाल्या... पाचवी तसंच काढतो आहेस... आता तरी हे निदान थांबव. कलावंत म्हणून समाजाचं तू काही देण लागतोस ते आता देऊन टाकण्याची वेळ आली आहे... '

कलावंत समाजाचं काय देणं लागतो हे मला ठाऊक नाही. केवळ सामाजिक आशय, बांधिलकी असलेला प्रकार म्हणजेच कला अस भोंगळ युक्तिवाद किंवा काही असेल ते – मला मान्य नाही. पण बुद्धिमंतांनी सोडवायचे वादाचे हे मुद्दे बाजूला केले, दादा समाजाचं काही देणं लागतो की नाही, हा हरकतीचा मुद्दा आड सारला, तरीही एक गोष्ट लख्ख स्पष्ट आहे,

दादा स्वतःचं किंवा सोंगाड्याचं जे देणं लागतो ते त्यानं अजूनही पुरं केलेलं नाही.

[ क्रमशः ]


पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

लेखक
ब. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

## । । तीन हिंदी चित्रपट । । ।

। । शिरीष सहस्रबुद्धे । । ।



# कागज़ की नाव।

# । कभी कभी ।।

# नहले पे दहला।

कागज़ की नाव हा बी. आर. ऊर्फ बाबूराम इशारा यांचा नवा चित्रपट; एक प्रश्नचिन्हांकित चित्र किंवा चित्ररूपातील एक प्रश्नचिन्ह. त्यांच्या चित्रपटांना लावायची इतर विशेषणं आता त्यांच्या रसिकांना सवयीची झाली आहेत. म्हणजे सामाजिक, खळबळजनक, विद्रोही वगैरे. बी. आर. ला अशा चाकोरीत बसवणं चुकीचं आहे असं माझं मत आहे. अर्थात यात सगळाच दोष रसिकांकडे जातो असं नव्हे, कारण बी. आर. इशारांनीही एका चाकोरीचा पाठपुरावा सातत्याने केलेला दिसतो. कदाचित त्यामुळेच 'चेतना' सारखं बंडखोर वादग्रस्त चित्र गाजल्यानंतरही ते पुन्हा उंची गाठू शकले नाहीत. मिलाप, जरुरत, बाजार बंद करो अशी त्यांची नंतरची चित्रं सर्वार्थानं अपयशी ठरली; आणि साहजिकच त्यांच्यावर टीकेची झोड उठली. ढोंगी धंदेवाईकापासून ते थेट विकृतीपर्यंत आरोप करण्यात आले. या अशा पार्श्वभूमीवर इशारा, कागज़ की नाव हा नवा चित्रपट घेऊन आले आहेत; परिपूर्ण नसला तरी लक्षवेधी असणारा एक चित्रपट.

कागज़ की नाव लक्ष वेधून घेतो तो अगदी त्याच्या समर्पणपत्रिकेपासूनच– dedication पासूनच. हा चित्रपट 'तथाकथित सामाजिक सभ्यतेच्या, नीतिमत्तेच्या आणि रूढींच्या पायी बळी गेलेल्या दुर्दैवी जिवांना' समर्पित करण्यात आलेला आहे. सामान्य माणूस हे dedication बारकाईनं पाहातच नाही म्हणून, नाही तर हा मामला गदगदा हलवून सोडणारा आहे. इशारांमधला बागी–बंडखोर इथपासूनच उठून दिसतो. आणि संपूर्ण चित्र पाहिल्यानंतर तर हे डेडिकेशन अनेक अर्थ आणि पुष्कळ प्रश्न उभे करतं. इशारांना यात नक्की काय अभिप्रेत होतं हे नीटसं लक्षात येण्याऐवजी तर्कवितर्कांवरच काम भागवावं लागतं. सामाजिक सभ्यता (decency), नीतिमत्ता (morality), न्याय, रूढी या संस्था, positive values मध्ये गणल्या जातात आणि त्यांचा अंतिम उद्देश माणसाच्या शारीरिक–मानसिक–उन्नयनातच सापडतो; माणसाला भक्ष्य किंवा बळी बनवण्यात नव्हे. अशा परिस्थितीत त्यांना सावजं टिपणाऱ्या सापळ्याचं स्वरूप देणं कितपत न्याय्य आहे, याविषयी मी साशंक आहे.

अर्थात तरीही एक गोष्ट या डेडिकेशनमुळे ठळकपणे जाणवते ती की, ही 'कागज़ की नाव' हे एक 'हेतूप्रधान' चित्र आहे. हेतूप्रधान 'कथाचित्र' असं म्हणायचा मोह मी आवरतोय. वस्तुतः हेतूप्रधान चित्रात कथा हा इतरत्र दुर्मिळ असणारा नगण्य घटक महत्त्वपूर्ण ठरतो, तथापि 'कागज़ की नाव' मध्ये एकतर कथेचा काहीतरी विलक्षण घोटाळा झाला असं म्हटलं पाहिजे किंवा कथा राबवण्याच्या तंत्रातली ती एक क्रांतिकारी घडामोड आहे, असं तरी म्हटलं पाहिजे. कथा ही इथं साध्य वस्तूंपैकी एक नसून एक साधनमात्र आहे. साध्य आहे तो उद्देश, डेडिकेशनमध्ये निर्देश केला गेलेला. अर्थात चित्रपटांचे उद्देश तसे नाना आकार–प्रकार–विकारांचे असू शकतात. निर्मात्याला पैसा वगैरे मिळवून देणं इथपासून–या मुख्य उद्देशापासून–लोकांचं स्वस्त मनोरंजन करणं, तीन तासांत तीस 'स्टार्स' दाखविणं किंवा सोपं म्हणजे स्वप्नं विकत जाणं. कागज़ की नाव हे या आम चाकोरीबाहेरचं चित्र आहे, हे निश्चितच. ते लक्षवेधी होण्याचं हेही एक कारण असू शकेल. भुकेनं–व्यथेनं–चिंतेनं आणि सुखदुःखाच्या अतिरेकानं रात्री जागून काढणाऱ्यांना दिवास्वप्नं दाखवण्याचा उद्योग इशारांनी इथं केलेला नाही आणि रंजनाबरोबरच समाजजागृती हाही त्यांचा उद्देश नाही. कागज़ की नावमधली प्रचारकी थाटाची–वळणंवाकणं सोडली तर दिसते ती समाजविद्रोहाची अवघड बिकट वाट. प्रचलित भाषेत त्याला प्रस्थापितविरोधी बंडखोरी असं म्हणता येईल.

प्रस्थापिताविरुद्धच्या सर्वांगीण उठावाची बीजं चितारण्याच्या नादात कथेच्या सुबक मांडणीकडे इशारांचं दुर्लक्ष झालेलं आहे, किंवा most probably, त्यांनी जाणूनबुजूनच तिकडे काणाडोळा केलेला आहे. एक संपन्न कुटुंबप्रमुख (प्रदीपकुमार) आणि त्याचा एकटा मुलगा राज (राजकिरण) हे दोघे establishment आणि anti–establishment चे प्रतिनिधी म्हणून संघर्षाला उभे ठाकतात. अनेक स्त्रियांशी अनैतिक संबंध ठेवणाऱ्या बापानं आयुष्यातली अनेक कटु–कठोर सत्यं पचवली आहेत, तर प्रेम म्हणजे नक्की काय ते नकळताही सरिता (सारिका)–वर एकनिष्ठपणे प्रेम करणाऱ्या

राजला अजून आयुष्य पहायचंय, बरीच कडवट सत्यं गिळायची आहेत. आपली आई (हेलन) आपल्या (मृत) वडिलांशी शरीर–मनानं एकनिष्ठ नाही, हे धक्कादायक सत्य गिळता न आल्यानं सरिता आत्महत्त्या करते, आणि अशी सत्यं हसत गडप करून ढेकर द्यायची तयारी नसलेला विद्रोही राज वडिलांना प्रायश्चित घ्यायला भाग पाडतो. ही कथा तशी सरळ वाटली तरी इशारांनी ती तितक्या सरळपणे मांडलेली नाही. मनाला पटतील अशा अनुक्रमानं एकापुढं एक घटना दाखवत जाण्याच्या थोपटमार्गाऐवजी, विविध स्थळातले, काळातले, स्तरांवरचे आणि moods मधले प्रसंगांचे तुकडे, सहज विखुरल्यासारखे त्यांनी चित्रपटभर ‘फेकले’ आहेत. त्यामुळे कथेच्या क्रमवार विकसनाला–step by step development–इथं महत्त्व नाही. वावही नाही. संपूर्ण आणि अंतिम परिणाम हा महत्त्वाचा. पण या नव्या तंत्रामुळं अटळपणे उद्भवणारा तुटकपणा घालविण्याइतका वेग व तितकी पकड इशारा चित्राला देऊ शकलेले नाहीत. यामुळे तंत्राचा वापर निर्दोष ठरत नाही. मुख्य म्हणजे ती नैसर्गिक वाढ नसून ‘तंत्र’ आहे, ही जाणीव विसरता येत नाही. या संदर्भात गुलजारने भूतकाळ–वर्तमानाच्या विलक्षण मिलाफाचं जे गतिमान तंत्र ‘अचानक’ चित्रपटात यशस्वीपणे राबवलं होतं, त्याची आठवण आल्याशिवाय राहत नाही.

कागज़ की नाव, हे शेवटी समस्याचित्र–problem picture–आहे; आणि आपल्याला मांडायच्या समस्येला हाताळण्याबाबत जो प्रामाणिकपणा इशारांनी दाखवला आहे तो प्रशंसनीय आहे. अर्थात त्यांनी अमुक एक समस्या यात हाताळली आहे, असं ठाम विधान करणं धाडसाचं ठरेल. सामाजिक समस्या असं गोळाबेरीज उत्तरही सर्वार्थानं पुरेसं ठरेल अशातलं नाही. इशारांना कोणती एक समस्या मांडायची आहे? सेक्स? जनरेशन गॅप? प्रस्थापिताविरुद्धचा लढा? करप्शन? नवी–जुनी नीतिमूल्यं? की माणसाच्या काही सनातन स्वभाव–प्रवृत्तींमधला झगडा? उदा. सत्य–असत्याचा सांकेतिक संघर्ष?

यातलं कुठलंही एक उत्तर पुरेसं होणार नाही. कारण कुठल्याही एकाच समस्येवर इशारांनी आपलं लक्ष केंद्रित केलेलं नाही. पडद्यावर दिसते ती या सर्व ‘प्रॉब्लेम्स’च्या मंथनातून तयार झालेली एक एकजीव एकमेव समस्या; माणसाच्या अस्तित्वाचा अर्थच मुळापासून तपासून पहायला मागणारी ही समस्या आहे. सेक्स, जनरेशन, गॅप वगैरे उपरोल्लेखित प्रश्न हे या एका समस्येच्या विणीतलेच अनेक गोफ, अनेक धागे आहेत. अर्थात यात सेक्स-प्रॉब्लेम मध्यवर्ती असल्याचा आभास निर्माण होत नाही, असं नाही. सेक्स-प्रॉब्लेम हे इशारांचं एक ‘ऑब्सेशन’ तर नाही, असंही मला क्वचित वाटलेलं आहे. तरीही इतर प्रश्न ज्या समजदारीनं त्यांनी सेक्सशी जोडलेले आहेत, आणि तरीही त्यांचं स्वतंत्र अस्तित्व आणि मुख्यतः महत्त्व कायम राखायचा प्रयत्न केलाय्‌ तो दाद देण्यायोग्य आहे. आपल्याला काय मांडायचंय्‌ आणि ते नेमकं कसं मांडायचंय्‌ या दोन्ही गोष्टींचं भान आज फार कमी लेखक–दिग्दर्शकांना राहतं; विशेषतः कट्टर धंदेवाईक चित्रपटांच्या दिग्दर्शकांना. बी. आर. इशारांना या दोन्ही गोष्टींवर, विशेषतः त्यातल्या पहिल्या ‘काय’च्या भागावर चांगली पकड घेता आलेली आहे, असं मला वाटलं. त्यामुळेच सादर करायच्या समस्येशी–समस्यांशी ते पूर्णतः इमान राखू शकले आहेत'

अर्थात या साऱ्याचा अर्थ, ‘कागज़ की नाव’ हा निर्दोष चित्रपट आहे, असा होऊ नये. या चित्राचा प्रमुख दोष, ‘भडक प्रचारकी अभिनिवेश’ हा आहे. इशारा केवळ समस्या प्रभावीपणे मांडूनच थांबले असते, तर कदाचित चित्रपट अधिक कलात्मक, अधिक भिडणारा झाला असता की काय, असं मला वाटलं, इतका त्यातला प्रचारकाचा बाणा उघड दिसत होता. इशारा नुसते उपाय, solution सुचवूनच थांबले नाहीत, तर त्याच्यामागे एक आक्रस्ताळेपणाचं तत्त्वज्ञान उभं करण्याचा जो एक प्रयत्न त्यांनी केलेला आहे, तो अपरिपक्व प्रचारकीपणाबरोबरच खोडकरपणाचाही द्योतक आहे, असं वाटतं. हे तत्त्वज्ञानाचे डोस त्यांनी प्रामुख्यानं तीन प्रसंगांत भरले आहेत. अगदी सुरुवातीचं राज–त्याचे वडील यांचं संभाषण, सरिताच्या मृत्यूचा प्रसंग आणि या बापलेकांचं अखेरचं संभाषण. यांतलं पहिलं संभाषण म्हणजे जवळजवळ प्रदीपकुमारचंच शब्दबंबाळ लांबलचक भाषण आहे. इथे इशारांनी शिक्षणासारख्या महत्त्वाच्या प्रश्नाला हात घातलेला आहे. जे शिकवलं जातं ते आणि आयुष्यात जे समोर येतं ते यांतली दारुण तफावत व त्यात येणारं फ्रस्ट्रेशन आणि आदर्श महापुरुष व त्यांना पुजणारे पण त्यांची शिकवण लाथाडणारे अनुयायी यांतली विसंगती इथे उघड करून दाखवली आहे. अतिशय प्रभावीपणे. दुसरा प्रसंग म्हणजे कल्पनाशून्य प्रचाराचा हास्यास्पद कळस. मुलीचं प्रेत समोर असताना आई (हेलन) जे भाषण झाडते, तो प्रकार नुसताच अविश्वसनीय आणि अवास्तव नाही, तर तिच्या मृत्यूचं खापर साऱ्या समाजाच्या माथी फोडण्याचा इशारांचा प्रयत्न केविलवाणा आणि पराभूत वाटतो. मात्र ‘माणूस हा सुरुवातीपासून शेवटपर्यंत जनावरच असतो, आईबापही देवता नसतात; जनावरंच असतात,’ हा इथला विचार परंपरेला आणि पारंपारिकांना मुळापासून हादरा देणारा आहे. तिसऱ्या प्रसंगात तर समाजाच्या जाचक नीतिनियमांविरुद्ध, रूढीरीतींविरुद्ध आणि बंधनांविरुद्ध बंड पुकारण्याची उघडउघड चिथावणी आहे. मात्र, फ्री सोसायटीकडे नेणारं हे तत्त्वज्ञान इथं कुठेतरी वैचारिक गोंधळात फसल्यासारखं वाटतं. राजच्या वडिलांचं हृदयपरिवर्तन हाही वैचारिक गोंधळाचाच एक प्रकार-परिणाम वाटतो, conviction चा वाटत नाही. याशिवाय ‘अपनी एक अलग दुनिया बसाएँगे’ वालं, प्रेमिकांचं पेटंट पलायनवादी तत्त्वज्ञानही इशारांनी एका प्रसंगात निसटतं मांडलं आहे. मात्र इथल्या पलायनवादाला जिद्दीची एक किनार आहे. इथले प्रेमिक या जगात राहूनच वेगळं जग उभारू इच्छितात, तेही फक्त दोघांपुरतंच नव्हे; तेव्हा मग पुन्हा बंड वगैरे आलंच.

इशारांनी* आपल्या चित्रपटात कोणतं तत्त्वज्ञान मांडावं, याबद्दल आपण अधिकार चालवू शकत नाही. पण त्यांतले दोन ढळक दोष दाखवण्याचा हक्क आहेच. एक तर वर म्हटल्याप्रमाणे हे तत्त्वज्ञान अगदी मुद्दाम ठोकायचंच अशा हट्टानं, वेळोवेळी आणि अवेळीसुद्धा, भडक आक्रस्ताळचा रूपात प्रेक्षकांच्या माथी मारल्यामुळं कलात्मकतेपेक्षा प्रचाराला अधिक महत्त्व प्राप्त होतं.

आणि दुसरं असं की, या सगळ्या तत्त्वज्ञानाचा आव–ताव नकारात्मक आहे, negative आहे. इशारांना या साऱ्या समस्यांबद्दल इतकी आस्था होती आणि त्यावर त्यांना उपायही सुचवायचेच होते, तर काही positive, करणात्मक, solutions सुद्धा सुचवायला हरकत नव्हती. फक्त 'सध्याचा समाज ही कागदी होडी आहे, कधीही बुडेल अशी,' एवढाच निराशावादी निष्कर्ष काढून त्यांना गप्प बसायचं असलं, किंवा ती नीट बुडवायचीच प्रेरणा फक्त द्यायची असली तर गोष्ट वेगळी.

ताज्या दमाचे नवे कलाकार हे इशारांच्या जवळजवळ प्रत्येकच चित्रपटाचं वैशिष्टय असतं. कागज की नाव याला थोडाफार अपवादच म्हणायला हरकत नाही. कारण यात राजकिरण हा एकच चेहरा अगदी नवा आहे. नायिका सारिका ही 'गीत गाता चल'मुळे आधीच प्रसिद्ध पावलेली आहे, तर साहाय्यक भूमिकांतली प्रदीपकुमार हेलन, अरुणा इराणी, मनमोहन कृष्ण आणि आय. एस. जोहर ही सर्व मंडळी अनुभवीच आहेत. सर्वांची कामगिरी आपापल्या ठिकाणी ठाकठीक आहे. हेलनचा ठळक अपवाद. सपन–जगमोहन यांनी दिलेल्या संगीतात पार्श्वसंगीतापेक्षा साध्याच पण आकर्षक चालींचा खास उल्लेख करायला हवा. चारही गाणी–आणि त्यातल्या दोनांचे सुपरइंपोझिशन टेक्निक्चे चित्रीकरण–सुखद असली, तर 'ना जइयो सौतन घर सैंया' हें अरुणा इराणीचं नृत्यगीत माझ्या विशेष पसंतीचं.

जाता जाता : या चित्रपटाला 'A' certificate द्यायचं कारण कळलं नाही. सेक्स आणि व्हायोलन्सनं पुरेपूर भरलेले इतर अनेक चित्रपट 'U' certificate सह उजळ माथ्यानं मिरवताहेत. ◻

## कभी कभी

'कभी कभी' पुण्यात प्रदर्शित व्हायला जी प्रचंड दिरंगाई झाली ती, तो चित्रपट मुंबई व नॉर्थ सर्किटमध्ये 'फ्लॉप्' ठरल्यामुळे, असं मला सांगण्यात आलं होतं. प्रत्यक्ष चित्रपट पाहिल्यानंतर तो 'फ्लॉप्' व्हायला योग्यच होता, असं लक्षात आलं. त्याचं दुसरं काहीच होण्यासारखं नव्हतं.

कभी कभी हा चित्रपट यश चोप्रानिर्मित–दिग्दर्शित आहे. यश चोप्रा हे निर्माता बी. आर्. चोप्रांचे बंधू आणि बी. आर्. कँपचे एक नाणावलेले यशस्वी दिग्दर्शक. बी. आर्. कँप सोडून स्वतंत्रपणे निर्मित–दिग्दर्शित केलेला 'दाग' हा त्यांचा पहिलाच चित्रपट चांगलाच गाजला. त्यांच्या दिग्दर्शनाखाली 'दीवार'नंही नेत्रदीपक यश मिळविले. अशा पार्श्वभूमीवर कभी कभी सारखे निर्जीव आणि फुसके चित्र त्यांनी द्यावं, याचं नवल वाटतं. कभी कभी हे फक्त बिग बजेट् पिक्चर नाही, तर सध्या बोकाळलेल्या मल्टिस्टारकास्टच्या लाटेत वाहावत गेलेलं ते चित्र आहे. चित्रपटक्षेत्रातल्या एखाद्या जंगी पार्टीतच एकत्र येऊ शकतील, इतके 'स्टार्स' आपल्या एकाच चित्रपटात भरण्याचा जो हव्यास सध्या निर्माते करतात, त्याचं एक ठळक अपयश कभी कभीच्या रूपानं पडद्यावर साकार झालेलं आहे. अमिताभ बच्चन, वहिदा रेहमान, शशीकपूर, राखी, ऋषीकपूर, नीतूसिंग, परीक्षित सहानी, सिमी आणि नवतारका नसीम इतक्या तारे–तारकांनी पडद्यावर एकदम दर्शन देणं म्हणजे 'शुअर सक्सेस' असा काही फॉर्म्युला यश चोप्राजींच्या डोक्यात असला, तर एव्हाना त्यांची चूक कळून आली असेल. अशा काही एका फॉर्म्युलाशिवाय हिंदी चित्रपटसृष्टीचं गाडं अडून राहावं ही दुर्दैवाची गोष्ट आहे. एके काळचा लाडका फॉर्म्युला 'ए बॉय मीट्स् ए गर्ल' हा होता, अधिक एक व्हिलन आणि एक कॉमेडिअन–यांची फोडणी चवीसाठी असायची. त्यानंतरचा तितकाच बेचव फॉर्म्युला 'एक हीरो दोन हिरॉईन्स किंवा vice versa, अशा छापाचा होता. सध्या चलती आहे ती सिताऱ्यांच्या खोगीर भरतीची. किमान दोन–तीन नायक आणि तेवढ्याच नायिका यांना करारबद्ध केल्याशिवाय चित्रपटाचा मुहूर्त करायला बंदी असावी, अशा थाटात मल्टिस्टारकास्ट पिक्चर्सच्या घोषणा केल्या जात आहेत. चित्रीकरणाची सुरुवात झाल्यावरसुद्धा थोडीशी ॲडजस्टमेंट उर्फ सरकवासरकवी करून आणखी एक–दोन तारे आत घुसवल्याच्याही वार्ता येतात, तर असल्यापैकी एखाद्याने मुहूर्तानंतर वॉक्–आऊट केल्याचीही घटना घडलेली आहे !

मल्टिस्टारकास्टच्या या गदारोळात निर्माते आणि कलाकार का सामील व्हावेत, याला 'व्यावसायिक यशाचा पाठलाग' यापलिकडं कोणतंही उत्तर नाही. आज शेकडा सत्तर हिंदी चित्रपट साफ अयशस्वी ठरतात ही वस्तुस्थिती आहे. दहापैकी सात चित्रे पडत असतील तर आपले चित्र त्यात असू नये या स्वाभाविक ईर्ष्येपायी ही मंडळी एकमेकांपाठी धावताहेत. 'शोले'च्या यशामुळे हा समज बळावला, पण 'शोले'च्या यशात इतरही अनेक घटक सामील होते. सहा–सात स्टार्स एकत्र आणण्यात निर्मात्यांना अधिक सुरक्षिततेची हमी वाटते, ही चित्राची केवळ एक बाजू झाली. दुसरीकडे वाढत्या बजेटमुळे येणारी 'रिस्क' अटळच असते. असा चित्रपट चालला तर उत्तुंग यश मिळवतो हे खरं, पण तो पडला तर येणारा खड्डाही तितकाच खोल असतो. 'शोले'चे अफाट यश, 'नागिन' आणि 'कभी कभी' या नंतरच्या मल्टिस्टारकास्ट पिक्चर्संना लाभलेलं नाही. त्यांच्या मर्यादित यशानंतर येणारी अशा प्रकारची आणखी तीन–चार


या आनंदयात्रेत जे पाहिलं त्याची ओझरती टिपणं म्हणजे हा लेखसंग्रह. रूढ अर्थानं ही प्रवासवर्णनं नाहीत. माणसं, त्यांची गुदमरलेली आणि फुललेली प्रवाही मनं, अखंड पालवणारं ऋतुचक्र आणि वज्रलेप नियती ह्यांच्या नातेसंबंधांची गुंफण माझ्या नजरेत कशी झाली, त्याचा हा विलक्षण घाईगर्दीत उरकलेला आलेख.

आनंदाच्या दाही दिशा

रवींद्र पिंगे

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

किंमत : दहा रुपये

चित्रेच या फॉर्म्युलाचं भवितव्य ठरवू शकतील. एक नक्की की, या प्रकारची भाऊगर्दी सर्वच प्रेक्षकांना सर्वकाळ मानवणारी नव्हे. प्रारंभीचं कुतूहल कालांतरानं कदाचित विरेल. त्यातही मल्टिस्टारर्सची यादी पाहिली तर, काही ठराविक कलाकारांची नावं वारंवार आढळतात आणि काहींची नावं क्वचितच दिसतात, ही बाबही विचार करण्याजोगी आहे. असे कलाकार स्वतंत्रपणे स्वकर्तृत्वावर यश मिळवू शकत नाहीत. त्यांच्यामध्ये आत्मविश्वास नाही, किंवा निर्मात्यांचा त्यांच्या सामर्थ्यावर विश्वास नाही, असे काही निष्कर्ष यातून काढावेत काय ?

कभी कभीमध्ये तरी तसं पाहिलं तर काय कमी आहे? काही समर्थ कलाकार आहेत, काही लोकप्रिय आहेत, नामवंत दिग्दर्शक–लेखक आहेत आणि बऱ्याच काळानंतर चांगला 'ब्रेक' मिळालेले खय्याम संगीत गाजवताहेत. आणि तरीही चित्रपट जीव धरू शकत नाही. याचं एक मुख्य कारण रंगरूपहीन कथा हे असू शकेल. प्रत्येक 'स्टार' गणिक किंवा 'पेअर' बरोबर तुकडा पडणारी कथा सागर सरहद्दीसारख्या बुर्जुर्गाच्या लेखणीतून उतरूनही प्रभावी ठरलेली नाही. चोप्राजींच्या दिग्दर्शनातही खास असं काहीच नाही. निरनिराळ्या सिताऱ्यांच्या सुंदर छायाचित्रांचा सुबक अल्बम बनविण्याऱ्याइतकीच त्यांचीही कारागिरी इथं दिसली आहे. एकही प्रसंग ते दिग्दर्शनातून जिवंत करू शकलेले नाहीत. कलाकारांच्या फौजेपैकी राखी आणि वहिदा रेहमान यांनीच फक्त लक्षात राहण्यायोग्य भूमिका केल्या आहेत. शशीकपूरनेही समजून आणि समरसून अभिनय करून एक सुखद धक्काच दिला आहे. ऋषी–नीतू इतर कुठल्याही चित्राप्रमाणेच इथंही वावरतात. अमिताभ बच्चनचं भावदर्शनातलं अपयश नजरेत भरण्याइतकं धक्कादायक आहे. या समर्थ अभिनेत्यानं कित्येक भावपूर्ण प्रसंगी एक त्रस्त दगडी चेहरा कायम ठेवून भूमिका समजलीच नसल्याची शंका निर्माण केली आहे. इतर बाबीत, नेत्रसुखद आउटडोअर छायाचित्रणाचा उल्लेख केलाच पाहिजे. बाकी असले आत्मा हरवलेले चित्रपट कभीकभीच आलेले बरे ! □

## नहले पे दहला

'यादें' सारखी अपूर्व प्रायोगिक चित्रनिर्मिती करणारा सुनीलदत्त आणि रेश्मा और शेरासारखे कलाचित्र सादर करणारी अजंठा आर्टस् ही त्याची निर्मिती संस्था यांनी 'नहले पे दहला' सारखा तद्दन कमर्शिअल पिक्चर पडद्यावर आणावा, याचा दोष संपूर्णपणे त्यांनाच देता येणार नाही. चित्रपट या धंद्यानं चित्रपट या कलेचा गळा दाबल्याचं ते एक दुर्दैवी उदाहरण आहे. धंद्यातल्या गळेकापू चढाओढीत जिवंत राह्यचं तर कशाकशाशी आणि कशा तडजोडी कराव्या लागतात, याचा तो आदर्श वस्तुपाठ आहे. आर्ट फिल्मस्कडे पाठ फिरवणारे प्रेक्षक यातल्या दोषाच्या वाट्यापासून सुटू शकणार नाहीत.

तेव्हा अनुभवानं शहाण्या बनलेल्या सुनीलदत्तनं या चित्रपटात आम प्रेक्षकांना जे जे हवं ते, जसं हवं तसंच, इमानदारीत पेश केलेलं आहे. काट्यानं काटा काढायच्या सामान्य कल्पनेवर आधारलेली ही एक गुन्हेगारी वळणाची कथा आहे. सुनीलदत्त (राम उर्फ सुनील) आणि विनोद खन्ना या भावांच्या लहानपणीच पोलिस ऑफिसर असलेले त्यांचे वडील गुंडांकडून मारले जाणं आणि मोठेपणी त्यांनी त्यांचा सूड घेणं ही मध्यवर्ती कल्पना, शक्य तितकी शिळी आणि चोरीची आहे. 'बारूद' या अलीकडच्याच चित्रपटात आणि 'दस नंबरी' या येऊ घातलेल्या चित्रपटात हीच कल्पना वापरली आहे. गेल्या वर्षी पडद्यावर आलेला 'प्रतिज्ञा' आणि त्या पूर्वीचा 'जंजीर' यांचीही बैठक सही सही तीच आहे. 'यादों की बारात' या गाजलेल्या चित्रातही किंचित फरकाने तिचाच वापर केला गेला आहे. पोलिस इन्स्पेक्टर्स ही जमात निरुपद्रवी कोंबडी-बकरीसारखी कापायलाच काढलेली आहे असा आमच्या हिंदी चित्रपटकर्त्यांचा घोर गैरसमज झाला असेल, तर तो दूर करण्यासाठी पोलिसांनीच योग्य ती पावलं उचलायला हरकत नाही !

असो. या मुख्य कथानकाला जोडलेली उपकथानकांची अनावश्यक शेपटे येणेप्रमाणे एक : भावाभावांची ताटातूट व शोधाशोध, दोन : सुनीलची आई आंधळी होऊन तिने हरवलेल्या मुलासाठी चित्रपटभर अश्रू गाळणे, तीन : नायिका सायरा ही त्यांच्या अन्यायग्रस्त सेवकाची मुलगीच निघणे, चार : गुप्त पोलिस अधिकारी बनलेल्या सुनीलने स्मगलरचेच रूप घेऊन त्यांच्यात शिरून त्यांचा बंदोबस्त करणे आणि पाच : राष्ट्रीय एकात्मता. कारण धाकटा भाऊ विनोद खन्ना (रहीम) याला करीमचाचांनी वाढवलेले आणि त्याची प्रेयसी ख्रिश्चन. या सगळ्या कथाप्रवाहांची तंत्रे दिग्दर्शक राज खोसला यांनी कशीबशी एकत्र सांभाळली आहेत. प्रेक्षकांच्या कोमल मनांना अपेक्षाभंगाचा एकही धक्का बसू नये, तर त्यांचे सगळे अंदाज खरे ठरल्याचा आनंद त्यांना मनमुराद मिळावा अशी खास दक्षता लेखक–दिग्दर्शकांनी घेतलेली आहे. सायराबानूचा 'शो–पीस' म्हणून पुरेपूर वापर करण्याच्या आपल्या कर्तव्यात निर्माता सुनीलदत्त आणि दिग्दर्शक राज खोसला यांनी बिलकुल हयगय केलेली नाही. याशिवाय चित्रपटात पाच गाणी, चार–पाच खून कराटेसारख्या काही प्रेक्षणीय लढती, किमान पाच तरी भावपूर्ण रडारडीचे प्रसंग आणि मोजण्यापेक्षा पहाण्यालायक असणारे लव्ह-सीन्स असा मोठा मजेदार मालमसाला मनोरंजक पद्धतीने भरपूर वेगाने अंतराअंतराने विखरून टाकण्यात आला आहे. गाणी आर. डी. ची बाटू नयेत इतकी सॉफ्ट आहेत. अझीझ नाजाची कव्वाली जोरदार आ[illegible] सुनील, सायरा, विनोद, बिंदू यांनी आपाप[illegible] उद्योग ठाकठीक केले आहेत. प्रेमनाथ य[illegible] सद्गृहस्थानं आपण टिपेच्या तारस्वरा[illegible] किती वेळ सतत किंचाळू शकू याची चाचण[illegible] घेण्यासाठीच यातली स्मगलरकिंग 'जनरल'[illegible] भूमिका स्वीकारली होती, असं (प्रेक्षक म्हणतात. नहले पे दहला हे नाव निवडता[illegible] सुनीलदत्तनं प्रेक्षकांवर कुरघोडी करण्या[illegible] विचार केला होता की काय, ते कळाय[illegible] मार्ग नाही. प्रत्यक्षात मात्र धंदेवाईकपणाच[illegible] दस्तानं कलानिर्मितीच्या नरडीवर मात के[illegible] आहे.